मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.


सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत


युगवाण
डिसेंब
१९९



डॉ. अरुण कुळकर्णी यांच्या 'अराजक : वाचकांच्या दृष्टीकोनातून' या मानसशास्त्रीय अध्ययन पद्धतीने केलेल्या वाचकानुवर्ती समीक्षा लेखाला युगवाणीतील सर्वोत्कृष्ट लेखनाचा. १९९१ चा कै.पां.ब. गाडगीळ पुरस्कार देण्यात आला.
'अराजक' या डॉ.वा.ह. कल्याणकर यांच्या कादंबरीचे प्रकाशक देशमुख आणि कंपनीच्या श्रीमती सुलोचना देशमुख यांचेकडे हा पुरस्कार घोषित झाल्यावर प्रा. विठ्ठल वाघ यांनी काढून पाठविलेले चित्र प्रकाशकांनी लेखकाकडे पाठविले. डॉ. कुळकर्णी यांच्याकडून प्राप्त हे चित्र प्रा. विठ्ठल वाघ व सर्व संबंधितांच्या सौजन्याने येथे प्रकाशित करीत आहोत.

युगवाणी

॥ विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र ॥

संपादक : श्रीपाद भालचंद्र जोशी

प्रबंध संपादक : केशव जोशी

॥ भाषा, साहित्य, संस्कृती, संवाद व कलाविषयक अभिरुचीचे जोपासन–संवर्धन–संशोधन ॥

वर्ष सत्तेचाळीसावे / अंक ४७–१२ डिसेंबर - १९९१

मूल्य–१० रु./वार्षिक वर्गणी : ५० रु.

त्रैवार्षिक वर्गणी १२५ रु.

अनुक्रम ■ ■ ■

[महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त]

आवरण पृष्ठ / संजय धोतरकर
रेखाचित्रे : अरुण मोरघडे / संदीप राशिनकर
मुद्रित शोधन / संकलन / प्रतिलिपी इ. सहकार्य : सौ. शोभा उबगडे / श्यामकांत कुळकर्णी / विलास देशपांडे

जाहिरात विभाग : प्रवीण वर्दापूरकर, आमंत्रक, प्रकल्प विभाग, वि. सा. संघ, नागपूर.

संपादकीय पत्रव्यवहार : संपादक / युगवाणी, विदर्भ साहित्य संघ, / झाशी राणी चौक / नागपूर – १२

वर्गणी व वितरणविषयक पत्रव्यवहार : सरचिटणीस / विदर्भ साहित्य संघ, नागपूर



सूचना :

पृ : ५ वरील 'वॉन्टस्' या शीर्षकानंतरचा कंसातील आकडा हा कवितेच्या शीर्षकाचा भाग नसून प्रकाशन वर्ष आहे. त्याच पृष्ठावर फिलिप पार्किन असे झाले असून ते 'लार्किन' असे वाचावे. तसेच पृ. २५, २६ व २७ वरील कवितांच्या शीर्षकासमोरील कंसातील आकडे हे प्रकाशनवर्षाचे आकडे आहेत.

दुरुस्ती :

- अंक डिसेंबर '९१ पृ. ६४ स्तंभ – २, परिच्छेद-३, अंक-१ 'विजारीत' ऐवजी 'विचारीत' वाचावे.

* * * * * * * * * * * * * संपादकीय

माणसाला असलेली सर्वाधिक महत्त्वाची जाण कोणती असेल तर त्याला या विश्वाच्या रचनेचे, त्यातील व्यवस्था व त्यातील परिवर्तनांच्या संबंधीचे ज्ञान प्राप्त असल्याचा अहंकार. मात्र मानवतेचे प्रथम लक्षण हे नसून स्वतःच्या नजरेत आपण स्वतः संवेदनशील असणे हेच आहे. ही संवेदनशीलता आणि हा अहंकार यांचा संघर्ष हा एक सनातन संघर्ष आहे. आज भाषेद्वारा होणारी बरीचशी अभिव्यक्ती या पातळीला स्पर्श करत नसल्याची जाणीव आपल्याला होऊ लागली आहे.

अभिव्यक्तीची ही पातळी न गाठल्या जण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे शब्दांची सार्थकता आज निकालात निघाली आहे. आपली अर्थवत्ता गमावून बसलेल्या शब्दातली शक्ती व क्षमता त्यामुळे आपण गमावून बसलो आहोत. एकीकडे अति बौद्धिकता, ऐतिहासिक व सैद्धांतिक मीमांसा, तर्क तर्काधिष्ठित निष्कर्ष, यांच्या भाराने क्षीण झालेली अभिव्यक्ती तर दुसरीकडे याप्रकारचे कोणतेच भान वाळगण्याची गरज नसलेला; 'हे वाचलं पण एक अक्षर कळलं नाही हो' अशी टवाळखोरीच्या मानभावीपणाची अथवा अहंकाराची भाषा बोलण्याच्या मर्यादेपर्यंत गेलेला बेजबाबदार झालेला पोकळ शब्द.

एकतर तसा मुळातच शब्दाचा अर्थाशी संबंध नसतो. अर्थ शब्दात येतो तोच मुळी जिवंत माणसांच्या जीवनार्थातून. माणसाचा हा जीवनार्थच पोकळ, चैतन्यहीन, आवाहनक्षमता गमावलेला, हीन–दीन, उदासीन व हतबल, गलितगात्र असा झालेला असेल तर शब्दात तो येणार कुठून ? आणि हे जाणवणे हे शेवटी हे जाणवण्याच्या प्रक्रियेतून आपण चाललो आहोत किंवा नाही यावरच अवलंबून आहे. या प्रक्रियेपासून स्वतःचा बचाव करीत असण्याची व या प्रक्रियेत स्वतःला राखण्याची ज्यांची तयारी नाही त्यांच्याशी म्हणूनच हा संवाद घडूच शकत नाही.

आपआपले निष्कर्ष हे शेवटी आपआपल्या व्यक्तिगत अनुभवातून यावे लागतात. आणि शेवटी तुम्ही काय करता आहात यापेक्षाही तुम्ही काय आहात हे कोणत्याही काळात अधिकच महत्त्वाचे असते. त्यामुळे कुणी काय म्हटले आहे त्याची प्रमाणे, पुरावे गोळा करण्यापेक्षा प्रामाणिक असणे अधिक महत्त्वाचे आहे.

पारितोषिकांचा पाऊस, समीक्षकांची कृपादृष्टी वळती करण्याचे उपाययोजन, मान्यतेचा प्रतिष्ठेचा हव्यास, हिशेबी वृत्ती, व्यासपीठोन्मुख प्रतिभा आणि त्या प्रतिभेच्या प्रदर्शनार्थ उत्सुक याचकांच्या लागलेल्या रांगा, हे शब्दांच्या प्रांतातील समकालीन वास्तव. आपल्या स्थानाचे प्रमाण–पुरावे गोळा करण्यात लागलेल्या या प्रचंड शब्दशक्तीला यापेक्षा वेगळी भूमिका आहे. यापेक्षा आपले वेगळे प्रयोजन आहे याचे संपूर्ण विस्मरण झाले असावे असे चित्र शब्दप्रांतात आज मोठ्या प्रमाणावर आकाराला आलेले आहे. हे मान्य करण्याचा प्रामाणिकपणा असणे हे आपल्या अस्तित्वाचे, स्थानाचे प्रमाण–पुरावे गोळा करून प्रदर्शित करण्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. कुणाहीपेक्षा कलावंताचा अप्रामाणिकपणा ही अधिक गंभीर, अधिक भयावह व अधिक भ्रष्ट समजल्या जाणारी बाब होय. कारण निर्मितीचा तो उद्‌गता आहे आणि कलात्मक निर्मिती म्हणजे सरते शेवटी मनाला उच्च

पातळीवर नेणारी, सुसंवादित्वाच्या उत्कट भावनेची निर्मिती. या भावनेची निर्मिती होण्याच्या दृष्टीने ज्या ज्या उणीवा जाणवतात त्या त्या मर्यादांपुरते जग झिडकारणे, नाकारणे ही प्रामाणिक बंडखोरी. ही बंडखोरीची शुद्ध अवस्था. परतत्त्वाची, अंतर्विश्व व बाह्यविश्वाच्या यांच्या आंतरक्रियेतून निर्माण होणाऱ्या अनुभुतीचा गर्भ जपणारी ही बंडखोरी मानवी संस्कृतीच्या कोणत्याही कालखंडात, मानवी समाजाच्या कोणत्याही धारणापद्धती व संयंत्रात त्याच क्षमतेने मानवासोबत कायम टिकलेली बाब आहे.

मात्र ही बंडखोरी अप्रामाणिक, स्वतःची दिशाभूल करणारी व निर्मितीबाह्य कारणांकरता होऊ लागली की बंडखोरीच्या या मूळ प्रयोजनाच्या तत्त्वज्ञानाशी तिची नाळ तुटते आणि ती संवेदनाविहीन, हुकुमशाही व दहशतवादी कारणांकरिता वापरल्या जाण्याची बाब होऊन बसते.

त्यामुळे जे. कृष्णमूर्ती अथवा रजनीश या युगपुरुषांनी सुचविल्याप्रमाणे जीवनाकडे जीवन व्यापार अथवा गणित म्हणून, जीवनातील प्रत्येक कृती प्रत्येक जगणे हे एखादे कर्तव्य, एखादे काम असल्यासारखेच करणे आवश्यक आहे की हे गांभीर्य थोडा वेळ बाजूला ठेवून, हे ज्ञान एका बाजूला ठेवून देखील जीवनाकडे बघता येते याचा परतून विचार करून बघितला पाहिजे. ज्ञानाचे नव्हे तर प्रज्ञेचे महत्त्व जाणले पाहिजे. शब्दाची क्षीण झालेली, गमावलेली अर्थवत्ता, नवा जोम प्राप्त करण्याची शक्यता कदाचित त्यामुळे निर्माण होऊ शकेल. शेवटी अर्थ ही 'दिल्या जाणारी' बाब आहे. असणारी नव्हे.

अर्थ हा अस्तित्वाला दिल्याच जातो. अस्तित्वाला तसे कोणतेच कार्य नाही आणि त्यामुळे त्याप्रती अकारण व अतिरिक्त गंभीर असण्याची काही गरज आहेच असे नव्हे.

कदाचित या पद्धतीने तिथे परत जाता येण्याची शक्यता आहे जिथून शब्दाच्या अर्थवत्तेचा विकास होण्याचे थांबले आणि प्रामाणिक असण्यापेक्षा, स्वभावानुसार असण्यापेक्षा, 'चांगले' असण्याची अप्रामाणिक असण्याची सुरुवात झाली.

आपआपल्या व्यक्तित्वाचे तुरुंग बनवून स्वतःला त्यातून बाहेर काढून पुनः त्यातच कोंबण्याचा अट्टाहास निर्मितीला मारक असणारे तत्त्व आहे. शेवटी ईश्वरी काय किंवा क्रांतिजन्य काय स्वर्ग अजून प्रत्यक्षात आलेला नाही या आल्बेर कामूने विशद केलेल्या वस्तुस्थितीचे भान सोडून कसे चालेल ?

श्रीपाद भालचंद्र जोशी

वॉन्टस् [१९५०]

ह्या सगळ्यांच्या पलीकडे, इच्छा एकाकीपणाची
कितीही आकाश काळवंडलं निमंत्रण पत्रिकांनी
कितीही आपण छापील
लैंगिक दिशांच्यामागे गेलो
कितीही कुटुंबाचा झेंड्याखाली फोटो घेतला–
तरीही ह्या सगळ्याच्या पलीकडे,
इच्छा एकाकीपणाची.
ह्या सगळ्याच्या खाली
विस्मरणाची इच्छा दबलेली :
कॅलेंडरच्या कलात्मक तणावाशिवाय,
आयुर्विमा, तब्तेवार उर्वर कर्मं,
मृत्युपासून फिरविलेली महागडी नजर–
ह्या सगळ्याच्या खाली
विस्मरणाची इच्छा दबलेली.

मूळ इंग्रजी कविता : फिलिप लार्किन
अनुवाद : कुमार मूमकर

अनुक्रमणिका

जनसाहित्यापुढील आव्हाने

प्रा. वासुदेव डहाके

विदर्भ साहित्य संघाने आयोजिलेले पहिलेच एक दिवसीय दलित साहित्य संमेलन नागपूरच्या धनवटे रंग मंदिरात नुकतेच पार पडले. विदर्भ साहित्य संघातर्फे आता लवकरच एका एक दिवसीय जनसाहित्य संमेलनाचे देखील आयोजन करण्यात येत असून विदर्भ साहित्य संघातर्फे आयोजित ते पहिलेच जनसाहित्य संमेलन असेल. या संमेलनाच्या संयोजनाकरिता डॉ. रवींद्र शोभणे हे संयोजक असलेली एक समिती स्थापण्यात आली असून तिचे कार्य सुरू झालेले आहे.

युगवाणीकडे प्रा. वासुदेव डहाके यांनी पाठविलेला जनसाहित्यासंबंधीचा लेख या लवकरच होऊ घातलेल्या उपक्रमाच्या निमित्ताने प्रकाशित करीत आहोत. लेखावर प्रतिक्रिया अपेक्षित आहेत. निवडक प्रतिक्रिया युगवाणीतून प्रकाशित केल्या जातील.

जनसाहित्य संकल्पनेचा अर्थ आणि उद्दिष्टे महाराष्ट्राला आता परिचित झाली आहेत. नागपूर, अमरावती, काटोल, शेंदुरजना इत्यादि ठिकाणी झालेल्या साहित्य संमेलनातून आणि 'अक्षर वैदर्भी'ने या संदर्भात केलेल्या चर्चांमधून प्रस्तुत विचाराला बरीच गती मिळाली आहे. जनसाहित्याने आपला कायम हक्क सांगावा अशा कलाकृती समृद्धपणे अद्याप जन्मल्या नसल्या तरी त्या दृष्टीने होत असलेली वाटचाल व प्रयत्न स्तुत्यच म्हणावे लागतील.

मराठी साहित्यात दलित, मार्क्सवादी, ग्रामीण जनवादी इत्यादी वाङ्मयीन प्रवृत्ती-प्रवाह आज वादळी रूपाने अवतरत असल्याचा आपणास प्रत्यय येतो. या सर्व वाङ्मयीन प्रवाहाची आशय अभिव्यक्ती जवळ-जवळ समान मूल्याधारित मानता येईल. प्रस्थापित समाजव्यवस्थेने ज्यांचे सर्वांगीण शोषण केले आणि वाङ्मयीन प्रवाहांनी देखील ज्यांना प्रवाहपतित ठरविले त्या अस्पर्श उपेक्षितांचा प्रस्तुत साहित्य म्हणजे वाङ्मयीन आवाज आहे. विश्वपातळीवर उपेक्षिलेला 'बहुजन' या वाङ्मयीन प्रवृत्तीचा नायक असतो. त्यांच्यावरील अन्याय, अत्याचाराच्या, शापित संवेदनांच्या, शोषणांच्या आणि सार्वत्रिक निर्बंधांच्या त्या भीषण वास्तव कथा असतात. प्रस्तुतच्या जनसमूहाला समतेचे सहानुभूतीजन्य वातावरण लाभून त्यांना प्रकाशाची देदीप्यमान वाट गवसावी हा या चळवळीचा संकल्प असतो.

प्रस्तुत संकल्पनेच्या पार्श्वभूमीवर उपरोल्लेखित प्रकाशाकांक्षी साहित्यप्रवाह आपली वाटचाल करीत आहे. विदर्भाच्या समृद्ध मातीतून त्याची बीजे अंकुरली व विस्तारलीही आहेत. त्या दृष्टीने प्रस्तुत वाङ्मयीन प्रवाहाने वैदर्भीचे अक्षरत्व चिरंजीव केले.

जनसाहित्य संकल्पनेची व्याप्ती तमाम उपेक्षित सर्वहारांच्या व्यथा, वेदनांना कवेत घेणारी आहे. त्यात जात, वंश, धर्म आदी विचाराला थारा नाही. तसेच हे साहित्य कोणत्याही एका समाजाचे, जातीचे, संप्रदायाचे अथवा कुटुंबाचेही साहित्य नसते. या सर्व मर्यादांपासून अलिप्त असते.

गांधीजींच्या स्वातंत्र्य चळवळीने खेड्यातला माणूस पहिल्यांदा जागृत झाला. हिंदुस्थान खेड्यांचा देश असल्याने त्या खेड्यांचा आत्मा असलेला शेतकरी, शेतमजूर, दारिद्र्य उपासमार व शोषण यांच्या कचाट्यातून त्यांची सुटका झाली पाहिजे हे गांधींचे स्वप्न. त्या स्वप्नाचा शब्दरूप आविष्कार ग्रामीण साहित्याचे रूपाने मराठीत अवतीर्ण झाला. ग्रामीण जीवनाचे वास्तव

दर्शन घडविणे हे त्याचे उद्दिष्ट ठरले. पण ही चळवळ काही काळ फोफावली, पुढे लुप्तप्राय झाली. म्हणावे तसे यश ती संपादू शकली नाही. मार्क्सवादी साहित्याची स्थिती जवळपास तशीच झाली. यात टिकून राहिले फक्त दलित साहित्य. प्रस्थापित साहित्यापेक्षा वेगळ्या आशयाने नटलेले. विद्रोही पार्श्वभूमीवर ते सतत फोफावत राहिले. तसे दलित साहित्यही वेगळ्या अर्थाने जन-साहित्यच. जगातील शोषित सर्वहारांचा तेही एक उद्गार. पण उपरोक्त साहित्यचळवळी त्यापुढे निष्प्रभ ठरल्या त्याची कारणे कोणती ते सांगण्याचे हे स्थळ नसल्याने जागा गुंतविणे प्रशस्त ठरणार नाही. फक्त अशी अवस्था जनसाहित्याचे बाबतही होऊ नये, असे मनोमन वाटते. तसे होऊ नये असे वाटत असेल तर संबंधित जनवादी समीक्षक, लेखक, संपादक आदींनी कठोर आत्म-परीक्षण करून ही आव्हाने पेलण्याची जिद्द अंगी आणायला हवी. ज्यामुळे आत्माविष्कारासोबतच स्वत्व जपणारी 'आयडेंटिटी' निर्माण होऊ शकेल. निव्वळ ग्रामीण जीवनातील व्यथा-वैगुण्य दाखवून पोकळ सहानुभूतीच्या कच्च्या खांबावर जन-साहित्याचा तंबू टिकाव धरू शकणार नाही. त्याला पोक्त विचाराचे पाठबळ भक्कम रीतीने साकार करावे लागेल. त्यांची ही बांधिलकी प्रामाणिक, खंबीर नि तोलामोलाची असायला हवी. ही वैचारिक परिपक्वताच त्याच्या अमर-त्वाच्या दिशा साकार करण्यास प्रवृत्त ठरेल. त्यांनी कोणता विचारप्रवाह स्वीकारावा किंवा अव्हेरावा हे आधी निश्चित करूनच केलेली वाटचाल अधिक प्रभावी ठरेल. "पण चळवळीची पताका खांद्यावर घेतलेल्या सर्वांना ती मान्य असावी इतकेच. चळवळीची विचारसरणी चळवळीतल्या सर्व सहभागी घटकांसमोर विद्यमान व्यवस्थेला पर्यायी अशा व्यवस्थेचे नील चित्र ('ब्लू प्रिंट') ठेवीत असते.[१]" हे डॉ. भा. ल. भोळे यांचे विचार या दृष्टीने बरेच मार्गदर्शक ठरतील.

तसे पाहिले तर जनसाहित्याने आज ज्या वैचारिक जाणिवा अंगिकारल्या आहेत त्या परस्परांशी वरवर साम्य साधणाऱ्या भासत असल्या तरी अंतःप्रवृत्तीदृष्ट्या भिन्नस्वरूपी आहेत. त्यातील भिन्नत्वामुळेच त्याचे वेगळेपण जगमान्य ठरले आहे. त्यांच्या अंगीकृत कार्याने उपेक्षित वर्गाच्या त्या कैवारी असतीलही परंतु ही भावना झाली. विचाराचे स्वरूप त्याहून भिन्न असते. परंतु ही जाण जनसाहित्याच्या विचार-वंतांना अद्याप आलेली दिसत नाही. त्याचमुळे आंबेडकर, फुले, मार्क्स, संत व रामायणादीक विचारपरंपरांची विळख्याभोपळ्याची मोट ते बांधू पाहतात. या सर्व जीवन-जाणिवांना आजचे जनसाहित्य आपले प्रेरणास्थान मानते. ही संकल्पना त्याचमुळे हिन्दुत्ववादी मार्क्सवाद्यां-सारखी हास्यास्पद ठरणारी असते. त्याच मुळे हा एक पोकळ 'नगारखाना' ठरतो. आंबेडकर-फुले समविचारी मानले तरी मार्क्स त्याहून भिन्न विचारसरणीचा ठरतो. संत व रामायणाचा तर त्या विचारसरणीशी काडीचाही संबंध असू शकत नाही. तरीही जन-साहित्यिक जनसाहित्याची बीजाक्षरे रामायणात शोधतात. वर्णव्यवस्थेचा ओनामा ठरलेल्या प्राचीन ग्रंथात शोधतात. डॉ. सुभाष सावरकरांनी 'जनसाहित्याची परंपरा[२]' शोधतांना याविषयीचा अधिक बळ केलेला दिसतो. प्रस्तुत लेखात ते क्षणात वेदपूर्व अनार्यांच्या संस्कृतीत शिरतात. क्षणात रामायण, महाभारत काळात, क्षणात बुद्ध, भीमाच्या तर क्षणात नामदेव, एकनाथ, तुकारामांच्या. तुकारामाला तर त्यांनी 'जनसाहित्याचे उत्तुंग शिखर[३]' म्हणूनच गौरविले आहे. तर डॉ. मधुकर वाकोडे यांनी "लोक सीतायनात जनवादी संकल्पनांच्या पाऊलखुणा[४]" पाहिल्या आहेत. प्रा. बंड[५] आणि डॉ. सोनारे[६] यांनीही आपापले रथ तुकोबादि संत-दिंडीत सामील करून जनसाहि-त्याचा त्याच्याशी बादरायण संबंध जोडला आहे. तर डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांनी प्राचीन साहित्यात रामायण-महाभारत ही केवळ महाकाव्ये नाहीत. किंबहुना ती 'महाकाव्ये' होऊ शकली याचे खरे कारण म्हणजे ते त्या काळातील खरे जनसाहित्य आहे हे होय. याच्या जोडीला जनसाहित्य म्हणून ओळखले जाऊ शकेल असेही खूप मोठे धन त्यात[७] आहे." असे म्हटले आहे.

प्रस्तुत विचारवंतांनी मांडलेला हा विचार फुले-आंबेडकर-मार्क्सच्या विचाराशी कितीसा संयोग

सांघणारा आहे ? वर्णाश्रम धर्माला विरोध करून शूद्रांच्या मुक्तीचा मंत्र जपणाऱ्या फुले-आंबेडकराच्या विचारसरणीला या परंपरावादी विचाराने मूठमाती दिलेली नाही काय ? बरे यातील सोईचे ते स्वीकारून गैरसोईचे सोडून द्यावे म्हटले तर ही तत्वाशी तडजोड झाली. अशा तडजोडीवर अधिष्ठित विचारसरणी तकलादू ठरतील. प्रस्तुत वाङमयातील विचार वरून जननिष्ठ असला तरी त्यांच्या अंतःप्रवृत्ती (आत्मा) देव, धर्म, दैव, परंपरा, चातुर्वर्ण्य यांनीच संस्कारित झालेल्या असतात. मग या कृष्णविवरातून आपण आपली सुटका कशी करणार ?

प्रस्तुत साहित्याविषयी विचार करताना आणखीही एक आनुषंगिक प्रश्न असा निर्माण होतो की प्रस्तुत साहित्याने आकांत, दारिद्र्य, लुटालूट या कक्षा ओलांडून प्रखर जीवन जाणिवांचा शोध घेऊन त्यांचेशी निवट झुंज, संघर्ष व विद्रोह अद्यापही अंगिकारलाच नाही. ज्यांनी हा प्रयत्न केला त्याला ते पेलत असल्याचे दिसत नाही. परिस्थितीशी शरण्य पतकरून सतत भुईसपाट होणारा इथला नायक पंगुत्वाचाच वसा अद्यापही मिरवीत आहे. यातून तो मुक्त कधी होणार ?

जनसाहित्याची वैचारिक खोली आणि तटस्थता जसजशी वाढीस लागेल तसतसे सकस साहित्य त्यातून निर्माण होईल. परंपरेची नाळ कापून शुद्ध जीवनवादावर आधारलेले बुद्धिवादी व विज्ञाननिष्ठ साहित्य जनसाहित्याने निर्माण करावे. असे झाले तरच ते दलित-मार्क्सवादी साहित्याचे बंधू साहित्य म्हणवून घेण्यास पात्र ठरेल, 'जनसामान्यांची अस्मिता' आणि 'जननिष्ठ जाणिवा' यांचा गाभा जडवाद असावा. अध्यात्माची सर्कस किंवा उठल्याबसल्या ज्यांची नावे घेतल्या जातात, ती देवांची गँग नव्हे. जाति अध्यात्ममुक्त जडवादी जाणीव या अर्थाला वरील शब्द मार्गदर्शक मानत असतील. तर अत्यंत गौरवाची बाब आहे.[८] " डॉ. यशवंत मनोहरांनी जनसाहित्यावर टाकलेली ही जबाबदारी जनवादी विचारवंत व प्रतिभावंतांनी अंगिकारणे क्रमप्राप्त आहे. असे झाले तर "दोन्ही '(दलित व मार्क्सवादी) साहित्यप्रवाहांच्या जीवनमूल्यांशी, ध्येयाशी फारकत न घेता स्वतःचे व्यक्तिमत्व सिद्ध[९] " करण्यात जनसाहित्य यशस्वी ठरेल.

म्हणूनच जनसाहित्यासमोर ठाकलेली ही आव्हाने स्वीकारण्यास त्याने बद्धपरिकर व्हायला हवे. ■

संदर्भ सूची

(१) भा. ल. भोळे, 'जनसाहित्याच्या सामाजिक वैचारिक दिशा' 'जनसाहित्य' दिवाळी अंक नागपूर, १९८४

(२) सुभाष सावरकर, 'जन साहित्याची परंपरा' अक्षर वैदर्भी, अमरावती, एप्रिल, १९८४.

(३) तत्रैव पृ. ४२.

(४) मधुकर वाकोडे, 'लोक सीतायनातील जनवादी संकल्पनांच्या पाऊलखुणा' ज. सा. सं. वि. १९८४

(५) जयंत बंड / अक्षर वैदर्भी, एप्रिल १९८४

(६) तत्रैव

(७) सुरेंद्र बारलिंगे / अध्यक्षीय भाषण जन. सा, संमेलन, शेंदुरजना

(८) यशवंत मनोहर / ज. सा. सं. वि. १९८४

(९) तत्रैव

■

बंगाली कथा :

कच्ची माती

मूळबंगाली लेखिका : माया घर
अनुवाद : सविता ओगीराल

रासबिहारी रथ मेळ्यात फिरता–फिरता एक मातीची बाहुली दिसली. वरी बाटल्यावरोबर विकत घेतली. चिल्लर नव्हती तर पुरा एक रुपया दिला दुकानदाराला.

पाहून खूप आनंद जरी झाला नाही तरी अगदीच निराशापण झाली नाही. छान गोल गोल चेहरा, टवटवीत डोळे. त्या दुकानदाराचा करुण चेहरा आठवला मला, कदाचित तो बघूनच घेतली मी तिला. पण आता कुणी चिडवणार तर नाही ना या भीतीने आलमारीत एका कोपऱ्यात दडवून ठेवली तिला. नंतर मन मात्र तिथेच घुटमळत होते.

कधी मधी दुपारी हळूच ती बाहुली काढून मी बघत असे, तिचा चेहेरा साफसूफ करून अंगावरची धूळ झटकून पुन्हा ठेवून देत असे. सतत घासून पुसून चेहेरा चांगलाच दिसू लागला होता हल्ली.

एक दिवस तिला निळ्या रंगाचा घागरा नेसवून दिला. गळ्यात मण्यांची माळ पण घालून दिली. नाकात नथही चढवून दिली. पण पुन्हा आलमारीच्या कोपऱ्यात ठेवून दिली. हो, उगाच कुणी पाह्यचे...

एकटेपणामुळे दिवस कंटाळवाणे झाले होते. एकेक दिवस सरता सरेना अशी अवस्था. मग सामानसुमान बांधले अन दीर्घ मुदतीच्या प्रवासासाठी प्रस्थान ठेवले. प्रवासात कुठे मण्यांच्या माळा, तर कुठे रंगीबेरंगी दगड, कुठलाशा कबरस्थानातील एका झाडाची पाने, तर एका देवस्थानातील काहीबाही वस्तू असे सारे जमवितांना माझी बॅग खूप जड होऊन गेली.

प्रवास संपवून घरी परतले. एक दिवस आलमारी उघडली, पाहिले तो माझी बाहुली फारच वाईट अवस्थेत पडलेली. कुणी तरी नक्कीच हे काम केले असणार. पुन्हा तिला साफ करून ठेवून दिली. एक दिवस पुन्हा आठवण आली. तिला बाहेर काढली. रंग उडालेल्या भिवया रंगवून कपाळावर कुंकू रेखून दिले तिच्या !

बाहुली माझ्याकडे पाहून हसू लागली आता. मग जुना घागरा काढून तिला लगीन–साडी नेसवून दिली. डोक्यावरून घुंघट पण ओढून दिला. परिणित कन्येसारखी सजून धजून ती पुन्हा आपल्या अंदरमहालात गडप झाली. आलमारीच्या चोरकप्प्यात बंद झाली. एका सॅटीनच्या कापडाने झाकून ठेवले मी तिला, हो. कुणाच्या नजरेस पडायला नको.

पुन्हा एकदा बाहेर जावेसे वाटले. एकटीच फिर फिर फिरले. कोलूच्या बैलासारखी. अन् घरी परतले. थकव्याने शरीर–मन दोन्ही ग्रासलेले.

घरात मी एकटीच, बाहेर जोरदार पाऊस पडत होता. चहू बाजूला काळाकुट्ट अंधार. काड् काड् विजा चमकू लागल्या. अचानक मनात बाहुलीची आठवण आली. घाबरली असेल बिचारी ! बरेच दिवस बंद असलेले आलमारीचे दार बऱ्याच कष्टाने उघडले. चोरकप्पा उघडताच एक मोठ्ठा उंदीर टुण्णकन उडी मारून पळाला. सॅटीन कापड बाहेर काढू लागले तर कितीतरी लहान लहान उंदराची पिले चिं चिं करीत इकडे तिकडे करू लागली. त्यांना हाकलल्यावर बाहुली माझ्या नजरेस पडली. उंदराने खाल्लेली तिची लाल साडी, सुतात ओवलेली तिची माळ; सारे विखुरले होते, तिचे नाक तर तोडलेच होते. डावा हातही नव्हता अस्तित्वात. अंगाचा रंग उडून गेलेला, बाहेर काढावी म्हणून हातात घरताच तुकडे तुकडे होऊन माझ्याच मांडीवर पडले.

बाहेर पाऊस कोसळतच होता. आज पावसाला खळ नव्हती. तिचे तुकडे जोडून जरावेळ तशीच बसून राहिले मी. हृदयात कसेसेच होऊ लागले. गळ्यात दाटून येऊ लागले. अखेर मणी-माळ–


अनुक्रमणिका

फाटकी साडी अन् भंगलेली बाहुली घेऊन वऱ्हांड्यात आले. आकाशात वीज चमकली. अगदी आता वीज पडेल असेच वाटले. बाहेर येऊन बाहुलीला दोन्ही हाताने घट्ट धरून आभरणासह ठेवून दिली; त्याच गंधराज रातराणीच्या तळाशी. त्या रातराणीच्या वेड्या गंधाने मला रात्री झोपच येत नसे.

अंगणात पाणी थै थै करीत होते. बघताबघता बाहुली मातीबरोबर एकरूप होऊन गेली. काही सुद्धा राहिले नाही. केवळ तिथले पाणी साडीच्या लाल रंगाचे झाले. झाडाच्या एका फांदीवर झुलत होती तीच मण्यांची माळ. पावसाचे पाणी टपटप करीत तिच्यावरून झरत होते. काड् काड् आवाज करीत वीज चमकली. मी दचकले. माझ्याच बाहुलीच्या अंत:करणाचा हा आर्त नाद नाही ना ? अखेर जोरदार पावसाच्या धारात तो लाल रंगसुद्धा दिसेनासा झाला. मी मागे परतले. दरवाजा बंद करून घरात आले. टेपरेकॉर्डवर परिचित आवाजातले एक गाणे वाजत होते 'नीळाम्बरी शाडी परि नील जमूनाय– के जाय– के जाय' ऐकता ऐकता यमुनेचे नील–जल आणि अंगणातले ते रंगीत पाणी माझ्या डोळ्यातीच जलात मिसळून गेले. वीज गेल्याने टेप आपोआपच बंद होऊन गेली होती.

टेबलावर कपभर गरमागरम चहा. एक मेणबत्ती बाजूला जळत होती. किणकिण आवाज करीत मी चहाच्या कपात साखर मिसळत बसलेली. दूध आणि चहा मिळून माझ्या बाहुलीच्या अंगाचा बदामी रंग होऊन उठला. साखर खूपच जाडसर आहे. सहजासहजी गळत नाही. पण बाहुली ? किती पट्कन गळून गेली ! कच्ची माती ना, म्हणूनच !!! ■

माणिक साठे यांचा बंगला, वेस्ट पार्क
डॉ. देशमुख रोड, धंतोली, नागपूर–१२
दूरध्वनी : ५३०४६९



कन्नड कथा :

पतीनिधनानंतर

मूळ कथा : डॉ. शांतीनाथ देसाई
अनुवादक : प्रा. बाबुराव गायकवाड

१

तिचा नवरा मरून सहा महिने झाले होते. तिचा धाकटा भाऊ तीन महिन्याच्या रजेवर आला होता. तो तिचा संसार मार्गाला लावून मुंबईला गेला. त्याला जाऊन महिन्याच्यावर झाले होते. शशिकलेचा अभ्यास जोरात चालला होता. शशिकलेच्या वडिलांना जाऊन ऑगस्टमध्ये एक वर्ष झाले होते. (अर्धांगवायू होऊन कितीतरी वर्षे झाले होते. महिने न् महिने तो अंथरूण धरून सहस्र नेत्रांनी झोपी जात असे. त्याच्या पुण्याईने रोग जवळ जवळ असाध्य असूनही तो तळमळत पडला नाही. देवाच्या कृपेने त्याची लवकर सुटका झाली) सध्या काही नाही. पण फेब्रुवारीनंतर बिचाऱ्या शशीची परीक्षा आहे. यावेळी मात्र परीक्षा राहणार.

विजयाबाईला शशिकलेबाबत खूप अभिमान व भरवसा होता. तिला देता येईल तेवढे शिक्षण दिलेच पाहिजे, असा तिचा एक दृढ निश्चय होता. पहिल्यापासूनच शशिकलेच्या अभ्यासाच्या बाबतीत तिला खूप आस्था होती. तशी ती काळजीच घेई. तिला रोज सकाळी लवकर उठवून अभ्यास करण्याची सक्त ताकीद असे. शशिकलेला पाच वाजता उठवून तीही कुठलेतरी लहानसहान काम करत बसे. ती शाळेला जाईपर्यंत तिला कसलेही काम सांगत नसे. सर्व काही तीच बघत असे. नवरा मेल्यानंतर चाळीच्या कोपऱ्यातील नळाहून पाणी आणणे तिच्या जीवावर येत असे. सुरुवातीला तिचा भाऊ पाणी आणत असे. तिचा भाऊ गेल्यानंतर बिचाऱ्या शशीने दोनचार दिवस पाणी आणले. आणखी किती दिवस ती कुंकूहीन कपाळ लपवून वावरणार होती. शेवटी पाणी आणण्याचे काम तिला करावेच लागले. शेजारच्या पवारांच्या कमला नावाच्या मुलीबरोबर दररोज संध्याकाळी बाजारात जाऊन येत होती. (बिचारी अभ्यास करत नव्हती) आयुर्विम्याचे पंधरा हजार रुपये (त्या पैशांना स्पर्श करायचा नाही, असे सुरुवातीला ठरले होते. पण तिचा भाऊ ऐकतोय कुठे) 'बँकेमध्ये असते तर चांगले झाले असते. त्यांच्या व्याजातच संसार चालला असता.' रात्री बसून पै न् पैचा हिशोब ठेवत असे. दुपारी काहीतरी वाचन व वीणकाम करायला मिळाले पाहिजे, अशी तिची तीव्र इच्छा असे. दोन्ही बाजूचे शेजारी, विशेषत: नवऱ्याचे मित्र-मैत्रिणी बोलत बसत. मागच्या आठवणी सांगून डोळ्यातून अश्रू काढीत. 'एकदोन वर्षांनी तिच्या नवऱ्याला नक्कीच बढती मिळून काही दिवस ती सुखा-समाधानात राहिली असती.' अशाप्रकारे येणारा एकेकजण बोलत होता. हळहळ व्यक्त करीत होता. चहा झाल्यानंतर शशीसाठी ती फराळाचे तयार करी.

शशिकला आल्यानंतर चहा घेताना अभ्यासा-बाबत चर्चा करीत. शशिकलेला अभ्यासाचा कंटाळा येई. ती कधीतरी सिनेमाला जाऊन बसे. पती होता तेव्हा विजयाबाईच्या हातातले काम संपत नसे. येणाऱ्या-जाणाऱ्यांना चहापाणी करावे लागे. या गोंधळामध्ये सिनेमासाठी नवऱ्याकडून वर्षात एकदोनदाच परवानगी मिळे.

आताशा विजयाबाईची शशिकलेच्या बाबतीत विचित्र अशी स्थिती झाली होती. काहीसे अधैर्य आणि अस्वस्थता वाटत होती. तिने शशिकलेला बोलावून विचारले, 'शशी, एप्रिलमध्ये झालेल्या पूर्व परीक्षेचा निकाल काय म्हणतो ? कोणत्या विषयात मार्क्स कमी पडलेत ?

'आणखी कोणता ? गणितात दोनशेपैकी अडुसष्ट.'

'तुझ्या गणिताच्या मिसाळ शिक्षकांना उद्या बोलावून आण. शिकवणी घेतात का ते विचारून घे बघू.'

'उद्या मी बोलावून आणते आई !'

'तू विचारून मला सांगितलंस तर बरं होईल. पालकांनी काळजीने सांगितले म्हणून ते जबाबदारीने शिकवतील. 'फी'चा वगैरे काही प्रश्न नाही.'

तिसऱ्या दिवशी शशी मिसाळ मास्तरांना बोलावून घेऊन आली. विजयाबाई पांढरी साडी नेसून कसल्यातरी चिंतेत बसली होती. 'या मास्तर. बसा. शशीच्या अभ्यासासंबंधी बोलण्यासाठी तुम्हाला बोलावले. तुम्हाला त्रास दिल्याबद्दल क्षमा असावी.'

मिसाळांना थोडासा संकोच वाटला. त्यांचा सत्तावीस-अठ्ठावीस वर्षांचा चेहरा जरासा लालसर झाला 'छेऽ त्रास कसला. हे तर आमचे कर्तव्यच आहे. शशी अभ्यासात खूप हुशार आहे. ती चांगला अभ्यास करते. पण गणितच काय ते जरा कठीण. फार अभ्यास केला पाहिजे. भूमिती सोडवली तर मार्क्स चांगले मिळतात.'

'हे बघा. ती या वर्षी पहिल्या वर्गात पास झालीच पाहिजे. पुढच्या वर्षी तिला एखादे काम बघितलं पाहिजे. त्याचबरोबर जमलेच तर तिने कॉलेजसुद्धा केले पाहिजे, ही माझी इच्छा आहे. तुम्ही तिला शिकवणीची थोडीशी मदत करा म्हणजे झालं...'

तिचे बोलणे संपल्यानंतर मिसाळ मास्तरांनी बोलण्यास सुरुवात केली, 'कामाची काय गरज ? ओऽहो – क्षमा असावो ! मला तिचे वडील... फारच वाईट झालं बघा. काय नशीब...' शशीकडे हळूच बघून तो म्हणाला. आईच्या सांगण्यावरून शशी चहा करण्यासाठी आत गेली.

'बघा. सर्व काही अवचित घडलं. नशीबात जितकं असेल तितकं सर्व व्हायला नको काय, आणखी काय... ' विजयाबाईचे डोळे पाणावले.

'सगळं आपापलं कर्म ! कुणाला काय करायला येतं ? मी दररोज संध्याकाळी येऊन शिकवत जाईन. काळजी करू नका.'

'यावर्षी शिकवणी लावून पास केलं तर फार उपकार होतील.'

'त्याचं काय हो. तुमच्यासारख्यांना मदत करायची नाही तर कुणाला करायची ? '

'फी किती द्यावी लागेल...' विजयाबाईच्या नेत्रात अडकलेला अश्रू सरकन् ओघळला.

'छे ! तुमच्याकडून फी कशाला ?' तुमच्या परिस्थितीची थोडीशी कल्पना आहे मला. आणखी शशीसारख्या हुशार मुलीला शिकविण्यात एक प्रकारचा आनंदही आहे. कृतज्ञतापूर्वक तोंड भरून मास्तर म्हणाले.

इतक्यात शशी किटलीत चहा घेऊन आली. 'छे ! चहा कशाला ?' मिसाळ म्हणाले : विजयाबाई पटकन् आत गेली. एका थाळीत आधीच करून ठेवलेले गुलाबजाम आणि चकल्या घेऊन आली.

'इतकं कशाला हो ? '

'सगळं घरीच केलंय. कृपया घ्या.' विजयाबाईच्या आग्रहामुळे 'हूं' करून मास्तर थाळी घेऊन खाऊ लागला.

'शशिकला, माझ्याबरोबर तू थोडंसं घेणार की नाही' एक दृष्टिक्षेप टाकीत ते बोलले.

'मी नंतर घेते, सर.'

'बघ, किती सुंदर गुलाबजाम झालेत !'

विजयाबाईच्या चेहऱ्यावर हसू फुलले. 'तुम्हाला आवडले का ? तुम्हाला आवडले असतील तर आणखी देऊ का ?'

'खरंच, फारच सुग्रणपणाने केलेत हो.' कधी विजयाबाईकडे तर कधी शशीकडे बघून मास्तर थोडंसं हसण्याचा प्रयत्न करू लागला.

२

तिचा नवरा मरून एक वर्ष झाले होते. शशीला नगरपरिषदेच्या ऑफिसात तात्पुरते काम मिळून दोन महिने झाले होते. एस. एस. सी.चा निकाल लागेपर्यंत विजयाबाई मिसाळ मास्तरांना घेऊन नगरपालिकेच्या अध्यक्षांकडे स्वतः गेली. शशिकलेला काम मिळण्याचे कबूल करून आली. तिसऱ्या दिवशी शशी उत्तम रेशमी साडी नेसून अध्यक्ष गायकवाडांच्या घरी जाऊन काम मिळाल्याची खात्री करून आली. ऑर्डर निघूनही थांबल्यामुळे ती दोनदा गायकवाडांच्या घरी गेली. शशीला बसवून ती ऑफिसला गेली. ऑर्डर घेऊनच ती परत आली. महिन्याला शंभर रुपये म्हणजे काय कमी झाले ? नवरा असताना त्याचा खर्च झाला होता. (तो P. W. D.च्या ऑफिसमध्ये कोणी तरी होता ?) तिच्या हातात शंभराच्यावर येत. शशीला कॉलेजला जायची

इच्छा होती. पण पैशांची अडचण दूर व्हायला हवी होती. बिचारी शशिकला, 'यावर्षी राहू दे. पण मला कॉलेजला जायचे आहे आई. असे म्हणत असे. विजयाबाई काय बोलणार? तिच्या पुण्याईमुळे कोल्हापूरात सकाळचे कॉलेज सुरू झाले होते. आताशा कॉलेजमधून कितीतरी बी. ए., एम. ए. होत होते. 'तुला बी. ए. व्हायला त्रास होईल ना?' विजयाबाईने विचारले. तिने शशिकलेला कॉलेजला पाठविले. पुढे स्कॉलरशिप मिळेल, कसला त्रास? एका गरीब विधवेची विनंती म्हणून अध्यक्ष गायकवाडांमार्फत जाऊन प्राचार्यांना सांगितले पाहिजे का?

शशीचे ऑफिस आणि कॉलेजच्या घरी येणाऱ्या-जाणाऱ्या मित्रमैत्रिणींची संख्या मोठी होती. घरी दररोज संध्याकाळी कमीत कमी तिघे-चौघे तरी असत. ते आल्यानंतर इकडच्या तिकडच्या बातम्या निघत-गप्पा करत बसत. तेवढेच विजयाबाईला समाधान वाटे. चेष्टा-मस्करी, हसण्या-खिदळण्याने घर भरून जाई. जिवंत झाल्यासारखे वाटे. येणारे तोंडभरून बोलत, 'असं नाही काकी, तसं नाही काकी, हे काय काकी?' म्हणत. सहानुभूतीपूर्वक बोलत असत. चहा-फराळ करत. तिने सांगितलेली लहान-सहान कामे करीत. त्याचाच तिला खूप आनंद वाटे. नवरा होता त्यावेळी स्वयंपाकघरात काम असे. शशिकलेला खेळण्या-हसण्यासाठी मोकळीक मिळत नसे. आता शशीचे जीवन सुखाचे चालले होते. तिच्या आशा-आकांक्षा पूर्ण होत असलेल्या बघून विजयाबाईला सार्थक झाल्यासारखे वाटत होते.

सुरुवातीपासूनच विजयाबाईला गायनकलेची खूप आवड होती. (लग्नानंतर एक वर्षापर्यंत) तिचा नवरा तिचे गाणे ऐकत असे. तिला शास्त्रीय संगीत शिकण्याची संधी दिली नाही. 'संगीत शिकायला पाठवता का?

'आपल्याला कुठे उपाशी राहाण्याची वेळ येणार आहे?' असं म्हणत असे. त्यामुळे मुलीलाही संगीत शिकविण्याची इच्छा अपुरीच राहिली होती. आठवड्यातून दोनवेळा शिरोडकर मास्तरांकडे संगीत शिकण्याची तिने व्यवस्था केली. 'तुझ्या इतका माझा आवाज चांगला नाही आई. संगीताला पैसा लागेल' शशी नम्रपणे म्हणाली.

'सराव केला की आवाज चांगला होईल. शिरोडकरांसारखा शिक्षक शिकविण्यास लाभ-ल्यास संगीत कठीण आहे काय?' असे ती तळ-मळीने सांगे.

आज मास्तर अर्धा तास वाट बघून गेले. ते शशीला माहीत नव्हते, 'शशीबरोबर तुम्ही का शिकत नाही विजयाबाई? तुमचा आवाज सुंदर आहे-मधुर आहे. संगीताची उपासना करण्यासाठी वयाचे बंधन नाही. यावर्षी नको म्हणत असाल तर पुढच्या वर्षी सुरू करा'.... शशीसाठी संगीताचे सूत्र सांगितले. शशी अजून का आली नाही, याचा विजयाबाई विचार करू लागली. शशीच्या मैत्रिणी तिच्या घरी आल्या. 'काय हो काकी, शशी कुठे आहे? म्हणजे ती ऑफिसमधून आली नाही!' शशीचे त्यांना सर्व माहीत होते. त्या एकदम उत्तरल्या, 'शशी ऑफिसातून गेली त्यावेळी तिच्याबरोबर मिसाळ गुरूजी होते.' विजयाबाईला आधार मिळाला.

'ओहोऽ गेली? होय, मी विसरलेच होते. आज मास्तरांच्या घरी सत्यनारायणाची की काय पूजा आहे असे सांगत होती....' असं उगीचच ती म्हणाली. शशी आठ वाजता आली. तोपर्यंत विजयाबाई चिंतेत होती.

'शशी, मास्तर एक तासभर थांबून गेले. जरा सांगून जायचे होते?'

'मला काही माहीत नव्हतं आई. मी कुठं जाणार होते? आपले मिसाळ गुरुजी...' शशीने भीत भीत सांगितले.

'बोलावून घरी नेलं होतं काय?'

'तसं नाही आई. फिरायला म्हणून बोलावून घेऊन गेले. आज जाणार नव्हते. तू वाट बघशील असं सांगितलं. कलेक्टर कचेरीहून तसंच जाऊ. जरा बसून महत्त्वाच्या विषयावर चर्चा करू, असं म्हणाले.'

'महत्त्वाचा विषय? तोही तुझ्याबरोबर? तो कोणता.'

'लग्नाचा विषय....' जरासं लाजत शशी म्हणाली.

'लग्नाचा विषय ?' विजयाबाईचे डोके गरगरायला लागले.

'लग्नाच्या विषयावर तुझ्याशी कशाला बोलायला पाहिजे ?'

'मला माहीत नाही.'

'असं–मास्तराची इथपर्यंत मजल गेली ? आणखी काय म्हणाला ?'

'तुझ्यावर माझं प्रेम बसलंय' असं काहीतरी म्हणतात....'

'प्रेम ! हा मास्तर म्हणजे गायीचे तोंड असलेला वाघच दिसतोय. वरपांगी साळसूद, पण आत काय काय दडलंय !'

'तसं नाही आई, गुरुजी खूप चांगले आहेत. माझ्याबद्दल त्यांना खूप आदर वाटतो.'

''असं होय, मग मला कसं सांगितलं नाही ?' मला त्याची दगलबाजी समजते. तू लहान अननुभवी म्हणून लवकर घशात घालण्याचा प्रयत्न करतोय. तुला शिकवलं. मोठं केलं.... म्हणजे शिकवल्यासवरल्यावर त्याला आयतंच फावतंय...मी तुला कोणत्या परिस्थितीत शिकवलं ? पुढं डॉक्टर अथवा आय. ए. एस. कोणीतरी बघून लग्न लावून देण्याची माझी इच्छा आहे. दिसायला चांगला. स्वभावाने चांगला. शेवटी हा घशात घालू पाहातोय. माझ्या संसाराकडे बघ. माझा संसार चालविण्यासाठी तू एकटीच आहेस. मी काय म्हणते ते कळतंय ना ! त्यांच्या कारकुनाच्या पगारात मी कसा संसार केला ते मलाच माहीत. कारकून किंवा मास्तराच्या बरोबर तुला बांधायला मी मूर्ख का ?'

'मला काय सांगायचे ते मी त्यांना सांगितले आई. काळजी करू नको. मी सर्व तुझ्यावर सोपवलं आहे.'

'कां, तुला सांगायला काय होतंय ? शिक्षणाच्या आणि आईच्या प्रश्नासंबंधी त्याला सांगायचं.'

'असं नाही. त्यांना सर्व ठाऊक आहे आई शिक्षण होईपर्यंत थांबायला तयार आहेत... तुला काही बघण्याचे कारण नाही....'

'मी काही बघायचं नाही ? मी तुमच्या रस्त्यात कशाला, अनाथ. मी कोण–तुमचं बघणारी ? मी माझं तेवढं बघण्यास असमर्थ आहे काय ?' शशी तशीच गप्प राहिली.

'तुला ह्या मास्तराबद्दल काय अनुकंपा वाटते ? तू जग रीत पाहिलीस तरी....

'तसं नाही आई–'

'शशी, इकडे बघ. तुझ्यासाठी मी किती करते, किती सहन करायचे–तू गेल्यावर मला कोण आहे ? तू शिकायला पाहिजे. माणसं ओळखता आली पाहिजेत. मोठं झालं पाहिजे. एखादा, ऑफिसर किंवा डॉक्टर बघितला पाहिजे. त्यासाठी मी धडपड करतेय–' विजयाबाईचे डोळे भरून आले.

'आई, तुला मी सांगते, तुझी संमती नसेल तर मी करणार नाही. काळजी करू नको. इतकं कशाला मनाला लावून घेतेस ? ' शशीला तिच्याबद्दल कणव आली. डोळयात अपरूप असे काही चमकून गेले...

विजयाबाई डोळे पुसून खिडकीतून पाहू लागली. डोळाभर पसरलेल्या अंधारात सरसर अश्रू ओघळू लागले. 'स् ऽ स् ऽ ऽ' करीत विजयाबाईने एकदम खिडकी लावली.

३

तिचा नवरा मरून सात-आठ वर्षे झाली. विजयाबाईचे जीवन सफल होत होते. आता ती महिलामंडळाची कार्यवाह आणि लहान मुलांच्या शाळेची अध्यक्ष होती. नगरपालिकेच्या येत्या निवडणुकीस काँग्रेसच्या वतीने उभे राहण्याचा, त्याचप्रमाणे इतर पक्षांचा तर आग्रह वेगळाच ! इकडे गायकवाड वेडा, स्वत: या निवडणुकीत वेडेपणामुळे वाया जाणार होता. गायकवाडाला तिच्यात दुसरी कसली आवड होती ? म्हणजे शशिकला. बिचारी, तिला ह्या गोष्टी समजत नव्हत्या. ती गायकवाडाला वडिलांच्या ठिकाणी बघत होती. पहिल्यांदा विजयाबाईच्या संसाराबाबत गायकवाडने दाखविलेली सहानुभूती चुकीची वाटत होती. यासंदर्भातही त्याने दाखविलेली सहानुभूती विजयाबाई किंवा तिच्या संसाराबद्दल नव्हती, तर शशिकलेसाठी होती. आता ते नक्कीच झाले. शशिकलेबरोबर लग्न करण्याचा विचार होता. म्हणजे गडबडीत लग्न करून जावई

होण्याचा प्रयत्न होता म्हणायचा ? तिचे बी. ए. झालं पाहिजे. दुसरं म्हणजे कायमची नोकरी होती.... यादृष्टीने गायकवाडाचे लक्ष शशिकलेवर होते त्यात चूक काय होती ? मुख्य म्हणजे त्याच्या इच्छेला होकार भरणे, एवढेच तिच्या हाती होते ! इतकंच कशाला तिच्या सहानुभूतीचाही फायदा मिळणारच होता...

तिचा फायदा घेण्याच्या दृष्टीने तिला लहान मुलांच्या शाळेच्या संस्थेचा अध्यक्ष... एवढेच नाही तर पुढे पुढे महिला मंडळाचे कार्यवाह हे पदही त्याच्या घरी चालत येणार होते. एवढे पुरेसे होते. नगरपालिकेच्या सभासदांसाठी पुरुषानंतर पुढे कोण येणार ? पुढे काय काय पहाण्यास मिळणार...

विजयाबाईला खरी चिंता शशिकलेची ! शशिकला बी. ए. पास नव्हती. दोनवेळा परीक्षा देऊनही पास झाली नाही. इंटरसुद्धा दुसऱ्यावेळी पास झाली होती. अर्थशास्त्र बहुतेक कठीण असलं पाहिजे ! नापास मुलीला चांगला नवरा कसा मिळणार ? मुंबईच्या भावाने एकदोन स्थळं पाहिली होती. सगळे कारकून ! तिची परिस्थिती तेवढी चांगली नव्हती. असं झाल्यास—आता काय करायचे ? मुलीलाच जर मुलाप्रमाणे वाढवले तर काय होईल ?

मिसाळ मास्तराने सुरुवातीला आशा लावली. दगलबाजाला झोडलं पाहिजे ? पुढे आणखी शिकवणी घ्यायची सोडून त्याला लग्न करायला पाहिजे होतं ? ही मुलगी काळी—कुरूप. कोण बघून लग्न करायला पाहिजे ? इंटर नापास झाल्यामुळे एक वर्ष तिच्या डोक्यावर तसेच होते. वेडी कुठली ! कुणाचा प्रेमभंग, म्हणजे ! विजयाबाई म्हणाली 'सिनेमातल्या नटीप्रमाणे माझ्या शशीचा प्रेमभंग ? जा. त्या मूर्ख मिसाळ मास्तरासाठी कुणाचा प्रेमभंग होणार आहे ? शिकवणी लावून आपणच मुलीवर नजर ठेवायची ? त्यातून त्याचे लग्न झालेले. चांगलं आहे. महाशय, कुठे, किती लोकांना तोंड दाखविणार... समाधान करून घेऊन शशीला ती शिकवू लागली.

शशीची संगीतात प्रगती झाली पाहिजे. पण शेवटपर्यंत तिला शास्त्रीय संगीत जमलेच नाही. भावगीत तेवढे चांगले येत असे. इतकं पुरे होतं. त्या बळावरच नवोदित नाटक कंपनीत बोलावणे येईल ! पण बोलणार कोण ? विजयाबाईने शब्द टाकला, तर एखादा रोल मिळेल. सुरक्षिततेसाठी विजयाबाईने नाटकाची मेकप्रूम पाहून घेतली. शशी म्हणजे ? बस्स ? स्टेजवर गायचा शशीला खूप कंटाळा असे. तिला कंपनीत ठेवायचा विजयाबाईचा जोराने प्रयत्न सुरू झाला. ते शशीला नकोसे वाटत होते. तिला समजावून सांगितले तरी ती नाखूष दिसत होती. तिची वृत्ती संकुचित वाटत होती. त्यामुळे विजयाबाईला शशीचा भयंकर राग आला.

आताशा शशीची प्रकृती चांगली नव्हती. अशक्तपणा व तिचे सुकलेले तोंड बघून विजयाबाईला तिची भयंकर काळजी वाटू लागली. 'तिला विश्रांती पाहिजे. टॉनिक आणलं पाहिजे. 'एक्सरे' काढला पाहिजे, असे डॉक्टरांनी सांगितले. शशीने टॉनिक शेवटी घेतलेच नाही. 'एक्सरे' काढता येईल. मिशनच्या दवाखान्यात नेऊन तिला दाखविले.

'मला दवाखान्याची गरज नाही आई. जरासा अशक्तपणा आहे इतकंच. ऑफिसमध्येही खूप काम असतं. उगीच कशाला काळजी करतेस', असं ती म्हणाली.

शशिकलेच्या वृत्तीमध्ये काहीतरी विचित्र असा बदल घडत आहे, असे विजयाबाईला वाटले. विचारीची प्रकृती सुधारण्याऐवजी सारखी ढासळतच चालली होती, हे नक्की खरे होते.

आताशा शशी ऑफिसहून लवकर घरी येत होती. आल्यानंतर ती म्हणायची, 'आई थोडी कॉफी करून दे. माझी प्रकृती बरी नाही. ताप आला आहे.' विजयाबाईला खूप काळजी वाटली. तिने डॉक्टरला लवकर बोलावून आणले. डॉक्टरांनी शशीला तपासून पहिला प्रश्न विचारला, हिचा एक्सरे काढला काय ? '

'नाही. का ? काही संशय येतो का ?'

'तसं नाही. हे बघा. सांगता येणार नाही. फुपफूस वगैरे सर्व काही व्यवस्थित आहे. पण कुठं काही असेल तर निश्चित माहिती असण आवश्यक असतं !'

'डॉक्टर, मला दोनदा थुंकीतून रक्त पडलं', शशीने सांगितले.

'इतके दिवस मला सांगितलं नाही. बघा हो डॉक्टर !' विजयाबाई रागाने बोलली.

'इतकं घाबरण्याचं कारण नाही', एवढं बोलून डॉक्टर एका बाजूला गेले. विजयाबाई मागोमाग गेल्या.

'विजयाबाई, हे बघा. तिच्याबरोबर तिची देखरेख करण्यासाठी कोणीतरी पाहिजे. तुमच्याकडे कोणी पुरुष माणूस आहे ?'

'मुंबईत माझा धाकटा भाऊ आहे.'

'असं, त्याला बोलावून घ्या. घाबरण्याचं काही कारण नाही. सर्व बरोबर होईल. एकदोन वर्षे झाले असले पाहिजेत. तिला खूप दिवसांपासून ताप येत असावा. त्यामुळे खूप अशक्तपणा आला असला पाहिजे. टी. बी. सारखं काही तरी–तुम्ही घाबरण्याचे कारण नाही.'

'टी. बी.–' विजयाबाईच्या तोंडून शब्द बाहेर पडले.

'हं... म्हणजे घाबरण्याचे कारण नाही.'

'तिची नोकरी ?'

'राजीनामा द्या. तुमचा भाऊ आहे म्हणून सांगितलंत ना. मग काळजी कशाला ?'

डॉक्टर गेल्यानंतर विजयाबाई बेशुद्ध झाली. तिला जग शून्यवत वाटले.

दरवाज्यात उभ्या असलेल्या शशीला बघून 'शशी' म्हणून तिने डोळ्याचे पाणी पुसले. 'काय आई ?' शशी निर्विकारपणे बोलली. डॉक्टराने सांगितलेलं मला समजलं आई. काळजी करू नको. मला यापूर्वीच माहीत होतं...' शशीच्या चेहऱ्यावर एक विकट हास्य उमटले. त्या हास्यात एक प्रकारचा आनंद होता. तो विजयानंद होता. ■

[मूळ लेखक : डॉ. शांतीनाथ देसाई
कुलगुरु, कुव्हेंपु विद्यापीठ
शिमोगा / कर्नाटक
अनुवादक : प्रा. बाबुराव गायकवाड
मराठी विभाग,
कर्नाटक विद्यापीठ, धारवाड]

हिंदी कथा :

ग्रहणातलं गाठोडं

मूळ हिंदी लेखक : रज्जन त्रिवेदी
अनुवादार्थ प्रथम प्रारुप : शोभा उबगडे
अनुवाद संस्कार : श्रीपाद भालचंद्र जोशी

केवढी जरब होती, पूर्वी माझ्या नजरेत अन् आज...आज माझ्यावरच डोळे वटारले जाताहेत. बायकामुलांच्या नजरेतला विखार झेलता झेलता मी घुसमटतोय, अधिकाधिक हीन दीन होतोय, कळाहीन, उदास होतोय. आतल्या आत घुसमटणारी दृष्टी दुसऱ्याच्या डोळ्याला डोळा भिडवू देत नाही. आता केवळ सहन करणं, बस्, सहन करा...सहन करा. जणू काही सहन करण्यासाठीच केवळ माझं आयुष्य राहिलंय...

बघा, बघा कशी बेफिकीरपणे मला इथं बसवून गेलीय, सांगून गेलीय माझी वाट बघत चुपचाप इथं बसून रहा. ओह ! सगळे कसे माझ्या आजूबाजून येतात जातात, पण क्षणभर कोणी माझ्या जवळ बसेल तर शपथ, कोणी सरळ बोलेल तर नाव नको. खाणंपिणं असो, कपडेलत्ते असो, निजणं, उठणं, बसणं असो कशा कशावर माझा अधिकार राहिला नाहीय. सगळं करा दुसऱ्याच्या मर्जीनुसार. एक काळ माझाही होता पण आज मीच मला जणू पारखा झालोय, माझ्या शब्दांना आज किमतच नाही. कालाय तस्मै नमः । आज केवळ दुसऱ्याचं ऐकणं अन् सहन करत जाणं एवढंच. त्यांच्या दृष्टीनं ते एका रिकामटेकड्या माणसाला पोसतात, जिवंत ठेवतात, माझी आता कोणाला गरजच उरलेली नाही. म्हणून म्हणतोय ऐका, ऐका...

घरचं सुग्रास अन्न तुम्हाला आवडत नाही ना ! हो, कसं आवडेल ? तुम्ही लोक फुकटाचं खाणं खाऊन खाऊन सुग्रास अन्नाची किंमत विसरला आहात. आता तुम्हाला घरचं अन्न बेचव लागतं असंच ना ? ते काही नाही. चुपचाप समोर आलेलं अन्न पोटात ढकला. ते काही प्रेस कॉन्फरन्सचं फुकटाचं जेवण नाही आहे. तुम्हाला वाटतं की सर्वत्र खाऊ घालायलाच बसले आहेत लोक तुम्हाला. तुम्ही खाऊन त्यांना उपकृत करायचंय बस् ! चार ओळी खरडल्या त्याच्यासाठी की झाला समोरच्या माणसाचा उद्धार ! ह्या अशा फुकट्या निर्दय लोकांच्या घाणेरड्या वृत्तीमुळेच तुमचे नखरे वाढले आहेत. मिजास वाढलीय, अन्न बेचव लागतंय. वाहवा ! काय पण स्वभाव झालाय ! फुकटाचं खाणाऱ्यांची अक्कल जास्तच चढते, नव्हे झिंगते, लाज नाही वाटत बुद्धिमत्तेचा आव आणताना... ?

मनाचं पाखरू फडफडू लागतं.. फुकटचे निरर्थक शब्द सुऱ्यासारखे चिरत जातात आत. तो तिच्याकडे बघू लागतो, त्याचा चेहरा विझायला आलेल्या वातीच्या कंदीलाच्या काचेसारखा धुसर, धुरकट होतो, खाली झुकणारे डोळे तिची नजर चुकवू बघतात. आणि तिचे वाघिणीचे डोळे...

चावा घेता येत नाही आणि त्याची कणिक तिंबता येत नाही म्हणून ओठांनी चावतेय. केवढी तडफड. आयुष्यात कोणतीच उंची गाठू शकला नाहीत तुम्ही पण फुकटच्या सन्मानाच्या टेकड्या मात्र आपल्याभोवती उभ्या केल्यात. इतक्या खोल दऱ्या आहेत त्यांच्या दुसऱ्या बाजूला की एखाद्या धक्क्याने जर त्या दरीत कोसळलात तर अशा पाण्यात आपटाल की लाटांना आवाज देखील करणे आवडणार नाही. कदाचित् एवढंच म्हणून गप्प बसतील की जीवनभर दुसऱ्याच्या कुबड्यावर जगलेला फुकट्या जन्मभर दुसऱ्यावर ओझं होऊन जगला. कसला प्रामाणिक ? दुसऱ्यांवर ताशेरे झाडण्याने स्वतःतील भुक्कड, पोकळ माणूस लपतो कां ? आपल्याकडे येणारी प्रत्येक व्यक्ती आपल्याला खुश करण्यासाठी, सन्मान करण्यासाठीच आलेली असते असे समजणारा माणूस मनातून समाधानी नसतो. अशी ओझी कमी करायला हवीत, असा पाण्याचा तळ गाठून शोध घ्यायचा नाही तर जायचं कुठं ? ह्यांच्यासाठी आरडाओरडा करणं म्हणजे विद्वत्तेचे व्यर्थ प्रदर्शन करणं आहे. आरडाओरड्याने फांद्यांवरच्या

घुबडांना, वटवाघळाना आणि पोपटांना अस्वस्थ करणे आहे. तुम्ही तर म्हणत होतात की.. बोलता बोलता ती थांबली अन् मग बोलू लागली. आपल्या चर्चेतला इत्यर्थ हाच की प्रजातंत्रात घुबडांचंच अधिक्य असतं, वास्तव्य असतं. विद्यापीठात आणि अन्यत्र शिक्षणक्षेत्रात पोपटच तेवढे सापडतात आणि वटवाघळं तर संस्कृतीच्या क्षेत्रात ना धड आत जात ना धड बाहेर येत. मधल्यामध्ये लटकत राहतात. काय बरोबर म्हणते आहे ना मी ? असं म्हणून ती माझ्याकडे बघू लागली होती. मला सर्वत्रच संपूर्णपणे जखडून टाकू पहात होती, कसं सुटावं हिच्या तावडीतून ? काय सांगावं ? पेलाभर पाणी पिऊन पुन्हा ती बोलू लागली.

अशा भोंदूंची कशाला फिकीर करायची ? तुमच्यासारखी किती अर्धे-मुर्धे या प्रांतात भटकत असतात, उड्या मारत असतात, त्यातला एखादा चुकलेला योग्य ठिकाणी जात असेल तर चांगलंच. कोणाला काय मिळणार आहे फुकटेपणातून आणि खोट्या प्रतिष्ठेतून. किती उपकार कराल तुम्ही, किती दिलासा द्याल... बापरे ! काय डाफरतेय नुसती, अरे राम....

—आणि पेहरावाबद्दल तर काय सांगावं....शर्ट असो, पँट असो अथवा स्वेटर असो एखाद्या बुजगावण्याला घालावं तसं दिसतं. शरीराचा पिंजरा झाकून टाकलेला आणि हाडं म्हणजे जणू हँगरच...साऱ्या दुनियेत अक्कल शिकविणारे तुम्ही, सभ्यता कधी शिकणार ? धड कपडेदेखील घालता येत नाहीत. काळे निळे, मळकट–कळकट कपडे घालता. असं वाटतं की कोणीतरी गुन्हेगार आहात. काऊबॉय असोत नाहीतर तरुण असोत, असे कपडे तर घालत नाहीत. सभ्य लोकात जाता, काही शिका. उधारीवर गुजराण करणारे, फुकटाचं खाणारे, 'जिनीयस' असल्याचा आव आणणारे कुठवर स्वतःला दडवून ठेवणार ? आपला पोकळपणा लपविण्यासाठी लंब्या चवड्या, मोठ्या मोठ्या गोष्टी...लिहिता तरी येत कां ? काय येतं ?...आपलं रितेपण लपविणं म्हणजे आपल्या कोतेपणाचीच कहाणी आहे. मशाली पेटवण्याच्या गप्पा मारणारे, यांनी कधी मेणबत्ती तरी लावली आहे का ? आपल्या आत कधी डोकावून बघितलनं ?

शंभरात एखादाच लायक असतो. त्याच्या सावलीत बाकी सगळे जगतात आणि जन्मभर आपण प्रतिभावान असल्याचा भ्रम जोपासत बसतात. आजकाल मुलंसुद्धा काय बोलतात ठाऊक आहे ?...बाबा म्हणजे जादूगारच वाटतात, जोकर वाटतात सर्कशीतले...हे मळकट, कळकट काळे कपडे, चोर–उचक्क्यांसारखे दिसतात, नाही ?.. स्वप्नात ओरडतात, बॉक्स आईटम,... हेड लाईन...अठरा पॉइंट...ह्याच गोष्टी बडबडत असतात .. बाबांच्या जीवनात एखादी बऱ्यापैकी बाई आली असती तर तिनं त्यांचा हा गावंढळपणा साफ दुरुस्त केला असता...फालतू बडबड करण्यापेक्षा चार कामाच्या गोष्टी केल्या असत्या...

केवढ्या जोशात बोलत गेली होती ती. पुनःपुनः दात काय दाखवतेय्..बोलतांना हातवारे काय करते ! जणू नखांनी बोचकारण्यासाठी पवित्राच घेतेय. कशी लायाडून जातेय बघा, जणू काही नवरा नसून कोण्या परक्या माणसाशीच वागतेय. एवढा कोरडेपणा ! यांची आपल्याकडे पहाण्याची दृष्टी बदलावी एवढा मी नकोसा झालोय ?... डोक्यावर बसलेली बायको म्हणजे...

झोपायला खुर्चीच मिळाली का ? पलंग नाहीयेय ? जरा सरळ माणसासारखं झोपा. ग्रहण सुटल्यावर द्यायच्या जुन्या पुराण्या कपड्यांच्या गाठोड्यासारखं असे पाय पोटाजवळ घेऊन काय झोपता ? भीती वाटते का ? कोणी मारायला तर येत नाही आहे ? काही आणायला बाहेरही पाठवीत नाहीयेय ? किंवा बटाटे सोलायलाही सांगत नाहीयेय ? तुमचा काही उपयोगच राहिला नाही. थोड्या थोड्यावरून वाद काय घालता, शब्द काय बदलता–चला, झोपा नीट ! हं ! पांघरूण घ्या हे...

झोपण्यावरून भाषण द्यायला लागते, आधीच पिचलेल्याला सारीकडूनच टोचलं जातं; एवढीशी काय पिली पण तेच धरून ठेवलंय. पदोपदी वाग्बाण सोडत असते. जशी कूस बदलतात ना तशा एका रात्रीत सर्व गोष्टी, सगळे आदर्श

बदललेले बघितलेत मी. एक फटकारा बसला की सारे साफ, मग उरतो तो पोटाचा प्रश्न. नीट पाय पसरून झोपा म्हणजे कूस बदलायला सोपं जाईल, कपडे बदलायला सोपं जाईल, कधी कशी टोपी फिरवाल, बदलवाल काही भरोसा नाही... तिच्या फुत्कारापुढे काय बोलू शकणार ?

नेहमी फुकटाचं खाल्लं, फुकटाची दारू प्यायलात, आता सारखं घाबरलेले, भेदरलेले, उदास उदास काय असता ? घाबरू नका, आपलंच घर आहे हे. दारू कशीही असो नरकाचं दार उघडून देणारीच असते, शिरान्‌शिरा ढिल्या करून सगळा देहच विसविशीत करणारी. आणखी वर बुद्धीजीवी म्हणून मिरवा.

तिच्यासमोर काय बिशाद की डोकं वर काढीन ? असं वाटतं की मणामणाचे दगड डोक्यावर ठेवले आहेत. असं वाटतं टेकडीच्या बाजूलाच खाई आहे, जरासाही काही बोललो, हललो तर...प्रत्येक वेळी हेच, असंच ऐकवते ती. जणू काही मी माणूस नाहीच, नवरा नाही. ग्रहणात द्यायच्या जुन्या पुराण्या कपड्यांचं गाठोडं जणू. जीवनाचं हे गाठोडं खुंटीवर टांगल्याप्रमाणे टांगला गेलोय मी...

तिच्या किती गोष्टी खऱ्या आहेत, किती खोट्या ? याचा विचार करण्याची, समजून घेण्याची इच्छा आहे. पण इच्छा असूनही उत्तर कुठे मिळते ? प्रत्येक वेळी शरमेनं झुकलो. प्रत्येक वेळी हे जमतच नाही असं नाही ? कधी कधी वाटतं की टाईपराईटरवर अथवा क्रीडवर अकारण असलेल्या बातमीसारखे आहोत आपण. ती जशी फाडून फेकून दिली जाते तशीच माझी स्थिती. असं तर नाही की चुकलेला मजकुर समजून माझ्याकडून चूक घडायच्या अगोदरच फाडून टाकला जातो मी ? हे सगळं मी कोणाला समजावून सांगू ? कोणी समजून घेऊ शकतो ? कोणी तयार तरी आहे का ऐकायला ? मी घरात कोंडलाच गेलोय की नाही ? मी केराची टोपली आहे की ग्रहणाचं ते गाठोडं ?

माझा पगार आणि मला मिळालेली प्रशस्ती नेहमी मी तिच्या हाती देत होतो.

माझ्या एका वार्तापत्राने मंत्रीमंडळाचा थरकाप होतो, मुख्यमंत्र्यांचा वारंवार फोन येतो आणि असं वाटू लागतं की आम्हीच आहोत कॅबिनेटचे मार्गदर्शक, नव्हे सर्जकच. आतंकवाद्यांची समस्या असो, की खाडी युद्ध, पाकिस्थानातील बलात्काराचं प्रकरण असो की रशियातील स्वतंत्र राष्ट्रांचं वृत्त, इस्राईल आणि अराफतमधील वाद असो, जनतापार्टीचं विघटन असो, पन्नास लाखाची एम्. पी. विकत घेण्याची गोष्ट असो अथवा मंत्रीमंडळातील नवी नियुक्ती असो, एखाद्या आयोगाची नेमणुक असो वा बहुराष्ट्रीय कंपनीबाबतची भूमिका असो, कॉफी हाऊसच्या टेबलावर या सर्व प्रश्नांचा आम्ही निकाल लावून टाकतो. आमची लेखणी नसेल तर देशोदेशीचे प्रश्न सोडविलेच जाणार नाहीत. मोठ्या देशांचा क्लब असणारा राष्ट्रसंघ हा केवळ फॅशनपरेडचा अड्डा होईल, तरीही काही बदमाश लोक म्हणतात की आम्हीच साऱ्या समस्यांचं मूळ आहोत. कोण समजावणार यांना, त्यांच्यात आणि यांच्यात किती फरक आहे ते ! अन् जाणूनच घ्यायचं असेल तर समाजशास्त्रज्ञांच्या एखाद्या आयोगाचीच नियुक्ती करावी लागेल. आमच्या हुशारीचं वर्णन आम्हीच कसं करावं ? कोणाकोणाला सांगावं...

कॉफी हाऊसच्या टेबलावर कुरकुरीत वेफर्स चुरचुरतानाच तिकडे कुवेतमध्ये बॉंब फुटतात, परस्परांचे पेले भिडतांना, त्यात 'मिस इंडिया' स्थानापन्न होते. जगातल्या कुठल्याही कानाकोपऱ्यातला प्रश्न असो, संसदेतील सभागृहात जाण्याअगोदर प्रथम आमच्याच टेबलावर येणार

एम्बसीची पार्टी...
अशोकातील डिनर...
इंटरकॉंटिनेंटलमधलं लंच...

–आमच्या प्रेस कॉन्फरन्ससाठी आवश्यक असतं, चीनचे पंतप्रधान असोत वा अमेरिकेचे प्रेसिडेंट, आमची प्रतिभा नाकारू शकत नाहीत. आमच्यामधले निष्ठा बदलणारे आयाराम–गयारामचं महत्त्व पटवून देत असतात. आता तर निष्ठा बदलणं असो की सिगारेटचा ब्रॅंड, आमच्या दृष्टीने सारखंच. आम्हालाही जगायचंय, आमच्या पालनकर्त्यांना खुश ठेवायचंय...

कूस बदलण्यावरून ती चेष्टा करते. हिला काय

समजणार या जगाची रीत कोणा कोणाला कसं कसं पटवावं लागतं, फुकट नाही होत सारं...

बुद्धिमत्ता नसती तर माझा आवाज कोणी ऐकला असता ? कोणी विचारलं असतं ? प्रेसमध्ये आणि प्रेसच्या बाहेर किती अदबीनं वागतात लोक माहिती आहे ? मी कोणाकोणाकरता काय काय नाही केलं, कित्येकांना यु. जी. सी. ची फेलोशिप मिळवून दिली, बेकारी दूर करवली, कित्येकांची अकादमीची पारितोषके द्यायला लावली, कित्येक लेखकांना समोर आणलंय, कित्येकांना आयोगात पाठवून रस्त्यावर बसून शेंगदाणे खाण्याची त्यांची सवय घालवली, कित्येक अर्धवट इंजिनियर्सना, उद्योगपतींना टेंडर द्यायला लावली. सट्टा, दारू, स्मगलिंग करणाऱ्यांना त्या वातावरणातून काढून मेडिकल कॉलेजेस, इंजिनियरिंग कॉलेजेस मिळवून दिली. शिक्षणसंस्था काढून द्यायला लावल्या. सन्मानानी जगायला शिका लेकहो, पिढ्यान्‌पिढ्या असंच राहून चालणार नाही. प्रधानमंत्री होण्यासाठी ह्या गोष्टी पुढे कदाचित उपयोगी पडतीलहो. देशाची संपत्ती स्वातंत्र्यानंतर पांढऱ्या टोपीखाली गेली याची काळजी करत बसू नका नुसते. बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत कशाला मग ? सत्तेच्या राजनीतीने जीवनाचा स्वर्ग तुमच्या स्वाधीन केला आहे, हे स्वर्ग तुम्हाला किती सहजरित्या मिळवून दिले. त्या स्वर्गातून बरसणारे सोने लुटा... सोने.

असंतुष्टांची उगाच काळजी नको, सौदा आम्ही पटवून देऊ. हां, एवढंच करा की शांतीवन किंवा राजघाटावर जेव्हा कधी जाल तेव्हा चेहरा निरागस करा... बस —

ती मला बसवून गेलीच. आणि माझी सारी दुनिया माझ्या डोळ्यासमोर वाचतोय मी...

किती दबदबा आहे माझा, किती प्रभावी आहे मी, हे मला इथे विशेषत्वानं सांगायलाच हवं आणि....

कित्येकांना मी संसदेत प्रश्न विचारायला शिकवलं, आपल्याच लोकांना पदावर चिकटवा तेच उद्या कामी येतील हा मंत्र दिला .. कोणी टाळलं माझं म्हणणं ? कोणी नाही... कित्येक उद्योगपती सल्लामसलतीसाठी माझ्या दाराशी बसून असतात. बघितलं नाहीत ? कितीतरी मोटारी तुम्ही माझ्या घरापुढे बघितल्या आहेत. जरा आठवा एम. पी.ची खरेदीविक्रीची वेळ येते तेव्हा... कितीतरी मोटारी माझ्या घरासमोर बघितल्या असतील, आठवा जरा... किती मोठमोठ्या अक्राळविक्राळ भयंकर ज्वालामुखींना, उधाणलेल्या जलप्रपातांना गाठोड्यात बंदिस्त केलंय् ?

हिला का त्रास होतोय ? मला वाटतं एम्बसीच्या गाड्या अर्ध्या रात्री मला सोडून जात असत, मी काहीतरी बडबड करीत असे, हाय सोसायटीच्या पार्ट्यांहून परतत असे, तेव्हा, माझी किंमत काय ? हिला सारंच खोटं वाटतं. तिच्यातल्या स्त्रीला मोठं करण्यासाठी तिलाही तर पार्ट्यांना घेऊन गेलो आहे ना मी. एम्बसीत गेल्यावर उद्योगपतींशी, संसदसदस्यांशी, राजदूतांशी हस्तांदोलन करायला अशी काही घाबरायची की जणू एखाद्या एडस्‌ग्रस्ताशीच हात मिळवतेय. किती समजावलं, पण छोट्या छोट्या माणसात जगायची सवय झालेला पिंड नाहीच बदलू शकत ना ! कपड्याचा, विद्वत्तेचा, प्रतिष्ठेचा कितीही देखावा करा, व्यर्थ ! नेमकं हेच—ह्याच कारणामुळं माझ्या प्रतिष्ठेची, माझ्या उंचीची ईर्षा वाटते हिला.... बाई आपल्या मनाला सांग, जरा उघड्या डोळ्यांनी बघ की. तुझा नवरा 'किंगमेकर'च्या पात्रतेचा आहे. तुझ्यासाठी मात्र सारं दिवास्वप्नच. त्याला मी काय करणार ? माणसं शेवटी विचाराच्या पातळीवरूनच ओळखू येतात... सर्व समजावून सांगितल्यावरही तिला कळलं ? अडाणी आणि अपरिपक्व माणसांना सत्ता गाजवायला मिळाली की लंब्या चवड्या बाता मारणं आलंच. ही देखील त्यालाच बळी पडलेली. मला काय माहीत नाही ?...

सारा गोंद आणि कातरीचा विकास ! पेस्टिंग म्हणजे काय चमत्कार आहे ! सारं ठाऊक आहे मला, तुमच्या सान्निध्यातच राहिलेय ना ! दुसऱ्याला कमी लेखणं म्हणजे श्रेष्ठत्वाचं ढोंग आहे. तुम्ही असे कोणते तीर मारलेत ? गोंद आणि कातरीशिवाय दुसरं काय ? मुलांचे बाप आहात, आता तरी आपली जागा ओळखा. तुमच्या

वर्तमानपत्राचा मालक तीन महिन्यांचाच नव्हे तर तीन वर्षांचा पगार एखादे दिवशी तुमच्या हातावर टिकवेल आणि एखाद्या रेल्वेच्या डब्यात बसवून देईल अथवा उपोषण करायला बोटक्लब-वर जागा शोधायला पाठवून देईल. तेव्हा बघें मग किती अॅम्बॅसॅडर्स, राजकारणी नेते, किती मिनिस्टर विचारायला येतात ते ? तेव्हा कळेल तुमच्या प्रतिभेचं आणि दबदब्याचं ढोंग. स्वर्ग-प्राप्तीच्या भ्रमात जगण्यापेक्षा खडबडीत जमिनीवर जगणं बरं, कमीत कमी तुमच्या उपयोगी पडेल ती. आपली वाटेल. तुमचे अस्तित्व टिकवून ठेवील. अहो, सभ्यता, राजनैतिक वैभव, सांस्कृतिक क्षेत्रातली महानतेचे 'ऑलराऊण्डर', एका झटक्यात भ्रमनिरास करून टाकेल तुमचा तो अशा भ्रमातच माणूस हरवून बसतो स्वत.ला. आपलीच ओळख विसरतो, आतातरी ओळखलं स्वत:ला तरी खूप झालं, सारं काही मिळेल आम्हाला. आपल्या खडबडीत जमिनीची, वांग्याच्या भरीताची, बाजरीच्या भाकरीची ओळख पटली तरी खूप झालं, तीच आहे तुमची भूमी. भ्रमात वावरणारे आपल्या भविष्याचा देखील सत्यानाश करतात, तो तरी वाचवा...

आणि हे सारं ऐकून मी हसायचो.

हिला काही सांगणं म्हणजे गाढवापुढे वाचली गीता... हिचा आपला रवंथ चालूच. तिच्या पावलावर पाऊल टाकून मुलंही आता हिला बघून अपमान करायला लागली आहेत माझा ! सदोदित तिच्याच भोवती असतात. कपडेलत्ते घ्यायचे असोत, पैसे हवे असोत किंवा मोटरसायकल ! सगळी लाडी-गोडी हिच्याजवळ. माझ्या जणू सावलीचाही त्यांना विटाळ होतो त्यांना. येता जाता खोलीत डोकावून बघतात एवढंच. जसा मी चोवीस तास पिऊनच पडला असतो जणू. मुलांचं वागणं माझ्या आकलनापलीकडचं आहे. बापाजवळ पाच मिनिटे बसायला काय लाज वाटते ? अरे मुर्खांनो, त्या पोरींच्या मारूतीमधून झोकांड्या देत उतरता तेव्हा तिनं भिरकावलेला 'फ्लाइंग किस' सुद्धा झेलता येतो, गाडीचे दिवे तरी बंद करून घेत जा उजेडात काय काय म्हणून दिसत नाही. हे सारे काय आदर्श म्हणायचे ? बापाचं पिणं म्हणजे गुन्हा आणि तुमच्याकडे, तुमच्या वागण्याकडे मात्र हिनं डोळझाक करायची. दुसऱ्याच्या डोळ्यातलं कुसळ बघण्याअगोदर आपल्या डोळ्यातल्या मुसळाकडे तर लक्ष द्या. आपला एखादा तरी सद्गुण दाखवून द्या. या नशेत काही तरी दिसतय् का ? बापाला टाळता. घाणेरडा माणूस समजता त्याला ..यांना हिचीच फूस नाही तर काय ? खाल्ल्या घरचे वासे मोजताय...अरे ही सगळी काय तुमच्या मायची कमाई आहे ? स्त्री प्रगती करते तेव्हा तिला नको असतं का स्वत:चं सुख ? दुसऱ्यावर ताशेरे झाडण्याअगोदर अंतर्मनात डोकावून बघा जरा बेटयांनो...ह्या बापाला देखील एखादा 'हॅलोऽ' फेकत जा.

अशा अवस्थेत आता उठून चालू लागेन मी तर काय गोंधळ घालील ही. एवढ्या तेवढ्या गोष्टीं-वरून डाफरेल. जणू शेपूट हालवायचं विसरून गेलेल्या एखाद्या कुत्र्याला दटावते आहे. तिच्या लेखी नवरा म्हणजे गुळाचा गणपती, गुलाम सम-जते तिच्या हुकुमाचा. मी भिंतीवर लावलेला फोटो देखील नाही ! माझी घेतली जाणारी काळजीच माझा तुरुंगवास झालीय्. सारे कसे पाय आपटत निघून गेले आहेत. कोणी ढुंकूनतरी बघितलं ? यांच्याजवळ बाप उरलाय किती ? जगण्याचा मार्गच जेव्हा अरुंद होतो तेव्हा प्रेम, विश्वास यांची जागा तिरस्कार होतो. अविश्वा-सानी जीव गुदमरू लागतो. नात्यांना काही अर्थच उरत नाही...

तिला जेव्हा सुगावा लागला... होऽ, तिला सुगावा लागला, माझे सहयोगी सिन्हा मद्रासला झालेल्या हत्याकांडाची बातमी मिळविण्यासाठी गेले होते. तिथेच त्यांची मुलगी शिकायला होती. एकाचवेळी दोन्ही कामं झाली असती. मॅनेजरनी हॉटेलच्या त्यांच्या सूटमध्ये कॉलगर्ल पाठवली. त्यांचीच मुलगी निघाली ती. बरं तर बरं लाइटरच्या उजेडांत पोराचं तोंड दिसलं त्यांना, नाहीतर बुद्धिजीवींच्या जातीला आणखी एक कलंक लागलाच असता. सिन्हा तिला वेळच्या-वेळी हवा तेवढा पैसा पुरवू शकले असते तर तिच्यावर 'कॉलगर्ल' होण्याचा हा प्रसंग

झाला असता ? अवास्तव इच्छा-आकांक्षा काय वाटेल ते करायला भाग पाडतात माणसाला. या इच्छा-आकांक्षांचा काही दोष असतो का ?

तिची काय चूक, काय बरोबर... ह्याचा अनेकदा विचार करूनही उत्तर मिळत नाही. कधी कधी तर वाटतं की मी म्हणजे क्रीडवरची नको असलेली बातमी आहे. किंवा चुकीचा टाईप झालेला मजकूर ! जो न वाचताच फाडून, बोळा करून खाली ठेवलेल्या केराच्या टोपलीत फेकून दिला जातो मी तसाच न बघितलेला मजकूर. कचऱ्याची टोपली...

सतत गुरकावत रहाण्याशिवाय हिला काय येतंय ? जराही विचार करीत नाही. सिन्हा असो अथवा आणखी कोणी बुद्धिजीवी. बौद्धिक परिश्रमांनी ते लवकर थकत असतात. आणि आलेला शीण घालवण्यासाठी मग बाई–बाटली नको का ? त्याच्या भरवशावरच ते घंटोंशी चर्चा करीत बसतील. आपल्या अक्कल हुशारीची दवंडी पिटतील. कवी दिनकरांच्या कवितेत वक्षांच्या पुष्पकुंजात मृत्युचे पथिकही थबकतात, विसरून जातात स्वत:ला. मग आम्हाला काय एवढाही अधिकार नाही ? बुद्धिजीवींना विश्रांती, विरंगुळा नको का ? शांतता नको ?...

त्या सिन्हाच्या प्रकरणावरून नेहमी दूषणं देत असते ही. अरे, बातमीच्या किंवा जाहिरातीच्या मोबदल्यांत आम्ही बायांकडून काही घ्यायचंच नाही का ? अन् तेवढ्यानं काय आमचं अध:पतन झालं...आमच्या संपूर्ण व्यवसायाचं...अशा लोकांसाठी काय काय लक्ष्मणरेषा आखायच्या ? त्या प्रकरणापासून आमच्याकडे येणाऱ्या-जाणाऱ्याला हिनं साधं चहा–पाणी देणं तर दूरच, धडपणे बोलायला सुद्धा ती तयार नसते. वरून धाडकन दरवाजा आपटून बडबडायला लागते की असल्या निपत्तर लोकांच्या प्रतिष्ठा सांभाळू ? मला शक्य असतं तर ह्यांना श्वास देखील घेऊ दिला नसता. केवळ वाव घालून आपलं सारंच खरं करू पाहतात हे. यांच्यातला प्रत्येक जण, साधा प्रूफ रीडर किंवा साफ-सफाई करणारा सुद्धा, पत्रकार, संपादक म्हणवून घेण्याच्या मोहापासून कधी दूर राहिलाय ? कुठवर मोठेपणा पांघराल ? त्या झुलीखाली आहे ते देखील नाहीसं होऊन जाईल अशानं श्रेष्ठत्वाची मानसिक भूक कोणत्या दुटप्पीपणाचा परिणाम आहे ?

कसं टाकून दिलंय् मला...करकचून बांधून टाकलंय् एखाद्या गाठोड्यासारखं...ग्रहणात द्यायच्या कपड्याच्या गाठोड्यासारखं...

ती देते ते खातो. ती देईल ते घालतो, जिथे म्हणेल तिथेच अंग टाकतो. या दारूनं नसानसा अशा काही शिथिल करून टाकल्या आहेत की मुळापासून उखडल्यासारखा झालोय. अर्धवेडाच झालोय्. याची जाणीव तरी आहे का हिला ? प्रेस सोडून घरी बसलो तेव्हा पासून कुठं आहेत माझी बायका–मुलं ? घरातल्या खिडक्या, दरवाजे, पडदे, पलंग, कप–बशा, मांजर, कुत्रे काही तरी माझं आहे का ? मी त्यांचा काही तरी राहिलोय ? जिनियस असण्याचा गर्व होता म्हणे ! प्रत्येकजण माझ्यापासून दूर जातोय्. मुलांना तर वाटतंय् की बाप म्हणजे जणू सडलेल्या मासाचा लगदा आहे. याच्यापासून दूर राहणंच बरं नाहीतर या लगद्यातून निघालेल्या विषाक्त कीटाणूंचा संसर्ग व्हायचा आपल्याला. अरे ज्याच्या देहांतून आलात त्याच्यावरच थुंकताय्...

अशा लाचार आयुष्याला कंटाळून वस्तऱ्यानं गळा कापून घ्यायचा प्रयत्न केला होता. किती शिरा कापल्या गेल्या, किती रक्त वाहिलं, काही आठवत नाही. साऱ्या घाणीपासून मुक्त होत चाललो होतो. कशात खोल बुडत होतो ठाऊक नाही. डोळे उघडले तेही हॉस्पिटलमध्येच ! ही म्हणत होती...

गळ्याला पट्ट्या बांधल्या होत्या. औषधांचा वास येत होता. उदबत्त्यांच्या सुवासात तो दडपला जात होता. मुलांच्या टेपरेकॉर्डवर रविशंकरची सतार वाजत होती. मी डोळे उघडलेले पाहून डॉक्टर खोलीबाहेर जाऊ लागले आणि ही नर्सला सांगत होती. मूर्खपणावर काही इलाज नाही बाई ! सोन्यासारख्या जीवाशी कोणी खेळतं का ? यांना काय कमी आहे. आणि आमचा तरी

काही विचार ? कुठला सूड उगवत होते आमच्यावर कोण जाणे ? का जिवावर उठले कुणास ठाऊक ? मला काय काय नाही बघावं लागत ? काय नाही भोगावं लागत ? तुम्ही तर बघताच आहा ग्रहणातल्या गाठोड्यासारखं ह्यांना फेकून तर दिलं नाही ना... ■

मूळ हिंदी लेखक– रज्जन त्रिवेदी/सीताबर्डी, नागपूर ४४००१२/अनुवादार्थ प्रथम प्रारूप– शोभा उबगडे/अनुवाद संस्कार– श्रीपाद भालचंद्र जोशी

[प्रसिद्ध हिंदी लेखक श्री. रज्जन त्रिवेदी यांच्या ह्या मूळ हिंदी कथेचे हे प्रथम प्रकाशन. युगवाणीच्या या अंकातच ही कथा प्रथम प्रकाशित होत असून अद्याप ती मूळ हिंदीतही प्रकाशित व्हावयाची आहे.]

‘युगवाणी’ मिळत नाही ?

युगवाणीचा अंक पोस्टाने पाठविल्यानंतर तो मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी येतात. तसेच अपुऱ्या पत्त्यामुळे/पत्ता बदलल्यामुळेही अंक परत येत असतात. परिणामी बराच डाकव्यय वाया जाऊन संस्थेला भुर्दंड सोसावा लागतो. सर्व सभासदांना/वर्गणीदारांना युगवाणीचा अंक नियमित पाठविला जात आहे याची विशेष काळजी आम्ही आमच्याकडून घेत आहोच. आपणाकडून कृपया पुढील सहकार्य मिळावे.

- ज्या महिन्याचा अंक असतो त्याच्या पुढील महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत तो आपल्याला मिळावा ही अपेक्षा असते. तरीही अनेकदा आर्थिक अडचणी, कार्यालयीन समस्या, व पोस्टाच्या दिरंगाईमुळे तो आपल्यापर्यंत पोहोचण्यास बराच वेळ लागतो. तेव्हा त्या महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत थांबूनही आपल्याला अंक न मिळाल्यास, प्रथम आपल्या गावच्या/विभागाच्या पोस्टात चौकशी करा–लेखी तक्रार द्या व तिची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी आम्हाला पाठवा.
- अंक शिल्लक असल्यास आपल्याला तो नक्कीच पाठविण्यात येईल.
- आपण आपला पत्ता पूर्ण व अचूक नोंदला आहे काय ? पत्त्यात झालेला बदल, कार्यालयाला त्वरित कळविण्याची आपण कृपया काळजी घ्यावी. शक्यतोवर घरचाच पत्ता द्यावा, संस्थेचा/कार्यालयाचा देऊ नये.
- आपली वर्गणी संपलेली नाही ना ? आपले नाव नियमित सभासदांच्या/वर्गणीदारांच्या यादीत आहे याची खात्री करून घ्यावी.
- पत्ता बदलल्यामुळे परत आलेला व पुढील अंक सभासद/वर्गणीदारांकडून कार्यालयाला नवीन पत्त्यांची रीतसर सूचना मिळेपर्यंत पुन्हा पाठविले जात नाहीत.

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ

फिलिप लार्किन : दहा कविता

प्रस्तावना व अनुवाद : प्रा. कुमार भूमकर

[कुमार भूमकर हे औरंगाबादच्या सरस्वती भुवन महाविद्यालयात इंग्रजीचे प्राध्यापक. अलीकडेच मँचेस्टर विद्यापीठातून एम्. ए. आणि एम्. फिल्. करून ते मायदेशी परत आले आहेत. दोन वर्षांसाठी ते तिकडे होते. फिलिप लार्किन हा कवी त्यांच्या पदव्युत्तर परीक्षेसाठी तयार केलेल्या शोधनिबंधाचा विषय होता. लार्किनच्या दहा कवितांचा मराठी अनुवाद आणि त्यासंबंधीचे हे टिपण त्यांनी युगवाणीसाठी खास लिहिले आहे.]

इलियट, पाउन्ड, आणि येट्स ह्या श्रेष्ठ आणि ज्येष्ठ कवींच्या नंतर इंग्रजी काव्याच्या परंपरेत फिलिप लार्किन ह्या कवीचे नाव महत्त्वाचे ठरते. उच्च दर्जाचे स्थान आणि विशेष प्रसिद्धी लाभलेल्या थोड्या कवींमध्ये लार्किनचे नाव घेता येईल. त्याचे काव्य म्हणजे एक आगळा वेगळा परंतु तत्कालीन मन:स्थितीचे दर्शन घडविणारा एक प्रातिनिधिक आवाज ठरतो.

लार्किनचा जन्म इंग्लंडच्या कॉव्हेन्ट्री या गावी सन १९२२ मध्ये आणि मृत्यु १९८५ मध्ये झाला. त्याच्या मृत्युनंतर परत एकदा वाचक, आणि टीकाकार ह्यांचे लक्ष त्याच्या काव्याकडे वेधले गेले आहे. त्याच्या वशिष्टयपूर्ण काव्यामुळे त्याप्रकारच्या काव्याला एव्हाना 'लार्कीनस्क' हे विशेषण वापरण्याची प्रथा रूढ होत आहे. लार्किनचे काव्यसंग्रह खालीलप्रमाणे : (१) नॉर्थ शिप (१९४५), (२) द लेस डिसीव्ह्ड (१९५५), (३) द व्हिटसन वेडींग्ज (१९६४), आणि (४) हाय विन्डोज (१९७४). या चार संग्रहातील कविता तशा एकूण १७०. शिवाय जवळ जवळ ८० अप्रकाशित कविता होत्या. ह्या सर्व एकत्रित करून आता अँन्थनी थ्वेट ह्या लार्किनच्या मित्र—कवीने कलेक्टेड पोएम्स (१९८८) ह्या ग्रंथात प्रसिद्ध केलेल्या आहेत. ह्या संग्रहात तशा एकूण २४२ कविता. अनेक समकालीन कवींच्या मानाने लार्किनचे काव्य लिखाण फार कमी प्रमाणाचे वाटते. पण त्यांचा दर्जा फार उच्च मानला गेला आहे. आपल्या थोडक्याच काव्याने लार्किनने इंग्रजी काव्य परंपरेवर आपला वेगळा ठसा उमटला आहे.

लार्किनला 'भर बाजारातील दु:खी जीव' (द सॅडेस्ट हार्ट इन द सुपर मार्केट) असे म्हटले गेले आहे. वास्तविकता, प्रामाणिकपणा, दैनंदिन भाषा, मृत्युने ग्रासलेल्या अन् व्याकुळ परंतु भयभीत न झालेल्या मनाचे दर्शन, प्रादेशिकता, आधुनिकता, तंतोतंत व चातुर्यपूर्ण भाषा हे त्याच्या काव्याचे विशेष गुण. धर्माची आवश्यकता परंतु प्रस्थापित धर्माचा अव्हेर तो करतो. मृत्यु हे अंतीम मानण्यात लार्किन न संकोचता व्याकुळ झालेला वाटतो. मृत्युपुढे कोणताही हिरॉइझम चालत नाही हे मानल्यामुळे लार्किन अँन्टी-हिरो वाटतो. विसाव्या शतकातील रटाळ, कंटाळवाणे, एकाकी, आणि बकाल जीवन ह्या काव्यात स्पष्ट आणि वरवर सरळ व सोप्या वाटणाऱ्या भाषेत लार्किन सांगून जातो. लार्किनच्या काव्यात मृत्यु सतत, व्यापक, आणि तीव्रतेने जाणवतो. लार्किनचे काव्य मृत्युचा ध्यास घेतलेल्या मनाचे उत्तम दर्शन घडविते. लिरिसिझम आणि प्रार्थना ह्या दोन प्रकारचे उत्तम मिश्रण सुद्धा ह्या काव्यात घडलेले दिसते. ■

१. विन्टर नॉक्टर्न [१९३८]

करडं पांघरूण ओढलेली सांजवेळ येतेय,
भकास आणि ओसाड शेतं पार करून,
चोरट्या आणि गार पावलांनिशी
पाऊस गळतोय रटाळपणे
रात्रीची बोटं विणतायत जाळं,
सरपटणाऱ्या धुक्याचं, मृत्युसारख्या शांत
जंगल आणि जगावर.
आकाश सुद्धा शांत आहे,
ग्रॅनाइट सारखं कठिण आणि मृत्युसारखं अटळ.
फिकट डबकं शांतपणे उभं, लव्हाळ्यांनी वेढलेलं
आणि झुकलेल्या झाडांची झालर असलेलं,
जसं कांही ते फक्त वाट पहातंय
गहरी डिसेंबरमधल्या हिवाळ्या रात्रीची.
संपलेल्या उन्हाळ्याच्या थडग्यावरून
वाहणारा जलद वारा
त्या डबक्याच्या शांत चेहऱ्यावर
लाटांचा तरंग आणतोय.
अजूनही पाऊस पडतोच आहे
झुकुन जंगल शोक करतय
गडद रात्र सरपटत येतेय, जगाला एकाकी करत.

■

२. व्हाय डिड आय ड्रीम ऑफ यू लास्ट नाईट [१९३९]

कां मी तुझे स्वप्न पाहिले काल रात्री ?
आता सकाळ केस मागे सारतेय
करड्या प्रकाशानिशी,
आठवणी आघात करतायत
अंतरमनाच्या गाभाऱ्यात
तोंडात चपराक मारल्याप्रमाणे :
ढोपरावर उंचावून मी एकटक पहातोय
खिडकी पलिकडलं अंधुक धुकं.

कितीतरी विसर पडलेल्या गोष्टी
परततायत अनोळखी वेदनांबरोबर,
– जसे अजूनही पत्रं येतच रहातात
बऱ्याच वर्षांपूर्वी
घर सोडून गेलेल्या व्यक्तीच्या नावावर.

■

३. टू अ व्हेरी स्लो एअर [१९४६]

सोनेरी मेंढ्या दूध पाजतायत,
आणि मुखांत त्यांच्या समाधानाला आश्रय.
मी आनंदाने स्तुती करतोय
ह्या कलहाने ग्रासलेल्या वेळेची,
त्या मेंढ्यांच्या उल्हसित लोकरीच्या वजनाने.

विभागलेल्या टेकड्या झुकलेल्या,
सूर्य माखतोय
कपाळ, हात, आणि पाय.
सर्व वातावरण
जणू आपले अकृत्रिम वस्त्र,
आपली लोप पावणारी स्थिती.

■

४. गोइंग [१९४६]

दूरवरून एक संध्याकाळ येऊ पहातेय
शेतं पार करून, ह्या आधी न पाहिलेली
आणि जी दिवे उजाळत नाही.

दुरून रेशमी वाटणारी ही संध्याकाळ
जेव्हा पायावरून उरापर्यंत चालून येते
कोणतंही समाधान
ती आपल्याबरोबर आणत नाही.

कुठे लुप्त झाला तो वृक्ष
ज्याने जखडले होते पृथ्वी आणि आकाश ?
काय आहे माझ्या बाहूंखाली
जे मला जाणवत नाही ?

कोणत्या वजनाने जखडले आहेत माझे बाहू ?

■

५. ॲन् एप्रिल संडे ब्रिंग्ज द स्नो [१९४८]

एप्रिल मधला एक रविवार घेऊन येतो बर्फ
आणि प्लमच्या झाडांवर आणतो
पांढऱ्या ऐवजी हिरवा बहर.
एक दोन तासात तो वितळून जाईल.

आश्चर्य आहे मी तो वेळ घालवला
ह्या कपाटापासून त्या कपाटापर्यंत
येरझारा घालण्यात.
आणि तो जॅमचा साठा इकडून तिकडे हलविण्यात
तो जॅम तू ह्याच झाडांच्या
फळांपासून बनविला होतास,
पुढचा उन्हाळाभर पुरून उरण्या इतका.

तू काही आता तो जॅम
खाण्याकरिता येणार नाहीस.
कांचेच्या मागे, सेलोफेनच्या खाली,
तुझा शेवटचा उन्हाळा अजून बाकी आहे
गोड परंतु निरर्थक, आणि कधीही परत न येणारा.

■

आश्चर्यचकीत करतोय.
लवकरच वसंत ऋतु येईल,
लवकरच वसंत ऋतु येईल–
आणि मला, ज्याच बालपण
एक विसरलेला कंटाळा,
वाटतय एका बालकाप्रमाणे,
जो मोठा झालाय
प्रौढपणाशी समझोता करत,
ज्याला उमजत नाही
विलक्षण हास्या व्यतिरिक्त,
आणि सुरुवात करतोय
आनंदी जगावयास.

■

६. मॉडेस्टीज् [१९४९]

शब्द, कोंबडीच्या पंखांसारखे साधे,
असत्य सांगत नाहीत,
ते वस्तूंना अवास्तव सुशोभित करत नाहीत,
कारण ते लाजाळू असतात.

विचारांचे झिजून उरतात अर्थ साधे,
राज्याराज्यातील व्यवहारातील नाण्यांप्रमाणे,
तरीही ते बाकी राहतात.

पंधाडं उगवण्याची अपेक्षा करत नसतात,
तरीपण थोड्या थोड्या अंशाने
एखादं फूल उगवतं
कुणाच्या नजरेस न पडता.

■

७. कमिंग् [१९५०]

लांबट संध्याकाळी
थंड आणि पिवळा प्रकाश
शांत घरांना न्हाऊ घालतोय.
थ्ररा गातोय
लॉरेल वाढलेल्या कुंपणातील
लांब आणि निष्पर्ण बागेत.
त्याचा सोललेला ताजा आवाज
विटांनी बांधलेल्या घरांना

८. हू कॉल्ड लव कॉन्करिंग [१९५०]

कोण म्हणालं प्रेमाला जिंकावू
जेंव्हा त्याचं मधूर फुल
इतक्या सहजपणे सुकुन जातं
जीवनाच्या आंबट गल्लीबोळातून ?

फुलं नसलेलं परंतू दर्शनी पंधाड
स्वार्थीपणे पसरतंय,
पांढरी शुभ्र नववधू डुबतेय तिच्या शय्येत,
आणि सूक्ष्म कुरळया लालसा

सूर्याला झोंबून खाली खेचतायत
दुपारच्या तीन वाजण्याच्या दरम्यान;
जेंव्हा काळोखाचा गर्द अंगरखा
शहराला ताठर करतोय.

■

९. वॉन्टस् [१९५०]

ह्या सगळ्याच्या पलीकडे, इच्छा एकाकीपणाची
कितीही आकाश काळवंडलं निमंत्रण पत्रिकांनी
कितीही आपण छापील
लैंगिक दिशांच्यामागे गेलो
कितीही कुटुंबाचा झेंडयाखाली फोटो घेतला–
तरीही ह्या सगळ्याच्या पलीकडे,
इच्छा एकाकीपणाची.

ह्या सगळ्याच्या खाली
विस्मरणाची इच्छा दबलेली :
कॅलेंडरच्या कलात्मक तणावाशिवाय,
आयुर्विमा, तक्तेवार उर्वर कर्म,
मृत्युपासून फिरविलेली महागडी नजर—
ह्या सगळ्याच्या खाली
विस्मरणाची इच्छा दबलेली.

■

---

१०. हाउ टु स्लीप [१९५०]

गर्भातील मूल
की थडग्यातील संत—
कोणासारखी मी निद्रावस्था घेऊ ?
नितल चंद्र बघतोय निरखून
आकाशाच्या मागून,
ढग परतले आहेत
आपल्या घरी, मेंढ्यांप्रमाणे
चमकणारे काळाचे थेंब
बसतोय त्यांचा तालात मेळ,
मी वळून सरळ झोपतोय
हातांची घडी घालत,
कॉन्व्हेंटमधील मुलगा अथवा पोप
अशाच दिमाखात असतात,
आणि त्यांची मनं शांतपणे सपाट झालेली
समुद्रकिनाऱ्यावरील वाळूप्रमाणे.

माझे विचारही असेच :
पण निद्रा चालूच असते.
मी कूस बदलत शरीर आखडून घेतो
गर्भातल्या मुलाप्रमाणे—
कारण निद्रा, मृत्युप्रमाणे
आत्मसात करावी लागते गर्वाशिवाय,
होकार मिळवावा लागतो निसर्गाचा,
मनाचा ताण ढिला सोडावा लागतो,
आणि शरीराचा ताठरपणा विसरावा लागतो.

■

प्रा. कुमार भूमकर, पश्चिम सरस्वती कॉलनी,
औरंगाबाद : ४३१ ००१

अनुक्रमणिका

रात का अकेला सफर

मराठी अनुवाद : मनोहर जाधव

१

आणि कित्येक वेळा
हजारो मैलांच्या प्रवासानंतर
तुझ्या दाराशी येऊन
मला हे जाणवू लागलंय्
की आपल्यातील अंतर
वाढलं आहे
आणखी किंचित्.

□

२

रात्री पुन्हा उठलेल्या एका वादळानं
गळून पडली हरेक नात्याची पानं.
उन्मळून पडले प्रत्येक शपथेचे प्रचंड वृक्ष
परंतु हृदयाच्या कप्प्यात
उभे असलेले
तुझ्या आठवणीचे खोड
स्तब्धच राहिले.

□

३

विरहातील तप्त उन्हात
कोमेजलेल्या
तुझ्या माथ्यावर
अश्रुचा एक ओलसर थेंब
मला
आठवली पुन्हा
मीलनाची ती रात्र.

■

४

आजदेखील
अंगणातील बागेत उमललं होतं
एक इवलंसं फूल
कुणीच पाहिलं नाही.
आपण सर्व
आपल्याच रस्त्यात
काटे विखुरण्यात
मग्न होतो.

□

५

संपूर्णतया कुणीही कुणाचं नसतं
ही गोष्ट
नियतीदेखील निरंतर
आपल्या परीनं सांगत असते.
पृथ्वीही रोज
अर्धी सूर्यासोबत
नि अर्धी चंद्रतारकांसोबत
राहत असते.

□

[मूळ कवी : वेदप्रकाश ' वटूक '
मूळ कवितासंग्रह : ' रात का अकेला सफर '
मराठी अनुवाद : प्रा. मनोहर जाधव
धनाजी नाना विद्यालय, फैजपुर
४२५ ५०३, जि. जळगाव]

सर्जनशील साहित्याचा अनुवाद

सर्जनशील साहित्याच्या अनुवादासंबंधाने मराठीला अद्याप बराच प्रवास करावयाचा आहे. अनुवादित सर्जनशील वाङ्मयाला अद्यापही मराठीत हवा तसा प्रतिसाद लाभलेला नाही. याची अनेक कारणे आहेत. प्रत्यक्ष अनुवाद देखील सकस नसणे हे देखील एक कारण.

अनुवाद कसे असावेत, कसे करावेत यासंबंधाने मराठी भाषेतून फारसे शास्त्रीय मार्गदर्शन उपलब्ध नाही. मात्र मराठीत त्या दृष्टीने प्रयत्नच केल्या जात नाहीत असेही नव्हे.

नॅशनल बुक ट्रस्टच्या वतीने गेल्या दशकात असाच एक महत्त्वपूर्ण प्रयत्न पुणे मुक्कामी आयोजित ग्रंथप्रदर्शनप्रसंगी झालेला होता. अनुवादासंबंधाने महत्त्वपूर्ण अशी शास्त्रशुद्ध चर्चा घडवून आणणाऱ्या त्या चर्चासत्रात सहभागी होण्याचा योग युगवाणी-च्या विद्यमान संपादकांनाही आलेला होता. या चर्चासत्रात डॉ. चंद्रशेखर जहागीरदार यांनी 'सर्जनशील साहित्याचा अनुवाद' या विषयावर जे अत्यंत मार्मिक विचार मांडले ते अनुवादक तसेच विशेषत्वाने मराठीत अनुवादाशी कर्तव्य असणाऱ्या सान्यांनीच आवर्जून बघावेत या हेतूने संदर्भ म्हणून त्यांच्या निबंधातील काही भाग युगवाणीच्या वाचकांकरिता येथे देत आहोत.

मराठीतील सर्जनशील वाङमयाच्या अनुवादाची परंपरा १९ व्या शतकापासून सुरू होते. एका विशिष्ट ऐतिहासिक परिस्थितीच्या संदर्भात ही परंपरा सुरू झाली. समर्थपणे स्थिरावलेल्या ब्रिटिशांच्या वसाहतवादातून जित आणि जेते यांच्या संपूर्णत: भिन्न असलेल्या भाषा व संस्कृती यांच्या संकराचा काळ सुरू झाला. जेत्यांची संस्कृती ही युरोपीय प्रबोधनकाळातून बाहेर पडलेली संस्कृती होती. भौतिक शास्त्रे व तंत्रज्ञान यांचा विकास, औद्योगिकरण इत्यादींचा वारसा तिला होता. समृद्ध ललित साहित्याची एक सातत्यशील परंपराही तिला होती. या नवीन संस्कृतीबद्दल वाटणारे कुतूहल, तिचा परिचय करून घेण्याची वाढती प्रवृत्ती यातूनच अनुवादाच्या कार्याला गती मिळाली. हे कार्य एवढ्या मोठ्या प्रमाणावर झाले की १९ व्या शतकातील अनुवाद हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय ठरावा.

जित आणि जेते यांच्या विशिष्ट ऐतिहासिक चौकटीमुळे परकीय सर्जनशील वाङमयाकडे पाहण्याचा १९ व्या शतकातील दृष्टिकोन हा बव्हंशी भारलेल्या स्वरुपाचा होता.

मराठीतील सर्जनशील वाङमयाच्या रूपांतराची परंपरा पाहिली की अनुवादासंबंधीच्या काही समस्या स्पष्टपणे उभ्या राहतात. एक म्हणजे अनुवादस्रोत आणि अनुवाद लक्ष्य भाषा (Source language and target language) यातील मूलत:च विकट असणाऱ्या समानतेच्या प्रश्नाला रूपांतराच्या माध्यमात बरेचसे सोपे उत्तर मिळते. मूळ कृतीतील आशय, त्याला बिलगून असणारे संस्कृतीचे अंग आणि या दोहोंना प्रकट करणारी शैली—या सर्वांना अनुवादलक्ष्य भाषेत समानत्व कसे शोधावे याचे काही सोयीस्कर, वाचकाभिमुख अंदाज रूपांतरकाराला बांधता येतात. विशेषत: मूळ भाषेची संस्कृती अपरिचित असेल तर असे वाचकाभिमुख अंदाज रूपांतरकाराला मानसिक आधार देणारे ठरत असावेत. अँटनी आणि क्लिओपाट्रा, मॅक्बेथ, ऑथेल्लो, इयागो अशी नावेच सांस्कृतिकदृष्ट्या

दूरस्थ ठरत असल्याने वीरमणी व शृंगारसुंदरी, मानाजीराव, महेश्वर, सोमनाथ अशी नावे वापरल्याने अनुवादातील समानत्वाची एक पूर्वअट म्हणून वाचकांशी काही प्रमाणात जवळीक गृहीत धरता येते.

वाचकसन्मुखता कशी असते याची ही काही मजेशीर उदाहरणे आहेत. शि. म. परांजपे यांनी मॅक्बेथचे मानाजीराव असे रूपांतर केले. त्यातील प्रसिद्ध पोर्टर-सीन चा अनुवाद करताना देवडीवाल्याच्या तोंडी, दारू पिणाऱ्या व मास खाणाऱ्या तत्कालीन सुधारकांची निंदा करणारी वाक्ये टाकली आहेत. खरी गोष्ट अशी आहे की १९ व्या शतकापासून सुरू असलेल्या सर्जनशील वाङ्मयाच्या या रूपांतर पद्धतीमुळे मराठीत अनुवादाची सकस, जोरकस अशी परंपरा उभी राहू शकली नाही. महादेवशास्त्री कोल्हटकर, देवल आणि वि. वा. शिरवाडकर या तिघांचीही ऑथेल्लोची रूपांतरे उपलब्ध आहेत. देवलांनी झुंझारराव ही रंगावृत्ती मूळ कोल्हटकरांच्या नाटकावरून तयार केली. तर शिरवाडकरांनी काव्यात्मता हा गाभा मानून ऑथेल्लोचा अनुवाद केला. काव्यात्मतेवर लक्ष ठेवून रूपांतर केल्याने मूळ नाटकातील गौर आणि निग्रो यातील संघर्षाच्या सांस्कृतिक चौकटीचे रूपांतर आर्य-द्रविड असे झाले. याचा परिणाम असा होतो की आपल्या संपूर्ण नाटय-विश्वात शायलॉक, ऑथेल्लो, कॅलिबन या सारख्या अधिकृत संस्कृतीच्या बाहेर असणाऱ्या व्यक्ती व त्यांच्या उपसंस्कृती यांच्या संदर्भात संघर्षाची नाटयबीजे पाहणारा शेक्सपीयर वाचकांपासून दुरावला जातो. रूपांतरामागील सर्जक हेतू स्पष्ट नसल्यामुळे असे होते. जिथे हे हेतू स्पष्ट असतात तिथे रूपांतरे आपल्या मर्यादां-पर्यंत यशस्वी होतात असे दिसते. उदाहरणार्थ, "करी मनोरंजन जो मुलांचे । जडेल नाते प्रभूशी तयाचे" अशा सर्जक हेतूनी प्रेरित होऊन साने गुरुजींनी हयुगोच्या ला मिझराबलचे दुःखी, फाउस्ट चे 'नदी शेवटी सागराला मिळते,' लॅंपलाइटरचे, 'मिरी', अशी सोपी रूपांतरे संस्कारक्षम बालवाचकांसाठी केली. स्वीकारलेल्या उद्दिष्टांच्या मर्यादेपर्यंत ही रूपांतरे यशस्वी आणि लोकप्रिय देखील ठरली आहेत, पण असे काही अपवाद वगळता, आपल्या रूपांतर परंपरेत रूपांतराचे सर्जक हेतू फारसे स्पष्ट कधीच नव्हते. शेक्सपीयर, मोलीएर, इब्सेन या सर्वांनाच आपण रूपांतर माध्यमातून पाहिले. सरळ अनुवादाचीच परंपरा राहिली असती तर अभिरुचीचा इतिहास, समीक्षा, वाङमयीन प्रभाव या सर्वांबाबत निराळे प्रश्न कदाचित आपल्याला विचारता आले असते.

१९ व्या शतकातील सर्जनशील वाङमयाच्या रूपांतराची ही परंपरा कादंबरीच्या क्षेत्रातही दिसून येते, फरक एवढाच की कादंबरीतील रूपांतराची ही परंपरा अभिरुचीच्या इतिहासाशी अधिक स्पष्टपणे जोडता येते. ज्या वास्तववादी परंपरेतून कादंबरी या वाङमयप्रकाराचा जन्म झाला तिची मुळे पक्केपणाने रुजलेली नसल्याने अद्भुतरम्य, विलक्षण किंवा फार तर बोधप्रद कौटुंबिक अशा कादंबऱ्यांची रूपांतरे झाली. रेनॉल्डस, गोल्डस्मिथ, मिसेस हेन्रि वुड ही या संदर्भात सहज आठवणारी काही नावे आहेत. पण त्याच काळात डिकन्सच्या एकाही कादंबरीचे भाषांतर झाले नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे. १९ वे शतक आपण मराठी कादंबरीच्या उदयाचा काळ म्हणून पाहातो. राजवाडयांनी तर या कालातील कादंबरी समकालीन पाश्चात्य परंपरेच्या संदर्भात पाहिली. इंग्रजीशी परिचित नसलेल्या वाचकाला आजही ते अशक्य आहे कारण सुसंगत, नियोजित स्वरुपात कादंबरीची अनुवादपरंपरा अजूनही नाही. सर्वांटिस, तुर्गेनेव यांची काही भाषांतरे उपलब्ध आहेत. पण गोगोल, दोस्तोयवस्की यांचे नाहीत. मध्यंतरी "युसिस"च्या पाठिंब्यामुळे काही अमेरिकन कादंबऱ्यांचे अनुवाद झाले. पण तो पाठिंबा संपताच ते बंद झाले. समकालीनत्वाने सामाजिकतेला सर्वाधिकपणे सामोरा जाणारा कादंबरीसारखा सर्वसमावेशक गद्य वाङ्मय-प्रकार भाषांतराचे काही विशेष प्रश्न उपस्थित करतो. विविध वर्णन शैली, बोलीभाषा, निवेदन-पद्धती, वाक्यबंधाचे विविधांगी स्वरूप व त्यातून निर्माण होणारी एकूण संहिता तसेच सामाजिक सांस्कृतिक आचार-या सर्वांसाठी अनुवाद लक्ष्य

भाषेत मोठ्या प्रमाणावर समानत्व शोधण्याची प्रक्रिया कादंबरीच्या अनुवादात दिसून येते. अनुवाद करायचा तो मुळाबरहुकूम, मूळ वाचकांसाठी अभिप्रेत होता त्या स्वरूपात करायचा का, आजचा वाचक व त्याची भाषा यांना डोळ्यासमोर ठेवून करावयाचा? पाश्चिमात्य अनुवादाचा इतिहास पाहिला तर या दोन भूमिकांतून एकेका अक्षरकृतीची विविध भाषांतरे झालेली दिसतात. आपल्याकडे मूळ भाषेतील कृतींचा उपयोग न करता त्यांच्या इंग्रजीतील अनुवादाचाच आधार वापरला असल्याकारणाने या प्रश्नाची संगोपांग चर्चा अजून झालेली नाही.

अनुवादाची प्रक्रिया ही दोन भिन्न भाषिक कलाकृतींमध्ये शब्द, रूप आणि अर्थ अशा तीन पातळ्यांवर समानत्व शोधण्याचा प्रयत्न करते. केवल अर्थाने असे समानत्व दोन भाषांमध्ये शक्य नसते, तसे तर ते एकाच भाषेतील दोन उच्चारासाठी नसते. तरी देखील असे म्हणता येईल की, चांगल्या अनुवादाच्या प्रयत्नात समानत्वाचा हा शोध काही सर्जक हेतूंनी प्रेरित झालेला असतो. या सर्जक हेतूंच्या संदर्भात अनुवादाच्या इतरही काही प्रेरणा मग लक्षात येतात. एक म्हणजे एखादा अनुवाद हा तो अनुवादक स्वतः ललित लेखक असेल तर त्यांच्या संवेदनशैलीच्या स्वरूपाशी आणि एकूण वाङ्मयीन व्यक्तित्वाशी संबंधित असतो. अशा ठिकाणी लेखक हा इतर वाङ्मयपरंपरेच्या अथवा इतर समान धर्माच्या संदर्भात स्वतःची व्याख्या करू पाहातो. हा एक प्रकारे आत्मशोधच असतो. आणि प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष रीतीने तो त्या लेखकाच्या सर्जनशीलतेशी संबंधित असतो. दिलीप चित्र्यांनी केलेले हार्टक्रेन, एझ्रा पाऊंड, वॉलेस स्टीव्हन्स, आक्टाव्हियो पाझ यांच्या कवितांचे अनुवाद हे अशाच हेतूने प्रेरित झालेले आहेत. स्वतःची संवेदनशैली व भाषिक भान इतर परकीय कवींच्या संदर्भात व्याख्येय करणे तसेच स्वतःची काव्यपरंपरा इतर परंपरांच्या संदर्भात तपासून पाहाणे अशा दुहेरी सर्जक हेतूमधून हे अनुवाद निर्माण झाले आहेत. फाउस्ट, किंग लिअर यांचे करंदीकरांनी केलेले अनुवाद, मायकोवस्की आणि इब्सेन याचे सदानंद रेग्यांनी केलेले अनुवाद—ही सर्व सर्जक हेतूंनी प्रेरित झालेल्या अनुवादाची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. १९ व्या शतकापासून सुरू झालेल्या रूपांतराच्या दुर्बल परंपरेपेक्षा अशा सर्जक हेतुतून निर्माण झालेल्या प्रामाणिक, सकस अनुवादाची परंपरा सातत्याने व जोरकसपणे चालू राहणे आवश्यक आहे. त्यातूनच मराठी वाङमय मर्ढेकरांनी म्हटले त्या अर्थाने पुरेसे परिपुष्ट होऊ शकेल.

वर उल्लेखिलेल्या सर्जक हेतूंचा आणि संबधित प्रेरणांचा अभाव असेल तर एकूण अनुवाद प्रक्रियेलाच एक प्रकारचा कामचलाऊपणा येतो, याचीही उदाहरणे आपल्याला दिसून येतात. पु. ल. देशपांडयांची भावुक मध्यमवर्गीय संवेदनशैली आणि हेमिंग्वेचा रोखठोक, कणखर वास्तववाद ही वस्तुतः दोन विरुद्ध टोके होत. त्याचप्रमाणे ब्रेख्तची सामाजिक बांधिलकी आणि खानोलकरांचा काव्यात्म, प्रतीकवादी पद्धतीने व्यक्त होणारा व्यक्तिवाद या दोहोत अजिबात साम्य नाही. तरी सुद्धा पु. ल. हेमिंग्वेचा अनुवाद करतात आणि खानोलकर कॉकोशियन चॉक सर्कलचे भाषांतर करतात. सर्जक हेतूंच्या अभावामुळे अशा अनुवादांना फार तर चांगल्या हौशीपणाचे मूल्य असते.

यात भर म्हणून की काय पण सर्जनांतर (Transcreation) हा प्रकार काही ठिकाणी सुरू झाल्याचे दिसते. मराठीत अजून तो फारसा प्रस्थापित झालेला नाही. पण तो तसा होऊ नये याचीही काळजी घेणे आवश्यक आहे. कलकत्याच्या पी. लाल यांच्या रायटर्स वर्क-शॉप तर्फे सरोजिनी व सुनिती नामजोशी यांनी केलेली गोविंदाग्रजांच्या काही कवितांची सर्जनांतरे पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली आहेत. आपल्या छोटेखानी प्रास्ताविकात सर्जनांतरकार म्हणतात की संपूर्ण कृती म्हणून गोविंदाग्रजांची कविता यथातथ्यपणे वाचकांपर्यंत जावी यासाठी "मूळातील अनावश्यक ओळी गाळल्या आहेत, काही ओळींच्या मूळ अर्थात बदल केला आहे; इंग्रजीत उचित वाटणार नाहीत असे शब्द व प्रतिमा गाळल्या आहेत, आणि काही वेळा मूळ कवितेतील

प्रतिमांना पर्यायी प्रतिमा वापरल्या आहेत किंवा नवीन प्रतिमांची भर घातली आहे." एवढे सगळे सर्जनांतर केल्यानंतर "to convey the poem as a whole as accuratcly as possible" हा अनुवादकांचा हेतू कसा सिद्धीस जातो हा प्रश्न उरतोच. मग असे दिसून येते की, "गुलाबी कोडे" या मूळ १५ कडव्यांच्या कवितेचे सर्जनांतर चार कडव्यात Riddle in Pink असे होते, "ओढून जवळी ऐकविला तिस मुकाच कानात" या ओळीचे सर्जनातर "And smiling he placed a kiss in her ear." असे होते. प्रामुख्याने रूपांतराची परंपरा असलेल्या मराठीत सर्जनांतराची ही फॅशन सुरू झाली तर आपण आहे ती देखील अनुवादाची परंपरा घालवून बसायचो. एवढयाच हेतूने सर्जनांतराच्या या फुटकळ प्रयत्नाची काहीशी गंभीर दखल इथे घेतलेली आहे.

सर्जनशील वाङमयाच्या अनुवादाबाबत एक सर्वसाधारण विधान करता येईल. ते असे की भाषांतरे ही त्या त्या देशी भाषिकाने (Native speaker) केलेली असावीत. याची कारणे विविध आहेत. एक तर ज्या भाषिकांसाठी हे अनुवाद होतात त्या भाषांच्या वाङमयीन संस्कृतीच्या गरजा त्यातून स्पष्ट होतात. उदाहरणार्थ, १९ व्या शतकात बाहेरून आलेल्या मिशनऱ्यांनी बायबलची विविध भाषांतरे केली. पण नाटक व कादंबरी या गद्यवाङमयप्रकारांची फारशी परंपरा नसलेल्या एतद्देशीयांनी मात्र शेक्सपीयर, रेनॉल्डस इत्यादींना आपल्या भाषेत आणले. दुसरे म्हणजे देशी भाषिकाला ज्या भाषेत अनुवाद करायचा तिचे ग्रांथिक, प्रमाण, औपचारिक, बोलीभाषिक, इत्यादि अनेक स्तर माहीत असण्याची शक्यता केव्हाही जास्त असते. मराठीतील सर्जनशील वाङमयाचा अनुवाद इतिहास पाहिला तर आपला सर्व व्यवहार एकतर्फी आहे हे लक्षात येते. आपण इंग्रजीतील ग्रंथांचे अनुवाद करायचे आणि मराठी वाङमयाचे परकीय भाषेत अनुवाद देखील आपणच करायचे असा प्रकार चालत आलेला आहे. 'गारंबीचा बापू'चा अनुवाद केलेल्या आणि सध्या भाऊसाहेबांच्या बखरीचा अनुवाद करीत असलेल्या रेसाईडचा एखादा अपवाद वगळता ही परिस्थिती सर्वत्र दिसून येते. काही वर्षापूर्वी रॉबर्ट ब्लाय या अमेरिकन कवीने टागोरांच्या मूळ अनुवादावरून कबीराची कविता नव्याने इंग्रजीत आणली. त्यामागच्या त्यांच्या संवेदनशीलतेच्या आध्यात्मिक गरजा लक्षात येऊ शकतात. पण मराठी भाषिकांनी स्वत: इंग्रजीत केलेले अनुवादाचे प्रयत्न फार तर परिचयपर अशा स्वरूपाचे असतात. ज्यांच्यासाठी हे अनुवाद केलेले असतात त्यांच्या गरजांचा फारसा संबध इथे येत नाही. दिलीप चित्र्यांच्या An Anthology of Marathi Poetry सारखा सुसंगत, नियोजित प्रयत्न सोडल्यास अशा स्वरूपाचे बहुसंख्य अनुवाद हे हौशीपणाच्या पातळीवर असतात. यातील काही अनुवाद तर मूळ लेखकाविषयी गैरसमज व्हावा इतके वाईट असतात. उदाहरणार्थ, निसिम एझिकेल आणि वृंदा नावर यांनी केलेला इंदिरा संतांच्या कवितेचा अनुवाद. ही परिस्थिती बदलली पाहिजे हे खरे, पण त्याचबरोबर हेही खरे की, ती बदलण्याची कारणे ही वाङमय-बाह्य राहणार. आर्थिक सत्ता म्हणून जपानचे आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्व वाढताच अमेरिकेत जपानी वाङमयाच्या अनुवादाची लाट सुरू झाली. खुद्द आपल्याकडेच स्वत: अमेरिकेने पाठिंबा देताच अमेरिकन वाङमयाच्या अनुवादाचा वेग वाढला यावरून अनुवाद प्रक्रियेतील बिगर वाङ्मयीन घटकांचे महत्त्व लक्षात येते.

सर्जनशील वाङमयाच्या अनुवादाची ही परंपरा आपण परकीय भाषा व साहित्य यांच्या संदर्भात पाहिली. भारतीय भाषांच्या संदर्भात अनुवादाची परंपरा तुलनात्मक दृष्ट्या जास्त जोमदार आहे असे म्हणावे लागेल. याची कारणे अनेक आहेत. एक म्हणजे परकीय भाषा व साहित्याचे अनुवाद करताना मूळातच असणाऱ्या सांस्कृतिक भिन्नतेमुळे रूपांतराची परंपरा फोफावली तिची इथे गरज भासली नाही. उलट सांस्कृतिक एकसंधतेमुळे भारतीय भाषांच्या संदर्भात अस्सल अनुवादाचीच परंपरा निर्माण झाली. तिची उदाहरणे आपटे व वरेरकर यांनी

केलेल्या अनुक्रमे बंकिमचंद्र व शरच्चंद्र यांच्या अनुवादापासून ते थेट आज अशोक शहाण्यांपर्यंत दिसून येतात. बंगालीच्या अनुवादाची ही उदाहरणे असली तरी हिंदी, कन्नड, उर्दू इत्यादि भाषांबाबतही अनुवादाची फार सातत्यशील नसली तरी चांगली परंपरा आहे. भारतीय भाषांमधील सर्वच नसल्या तरी बऱ्याचशा आधुनिक अक्षरकृती आज आपल्याला अनुवादरूपात वाचता येतात. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारतीय भाषांच्या संदर्भात असणारी अनुवाद परंपरा बऱ्याच प्रमाणात दुतर्फी आहे. परकीय सर्जनशील वाङ्मयाच्या अनुवादात जशी ती एकतर्फी आहे तशी ती इथे नाही. खांडेकरांसारखा एखादा लेखक तामीळ, गुजराथी, हिन्दीमध्ये मोठ्या प्रमाणात अनुवादित होतो हे या दुतर्फी परंपरेचेच एक उदाहरण आहे. तिसरे म्हणजे एखादा लेखक संपूर्णपणे भाषांतरित करण्याची परंपरा इथे काही प्रमाणात का होईना पण दिसून येते. आपट्यांनी केलेला संपूर्ण बंकिमचंद्र हा अनुवाद किंवा वरेरकरांनी केलेली शरच्चंद्रांची भाषांतरे ही याची चांगली उदाहरणे आहेत. आपल्या प्रत्येक भाषेच्या वाङ्मयीन संस्कृतीच्या भारतीयत्वाची ओळख करून घ्यावयाची असेल तर अशा अनुवादाची आणि तिला पूरक अशा अनुवाद समीक्षेची परंपरा जाणीवपूर्वक जोपासल्या गेली पाहिजे. ■

[नॅशनल बुक ट्रस्टने सुमारे एक दशकापूर्वी पुणे येथे आयोजित केलेल्या परिषदेत वाचल्या गेलेल्या या निबंधातील काही मजकूर उपलब्ध न झाल्याने हा निबंध येथे संपादित करून प्रकाशित केला आहे. नॅशनल बुक ट्रस्ट व डॉ. चंद्रशेखर जहागीरदार यांच्या सौजन्याने हे प्रकाशित करीत आहोत.]



समकालीन हिंदी कविता

द. पं. जोशी

प्रा. चंद्रकांत पाटील यांनी "समकालीन हिंदी कविता" हा मराठी ग्रंथ नुकताच प्रकाशित केला आहे. प्रा. पाटील यांची हिंदी भाषेतील कवितेसंबंधीची आस्था समीक्षक-अनुवादक या दुहेरी नात्याने फार जुनी आहे. स्वत: ते मराठीतील प्रथितयश कवी आहेत. १९७३ मध्ये त्यांनी "प्रतिष्ठान" द्वै-मासिकाचे दोन अंक हिंदी कवितेच्या संदर्भात संपादित केले होते. श्रीकांत वर्मा यांच्या कवितांच्या अनुवादाचे त्यांचे पुस्तक "मगधनंतरच्या कविता" या नावाने प्रसिद्ध झालेले आहे. या दीर्घकालीन वाङ्मयीन ऋणानुबंधाचा आता पुढचा टप्पा त्यांनी या ग्रंथाद्वारे गाठला आहे. एक मराठी वाचक म्हणून त्यांच्या या वाङ्मयीन खटाटोपाबद्दल आपण त्यांचे कृतज्ञ असले पाहिजे.

या ग्रंथाद्वारे दिसणारे हिंदी कवितेचे, समकालीन हिंदी कवितेचे रूप कसे आहे ? हा दिसायला 'एक' प्रश्न असला तरी तो अनेक प्रश्नांना जन्म देणारा आहे. ज्यांचा मराठी कवितेशी, आधुनिक व नव्या कवितेशी कमी अधिक प्रमाणात परिचय असेल त्यांच्या मनात तुलनात्मक संदर्भात अनेक प्रश्न उपस्थित होणे शक्य आहे. ज्यांना मराठी कवितेचा संदर्भ बाजूला ठेवून केवळ हिंदी भाषेतील कवितेचा आस्वाद घ्यायचा आहे त्यांच्याही मनात हा संग्रह, म्हणजे अनुवादित कविता; प्रस्तावना वगैरे अनेक प्रश्न निर्माण करील. मुख्य म्हणजे या ग्रंथाचे यश, वैशिष्ट्य, त्रुटी सगळ्याच बाबी प्रश्न निर्माण करणाऱ्या आहेत. माझ्यापुरते मी या ठिकाणी त्यातील कांही प्रश्न उपस्थित करणार आहे. किंवा मला जे प्रश्न वाटतात त्यांची उत्तरे कवितांच्या आधारे मीच शोधणार आहे. हे करताना हेतुत: मी क्षणभर समकालीन मराठी कविता बाजूला ठेवणार आहे. बाजूला ठेवणे एवढ्यासाठी म्हणायचे की तिचा माझ्या मनातील संदर्भ मला प्रयत्न करूनही विसरता येणार नाही. पण तो कटाक्षाने टाळणार आहे. ते तुलनात्मक विवेचन म्हणजे सकृत्दर्शनी सोपी वाटणारी तुलनात्मक अभ्यासाची गोष्ट उभयसाहित्य रचनेला अन्याय करणारी ठरेल. या संग्रहात प्रा. चंद्रकांत पाटील यांनी हिंदी-मराठी कवितांच्या बाबतीत तुलना केलेली नसली तरी प्रस्तावनेत त्यांनी "हिंदी काव्य समीक्षा" व "मराठी काव्यसमीक्षा" यांचे संक्षिप्त तुलनात्मक विवेचन केले आहे. मुक्तिबोधांनी नवीन कविता लिहिली तसाच महत्त्वाचा काव्यविचार मांडला. मर्ढेकरांनीही कविता लिहिली व काव्यविचार मांडला. दोन्ही भाषांतील कवितेचा विकास त्या त्या अनुरोधाने होत गेला. ही भूमिका प्रा. चंद्रकांत पाटलांची आहे. त्याबद्दल या निबंधात मला काहीही म्हणायचे नाही. या ठिकाणी माझी भूमिका या कवितेने निर्माण केलेले वाङ्मयीन प्रश्न समजावून घेणे ही पहिली बाब, प्रश्नांच्याही पुढे जाऊन कवितेचे जास्तीत जास्त आकलन करणे दुसरा भाग, अशा दुहेरी स्वरूपाची आहे. मुळात ही क्रिया एकाच वेळी घडते पण विवेचनाच्या सोयीसाठी त्याला दोन भाग म्हणायचे एवढेच. या क्रियेत काही गोष्टी नोंदविल्या पाहिजेत. आपण सगळेजण सगळ्या प्रकारचे हिंदी भाषेतील लेखन रूचीने वाचतो, तेव्हा हिंदी-अहिंदी हा भेद मला निरर्थक वाटतो. फक्त हिंदी भाषेतील काव्य माझ्या निरंतर व्यासंगाचा विषय नाही. परिचयापेक्षा कविता अधिक काही मागत असते. ते मी आतापर्यंत हिंदी कवितेला दिलेले नाही याबद्दल त्या कवितेची क्षमा मागतो व "न्यून ते पुरते" करण्याच्या भूमिकेने तिचे स्वागत करतो. हे स्वागत करताना माझ्या मनाची पाटी बव्हंशी कोरी आहे. म्हणजे हिंदी काव्य परंपरेचा, कवीविषयींचे ग्रह, आ[illegible] पूर्वग्रह यांचा कसलाही ठसा माझ्या मनावर नाही. कुणाशी फारशी ओळख नाही. त्यामुळे कविता आणि मी यांच्या साक्षात्कारात कसलाच [illegible] माझ्या मनात संभवत नाही.

या पुस्तकात प्रा. चंद्रकांत पाटील यांनी १९६० नंतरची हिंदी कविता डोळ्यासमोर ठेवून तिच्यातून ४२ कवींच्या साधारण १२५ कविता या ठिकाणी मराठीत अनुवाद करून छापल्या आहेत. अनुवाद योग्य किंवा अयोग्य, चूक किंवा बरोबर हे सांगायचे म्हणजे प्रत्येक अनुवाद मूळ कवितेशी पडताळून पहायचा ते व्यवहारात कठीण आहे. एक दोन ठिकाणी शलाका परीक्षा या न्यायाने काही अनुवाद तपासले, तर ते मूळ अर्थाला न्याय देणारे आहेत असे दिसते. सध्या एवढे पुरेसे आहे. ही काटेकोर तपासणी-करण्याचा उद्योग मी सोडून दिला व जणू काही या मराठीच कविता आहेत, हे समजून त्यांच्याशी बोलू लागलो. या काव्यसंग्रहात ज्यांच्या कवितांपासून आरंभ झाला आहे, त्यात शमशेर, अज्ञेय, नागार्जुन, गजानन माधव मुक्तीबोध, रघुवीर सहाय हे श्रेष्ठ व नामांकित कवी आहेत तसेच राजेंद्र घोडपकर, असद जैदी, मंगलेश डबराल, अरुण कमल हे नव्या दमाचे आघाडीचे कवी आहेत. प्रत्येकाच्या सामान्यत्वे तीन कविता. ही निवड एवढी कवींच्या संख्येने व्यापक रूप धारण करून कवितांची निवड मोजकीच. यांचे गणित तारांबळ उडविणारे आहे. प्रस्तावनेत प्रा. पाटील यांनी हा प्रश्न उपस्थित केला नाही. पण माझ्या मनात तो आला आहे. एकाच कवीच्या फक्त तीन कवितांतून त्याची सगळी वैशिष्ट्ये कशी काय प्रगटणार हे गूढच आहे. त्या व तेवढ्याच कवितांच्या आधारे निष्कर्ष काढायचे तर ते अपूर्ण वाटण्याचा किंवा चुकीचे ठरण्याचा धोका आहे. पण तो स्वीकारण्यावाचून आता सुटका दिसत नाही. हा धोका कुठे आणि कसा दिसतो ते सांगतो. या सर्व कवितांच्या आधारे आपण काही सर्वसामान्य निष्कर्ष काढू शकतो कां ? हा पहिला धोका. प्रा. पाटील यांनी प्रस्तावनेत प्रत्येक कवीबद्दल एकेक वाक्य टाकले आहे. ते तेवढ्यापुरते स्वीकारता येणार नाही. उदा. या संग्रहात अक्षर उपाध्याय यांच्या तीन कविता आहेत. "अनुभव", "हुकूमशहा जेव्हा येतो", "इतिहास होणारी मुलं", या तिन्ही कवितांचे प्रेरणास्रोत भिन्न भिन्न आहेत. त्यांच्या अनुभवांचे रूप भिन्न आहे. तसेच त्या अनुभवांचे केंद्रीकरण व विकेंद्रीकरण करण्याच्या पद्धतीही निराळ्या दिसतात. "अनुभव" ही कविता काव्य-विषयक तरल संवेदना प्रगट करणारी आहे. त्या तरलतेचे, संवेदनांची रूपे कशी आपल्याला दाखवीत आहे व प्रत्येक रूपामागे बदलता संदर्भ आहे. म्हणजे एकीकडे संवेदनांची वर्तुळे व दुसरीकडे त्यांचे बदलते संदर्भ, ही दुहेरी रचना आहे, पण ही कवितेची पार्श्वभूमी आहे कां ? मला वाटत नाही, पार्श्वभूमी वेगळी व चित्र वेगळे, आशय वेगळा हे कलाशास्त्र मला मंजूर नाही. कलाशास्त्रात प्रत्येक छोट्या आणि मोठ्या गोष्टींना, असणाऱ्या व नसणाऱ्या, काही अर्थ असतो. तो न्याय या कवितेला लावला तर ही कविता मला कुठल्या कुठे घेऊन जाते. त्यांची दुसरी कविता आहे. "हुकूमशहा जेव्हा येतो." ही कविता ही एक संवेदनक्षम पण तटस्थमनाची विदारक प्रतिक्रिया आहे. पण हेच तटस्थ मन तिसऱ्या कवितेत "इतिहास होणारी मुलं" इथे अधिक गुरफटले गेले आहे. गुरफटणे आले म्हणून उपहास आला, उपरोध आला, क्षोभ आला. म्हणजे एका चांगल्या कवीच्या तीन चांगल्या कविता मला या ठिकाणी तीन वेगवेगळी अर्थचित्रे दाखवितात. पाटलांनी त्यांच्यासाठी फक्त एक वाक्य तेवढे टाकले आहे (पृ. २८). माझ्या काही ते उपयोगाचे नाही. कविता स्वतःच बोलली पाहिजे. हा कवितांचा अनुवाद वाचतांना माझ्या मनात जे प्रश्न निर्माण झाले त्यापैकी हा पहिला प्रश्न. या प्रश्नांच्या संदर्भात सहज आठवले. अज्ञेय यांनी हिंदी कविता तारसप्तकांद्वारे हिंदीतच सादर केलेली सर्वांना माहित आहे. त्यापैकी चौथ्या तारसप्तकाच्या प्रस्तावनेत त्यांनी एक मोठे मार्मिक विधान केलेले लक्षात आहे. आमची आजची कविता बोलते फार. तिने फक्त प्रगट व्हायला पाहिजे. मराठीत या बोलण्यांचा अर्थ बडबडणे अशा अर्थाने घ्यायला पाहिजे. मी कविता माझ्याशी बोलते असे जे म्हणतो आहे ते अज्ञेयांच्या संकेतांच्या संदर्भात नाही तर माझ्या दृष्टीने. ती तर फक्त खरोखरच प्रगट होते आहे. मला ती बोलल्यासारखी वाटते हा भाग वेगळा. ती भाषा बोलण्याची, भाषा संवेदनांची असते, संकेतांची नाही, ही भाषा संवेदनांची वर्तुळे प्रगट करणारी असते तो भाष्यात्मकतेचा आव आणणारी नसते. भाष्याचे

अनुभवात स्थान अपरिहार्य असेल तर ते अनुभवाचे बोट धरून येईल. कवितांच्या संदर्भात पाटलांनी प्रारंभीच उपस्थित केलेला हा माझ्या समोरचा दुसरा प्रश्न.

अनुभवप्रामाण्यात पहिला भाग येतो तो आकलनाचा. या सर्व कवींना कोणत्या प्रश्नांनी, अनुभवांनी छळले आहे हा प्रश्न अनेक अंगांनी विचारता येण्याजोगा आहे. कवीचे स्वतःचे जग, अवतीभोवतीचे जग, व्यापक विश्व, ब्रह्मांड, निसर्ग, जीवसृष्टी, प्राणीसृष्टी यांच्या बाबतीत ही कविमंडळी कोणता विचार कसा बरे करत असतील ? तो पुरेशा गांभीर्याने व जबाबदारीने होत आहे म्हणून तर हा प्रश्न. या प्रश्नाला मी नेहमीच्या समीक्षीय भाषेत "आशय कोणता" "आशयाचे स्वरूप काय ?" वगैरे पद्धतीने मांडू इच्छित नाही व व्यक्तिनिष्ठा, आत्मनिष्ठा या संज्ञांच्या जंजाळातून मोकळे होऊन मला या कवितांशी संवाद साधायचा आहे. पहिलीच कविता भेटते ती केदारनाथ अग्रवाल यांची. त्यांच्या कवितात दोन सूर जाणवले. उत्साहाचा, प्रसन्नतेचा. एक सूर त्यात आत्मविश्वासाचा. विश्वासाचा सूर त्यात मिसळलेला तर लगेच त्याला दुसरी किनार मिळते (पृ. ४) ती सूक्ष्म संवेदनेची. कवी सकाळी नदीतीरावर जातो व तो शांत जलाशय पाहून चोरपावली घरी परततो. हे संवेदनाचित्र आहे. त्यात नितळपणा आहे. पण समशेरच्या एकदम हादरा बसतो. माणसाची एकाकी अवस्था कवीला अस्वस्थ करीत आहे व त्याची अपेक्षा आहे की आपणही अस्वस्थ व्हावे. हे एकाकीपण पिंड ब्रह्मांडाच्या संदर्भातील एकाकीपण आहे. त्यातून माणसाचे शरण्यत्व सुचवायचे आहे. अगतिकतेचे सूत्र सांगायचे आहे. पण त्या सांगण्यात प्रक्षोभ आहे, वेदना आहे, तडफडाट आहे. पण कवी संघर्षाच्या भूमिकेत उतरत नाहीसे दिसते. "श्वासाशिवाय काय दिलंस मला आई, वसुंधरे," "हा कवीचा आर्त हुंकार आहे. पण लक्षात घ्यायचं ते एवढं हाही कवी प्रश्न विचारतो आहे. स्वतःला, विश्वाला, तुम्हा आम्हाला. अर्थ त्याला माहीत नाही व तो तर स्वच्छ सांगतो आहे. पण ही अस्वस्थता अज्ञेयात नाही. त्यांच्याजवळ प्रत्येक प्रश्नाला उत्तर आहेसे दिसते. प्रश्नही तेच विचारतात व उत्तरेही पटापट देतात. कारण कवींच्या म्हणण्याप्रमाणे ते सगळयांना ओळखतात व चुकलेल्यांना सुधारण्याची जबाबदारी स्वतःवर घेतात. केवढा भोळा आशावाद आहे त्यांचा, हाच आशावाद त्यांना महावृक्षाखाली घेऊन जातो. पण हा आशावाद तेथे वेगळया रूपात प्रगट होतो. एका वर्तुळातून दुसरे वर्तुळ यासारखे. नागार्जुन यांना स्वप्ने पडत नाहीत. त्यांचा अगदी रोखठोक व्यवहार. मनात लाख असूनही भाषा तिरकस, बोचणारी, ठोसे मारणारी, उपरोधात्मक. पण त्यांनाही या जगाचे कसे होणार हा प्रश्न पडला आहेच. सगळया संस्कृतीचे संगम, आरोह व अवरोह मानवी कल्याणाच्या अभावी निरर्थक ठरतात असेच त्यांना सुचवावेसे वाटत असले पाहिजे. गजानन माधव मुक्तिबोधांना तर प्रज्ञेच्या जोरावर भूत, भविष्य, वर्तमानाचे दर्शन घेण्याची आकांक्षा आहे. त्यांचे तर प्रश्न एकच का असंख्य आहेत. अंधार असला तरी त्यांचा प्रज्ञाचक्षु लखलखता आहे याची साक्ष त्यांच्या "अंधारात" कवितेत आहे. मानवाची होणारी दमछाक त्यांना कासावीस करते. तरीही प्रत्येक गल्लीत, प्रत्येक कोपऱ्यात उभे राहून ते डोळे फाडफाडून बघतात. त्रिलोचन यांच्या कवितेत माणसाच्या अविश्रांत श्रमंतीचे चित्र आहे व या श्रमंतीच्या चित्रात इतिहासाचे भान आहे. पण मुख्य किनार आहे ती चिंतेची व ही चिंता एकाकीपणाची आहे. विजयदेव नारायण साहींपासून हिंदी कवितेत मांडणीत पूर्वी सूक्ष्मतेने प्रगटणारा द्विदलीयपणा आता स्पष्ट झालेला दिसतो. त्यांच्यातला कवी बाह्यविश्वापेक्षा माणसांच्या आंतरविश्वाला केंद्र मानीत आहे व या केंद्राची अनुभूती जिज्ञासेतून प्रगटणारी पण उघडपणे संघर्षात न पडणारी आहे. नियतीच्या व मानवाच्या क्रूर खेळांत कवीजवळ उत्तर नसते व असलेच तर क्षीण असते. खरंतर त्यावर एकच उत्तर असते तो म्हणजे संघर्ष. स्वतःशी व इतरांशी संघर्ष, अनंत रूपांनी, क्षणाक्षणाला घडणारा. जगण्यासाठी संघर्ष, विकासासाठी संघर्ष, नाशासाठी संघर्ष. तो आरंभ कुठे होतो व शेवट कोठे सांगता येत नाही. तर्काने तर मुळीच नाही.

कुंवर नारायणची कविता "समुद्रातील मासोळी" ही त्यादृष्टीने पाहण्यासारखी आहे.

या ठिकाणी नीति-अनीतीचा सनातन मूळ संघर्ष आहे. तसाच व्यक्तीचा स्वतःच्या अस्तित्वासाठी संघर्ष आहे. स्वतःला ओळखण्याचा संघर्ष आहे. हा सगळाच प्रकार अतिशय क्लेषकारक आहे. एकूण हा सगळा संघर्ष हा काळाचा संदर्भ ओळखण्याचा संघर्ष. "दिक्" व "काल" ही अनुभूतीची दोन रूपे आहेत. त्या दोन जाणीवा न दिसणाऱ्या पण भासणाऱ्या. प्रभाव टाकणाऱ्या व्यापून टाकणाऱ्या पण न ओळखता येणाऱ्या आहेत. हा शोधही संघर्षमय ठरावा काय ? हा प्रश्न या कवींना पडतो आहे. तसाच, तो मलाही पडला आहे. मुक्तिबोधांनी अंधारात स्वप्नदृश्यांचा आधार घेत या प्रश्नाचे उत्तर शोधले होते. अज्ञेयांनी 'गुपचुप', 'नदीत' (पृ. १४) हे उत्तर शोधले होते. पण त्यातून शाश्वत सत्य तर हाती लागतच नाही. मग या शोधात व संघर्षात कोण कुणाला फसवीत आहे ? हा आणखी एक प्रश्न उपस्थित होतो. श्री. कमलेश व श्रीकांत वर्मा या दोघांनी इतिहासाचे, परंपरेचे, मिथकचे बोट धरून या शोधाचे उत्तर व संघर्षावर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला आहे. (पृ. १६४) कवी या प्रश्नांशी, परंपरेशी झुंजतो आहे व सारखे प्रश्न विचारतो आहे. दगडाच्या इमारतीवर डोके आपटून घेण्याचा तर हा प्रकार नाही ? धुमील यांची "वीस वर्षानंतर" (पृ. १४२) ही कविता आहे. त्यात त्यांनी उदासपणे विचारले की खरोखरच या रडण्या रागावण्याचा तरी काय उपयोग ? हा प्रश्न सतत कवींना छळतो आहे. तो प्रश्न आहे माणसाचे मूळ, संस्कृतीचे मूळ, परंपरेचे मूळ, सुखाची व्याख्या, चांगल्या वाईटाचा विवेक, प्रयत्नांची सार्थकता, हे प्रश्न मानवी अस्तित्वाचे आहेत, मूल्यांचे आहेत, जन्माचे आहेत, मृत्यूचे आहेत. पण नक्कीच स्वप्नरंजनाचे नाहीत, फसवणूकीचे नाहीत. अडचणीचे नाहीत, शोषणाचे नाहीत पण अन्यायाचे आहेत. विचाराच्या सोयीसाठी त्यांना आपण "संघर्ष" या सोयीस्कर माध्यमात कोंबून बसवीत आहो.

श्रीकांत वर्मा यांचा उल्लेख केला तो भाग पुरा केला पाहिजे. त्यांनी आजची आपली वेदना इतिहासाच्या व्यापक पटावर उघडी करून मांडली आहे. त्यांची 'भरकटलेला मेघ' (पृ. ९७) ही कविता आहे. कालिदासाचा यक्ष मेघाच्या साक्षीने आपल्या स्वप्नसुंदरीच्या सहवासात स्वप्नांचे मोहजाल निर्माण करून रममाण झाला तर आधुनिक मानव यंत्र, तंत्र, उद्योग, युद्ध, विज्ञान यांच्या संघर्षणात रगडला जातो आहे. कवी म्हणतो तो यक्ष होता. त्याला स्वप्नांचा अधिकार होता. मी पण स्वप्ने पाहू इच्छितो. ती भरकटलेली असतील पण स्वप्ने आहेत. माझ्या डोळ्यातील अश्रूंना क्षाराची चव आहे. पण ती चव घेण्याची संवेदना शिल्लक आहे हे केवढे भाग्य.

> किती आसवे टप टप टप
> बरसतात माझ्या छातीवर
> किती गाऱ्हाणी मनात माझ्या
> चमकतात वीजा होऊन
> आत आत मी केव्हापासून खदखदत आहे
> मनास माझ्या आग लागली
> भडकत आहे.

हे प्रक्षुब्ध रूप आधुनिक संदर्भातील संवेदनेचे आहे. संवेदना म्हणजे केवळ जलतरंग नाहीत, किंवा वाऱ्याची झुळूक नाही, तर ते सागरलाटांचे तुफान व अरण्ये उद्ध्वस्त करणारे रौरवाचे टणत्कार असू शकतात. संवेदनेचे हे वर्तुळ येथे दिसते. ते पूर्णत्वाने जेथे प्रगट होत असेल तर तेथे काव्य जन्मते, तुकड्यांनी उमटत असेल तर ते गद्य प्रवचन ठरते. या दोन्हींच्या खुणा कवितेत असतात. त्यासाठी फार पळापळी करण्याची गरज नाही. आधुनिक हिंदी कवितेच्या संदर्भातील हे विविध रूपी स्वरूप काव्यदृष्टीने मोठे व लोभसवाणे आहे.

संवेदनांच्या संदर्भात आणखी एक प्रश्न या हिंदी कवितेने माझ्यापुढे उपस्थित केला आहे. तो म्हणजे वास्तवाचे काव्यातील संवेद्य रूप. बालकवी बोरकर—पाडगांवकर-आरती प्रभु—मर्ढेकर यांच्यातील निसर्ग एक तर तटस्थ असतो किंवा भावुक होऊन, माणसाचे रूप घेऊन काव्यात रूपांतरित होतो. तो साध्य की साधन हा प्रश्न बाजूला

ठेवला तरी काव्यात आता केवळ वर्णनासाठी निसर्गाचा उपयोग कुणी करणार नाही, व त्या रचनेला आपण आता सरळ दृष्टीआड करू शकतो. मग या उपरिनिर्दिष्ट अवस्थांपेक्षा निसर्गाचे 'स्थित्यंतर'च हिंदी कवितेत दिसते. हे काय प्रकरण आहे ? त्या ठिकाणी निसर्ग–मानव यातील ताण नाहीत किंवा आरोपित करणे वा प्रत्यारोपित करणे हाही प्रकार दिसत नाही. कवीच्या मनातील संवेदनासमूह निसर्गाच्या आंतरिक संबंधांचा आधार घेते आहे असे दिसते पण ते रूपक नसते. प्रतिमा नसते. कारण त्यातील द्विव्यत्व तेथे अभिप्रेत नाहीत, तार्किक संबंध अभिप्रेत नाहीत. कवीची ठसठसणारी वेदना व संवेदना निसर्गाचा सामग्र्याने उपयोग करताना दिसते. हे मला वेगळे वाटते. उदय प्रकाश या कवीची एक कविता आहे (पृ. २७९) "एक शहर सोडून जातानाची कविता". या कवितेत नदी आहे, समुद्र आहे, हिमखंड आहे, अटलांटिक आहे, सगळे आहे. त्याला जोडून कवीचे स्वप्न आहे, दु:ख आहे, वास्तव आहे, सुख आहे, या ठिकाणची वेदना रोमँटिक कवीची वेदना नाही, तर उघड्या डोळ्यांनी वास्तव स्वीकारणाऱ्या संवेदनक्षम व्यक्तीच्या, समूहाच्या समाजाची मनाची तडफड आहे. ही मांडणी सरळ साधी आहे, पण भेदक आहे, अशा अनेक कविता या संग्रहात आहेत. निसर्ग एक वास्तव व वस्तू व संवेदनांचा आधारभूत घटक आहे. तसाच नव्याने उदयाला येणारी उद्योग-प्रधान संस्कृती, तिचे भ्रष्ट व विकृत रूपदेखील एक वास्तव आहे. गुणात्मकदृष्ट्या दोन्हीत काहीच फरक नाही. कारण निसर्गाचा कवितेतील वावर रमणीयतेचे बोट धरून जसा येत नाही तसा विकृतीचा संचारही किळसवाणा वाटण्याचे कारण नाही. राजेंद्र घोडपकर यांची "झाड" ही कविता आहे (पृ. २९२.). यात या वास्तवाचं रूप दडलं आहे. तसेच नव्या कवितेचे काव्यत्व दडून बसलं आहे. या कवितांचे मी निर्देश करतो आहे ते मला चटकन जाणवले म्हणून. कुणी अन्य कवितांचे निर्देश करू शकतील. काही बिघडत नाही. मुद्दा एवढाच की वास्तवाचे अनुभवात रूपांतरीत होण्याची क्रिया व त्यातून तुमच्या आमच्या विचार-शक्तीला मिळणारे धक्के हा या कवितांचा, हिंदी कवितेचा विशेष आहे. सांकेतिकतेला पूर्ण फांटा मिळणे हा कवितेच्या बाबतीत मुद्दा वेगळा सांगण्याची आवश्यकता नसावी. या अपारंपरिकतेचा भाग म्हणजे एका बाजूने धक्का बसण्यातून प्रतिक्रिया निर्माण होते, तर निर्मितीच्या बाजूने या कवितातून प्रगटणारे उपरोधाचे, व्यंगाचे, उपहासाचे रूप प्रगट होते. ते तर कमी अधिक प्रमाणात सर्वच कवींच्या बाबतीत झालेले दिसते. हाही अधिक खोलात जाऊन विचार करावा असा प्रश्न आहे. विद्रोह प्रगट करण्यासाठी, प्रस्थापित मूल्यांच्या विरुद्ध संघर्ष करण्याची उपहास ही तशी जुनी परंपरा आहे. मग ही नवी कविता पुन्हा त्याच परंपरेने जाते आहे असे म्हणावे का ? हा प्रश्न कसा सोडविता येईल ? प्रश्न सोडविणे याचा अर्थ कवितेपुरते दुसरे समाधानकारक, स्पष्टीकरण देणे. जर कवी मानवाच्या अस्तित्वाचेच वेगळेपण हे मूल्य गृहीत धरणार असेल तर या परिहासाचे स्वरूप वेगळे असेल व या व्यापक जीवन संदर्भात तो या विश्वरचनेचा एक भाग मानत असेल तर उपरोधाचे स्पष्टीकरण दुसरे असेल. या दोन्ही स्पष्टीकरणाबरोबर सर्व तुच्छवादाचा मार्गही मोकळा आहे. तोही जाणवतोच. म्हणजे रूढ सांकेतिक पद्धतीने, कवितेत ज्याला उपरोध आपण म्हणतो त्याची भिन्न भिन्न स्पष्टीकरणे याच कवितेच्या आधारे संभवतात. क्वचित हा उपरोध सूक्ष्म विनोदाचे रूप घेऊन अवतरतो. मंगलेश डबराल यांच्या कवितेत हा परिहास स्पष्ट दिसतो (पृ. २५४, २५५). विष्णू खरे यांच्या तीनही कविता 'घुबड', 'घार', 'गिधाड' या कवितेत संस्कृतीची छिन्न भिन्न अवस्था उपरोधाने मांडली आहे. 'घार' या कवितेत तर जगातल्या सगळ्या दर्शनशास्त्रांची (पृ. १८०) टर उडविली आहे. जर माणसालाही शास्त्र ओळखता येत नसेल, शांतीसुख मिळणार नसेल तर ही शास्त्रे, विज्ञाने निरर्थक नाहीत का ? या ठिकाणी कवी उपरोध करीत आहे म्हणून त्याला मी सर्व तुच्छतावादी म्हणणार नाही. ही दर्शने आपणाला समजत नसतील ही सूक्ष्म भीती त्यालाच वाटते आहे व विशिष्ट घारीला ओळखू शकत नाहीत हे तर

समजू शकते. या ओळी तेच सुचवितात. "गिधाड" या कवितेत Establishment म्हणजे प्रचलित मानवी समाजव्यवस्थेचे विदारक रूपकात्मक विश्लेषण आहे. माणसाला काहीच निवडण्याचा अधिकार नाही. नेता नाही, राज्यकर्ता नाही, शास्ता नाही. त्याने फक्त सतत भितीखाली दडपलेले राहायचे असते. हा अनुभव उपहासाच्या माध्यमातून प्रखरतेने व्यक्त होऊ शकतो. पण प्रश्न उपस्थित होतो की या उपहासाच्या अतिरेकापोटी काहीशा नकारात्मक दृष्टीने अभिव्यक्ती द्वेषाऐवजी आजचा कवी सकारात्मक दृष्टीने का बरं बोलत नाही ? हा तो प्रश्न आहे. विद्रोहाला उत्तर स्वप्नांचे असू शकते, तसेच मूल्यांच्या आग्रहीपणाचे असू शकते. खरं तर खुद्द तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातीलच ही जटिल समस्या आहे. कवी मंडळी स्फूर्ती केंद्राच्या आधारे ती मांडताहेत. आम्ही आमच्या चष्म्याच्या दोन भिंगातून बघतो आहो. एक तत्त्वज्ञानाचा व एक निर्मितीचा. कोणता पदर कुठे अडकला याचा भ्रम या कवितेत निर्माण केला आहे. तो कसा सोडवावा हा माझा आणखी एक प्रश्न आहे.

पण हे प्रश्न सोडवायलाच लागतील, कारण ते कवीने उपस्थित केले आहेत. विशेषत: निर्मितीने उपस्थित केले आहेत. आजच्या निर्मितीत सर्वंच मानवी ज्ञान, विज्ञान, समाजशास्त्रे यांच्या संस्कारांचा परिपाक आहे. परंपरा नव्हे. त्यांचा आधार घेत निर्मितीचा मार्ग धुंडाळणे हा निर्मितीचा उच्चतम मार्ग आहे हा धडा घालून दिला ग. मा. मुक्तिबोधांनी. त्यांच्या अनुभव विश्वाला जे वेगवेगळे कंगोरे लाभले ते या व्यापक बैठकीमुळे. त्यामुळे पुढच्या कवींचा मार्ग मोकळा झाला व त्यांनी तो पाठ गिरविला खरा, पण गिरविताना नवनवी समस्या पुढे येत गेली व त्यांची निर्मिती आपणासमोर आहे. ज्या कुठल्या क्षणी कवीचा संेद्रिय अनुभव व आपली जाणीव यांचा संयोग घडतो तेथे साक्षात्कार घडतो. अन्यथा ते फक्त शब्दांचे निरर्थक जंगल उरते. आपण काय घ्यायचे, किती घ्यायचे, कसे घ्यायचे, हे आपले प्रश्न आहेत. रसिकतेचे प्रश्न आहेत. त्यांना टाळून चालणार नाही. एवढे कवींना व सगळ्यांना सांगणे म्हणून तर हा खटाटोप. ■

[हैदराबाद येथील मराठी महाविद्यालयाच्या स्वाध्याय मंडळात वाचलेला निबंध]

लेखकांना विनंती

साहित्य पाठविताना त्यावर संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता लिहिणे आवश्यक आहे. नाव व पत्ता लिहिलेले आणि पुरेसे पोस्टेज लावलेले पाकीट लेखनासोबत असेल तरच साहित्य परत पाठविणे शक्य होईल.

अनुभव : एका कवितेचा

वसंत चिंचाळकर

वळण ओलांडून नवीन वाटेवर उभा आहे की जुनीच वाट कुठल्या नवीन वळणाच्या शोधात निघाली आहे ? काही कळेनासे झाले आहे. गतीचा वळसा क्षणैक थांबला आहे. क्षणार्धातच उसळी येऊन, तो पुढे जाणार आहे. फार थांबणे त्याला जमत नाही. अखंड वाहत राहणे त्याचा धर्म. तरीही त्या क्षणाच्या अलीकडे आणि पलीकडे एक झुंज आहे. ह्या साऱ्याचा मी अविभाज्य घटक. पिंजणे, तुटणे आणि अतुट जुळत जाणे भागधेयच. ते नाकारून कसे चालेल ?

वीस आक्टोबरच्या पन्नास संध्याकाळी याआधी अनुभवल्या. पुढेही अधिक काही अनुभवायच्या असतील, पण आजच्यासारखे थांबणे त्यावेळी होईलच असे कुठे आहे ? म्हणूनच काल आणि आज यांचा सवाद सुरू झाला असेल का ?

आत्ता या क्षणी मी एका भरगच्च सभागृहात आहे. सुंदर सजावटीच्या. व्यासपीठ कलावंतांनी भरले आहे. गडद निळ्या वेल्व्हेटच्या पडद्यावर थर्माकोलची वळणदार अक्षरे आहेत. त्याला पिवळ्या–पांढऱ्या शेवंतीच्या फुलमाळा घातल्या आहेत. सुगंधाची हलकी शिंपण निशिगंधाची फुले फ्लॉवरपॉटमध्ये हसत आहेत. व्यासपीठावर देखणी झगमग आहे.

सभागृह थोडेसे अस्वस्थ. जाणते रसिक स्त्री–पुरुष. युवक–युवती. आप्तमित्र. त्यांना व्यासपीठावर सजीव होत जाणाऱ्या क्षणांची प्रतिक्षा आहे. कुठे काही झंकारणार आहे आणि कुठे त्याचा विस्तार होत जाणार. कवितेची कोवळी सायंकाळ आपल्या आपल्या रूप वैशिष्ट्यांनी फुलणार. त्यात काय असेल ? रसिकांच्या परिचयाचे असलेले अतीत ! आपणा सर्वांना अतर्क्य वाटावे असे भविष्य ? आणि आत्ता जगतो आहोत त्या वर्तमानाचे काय ?

व्यासपीठावर हालचाल वाढते. काही ओळखीची. काही अनोळखी माणसे व्यासपीठावर येतात. परिचयाचे चेहरेही इथे नवीन वाटतात. व्यासपीठावर नसतात तेव्हा ती साधी माणसे असतात. व्यासपीठावर असतात तेव्हा त्यांचे कलावंतपण सोबतीला असावे. मंच संचालक माईकचा ताबा घेतो. एक दीर्घ निश्वास सोडतो. सभागृहावरून त्याची नजर फिरते. ओळखीचे अनोळखी असल्यासारखे करून तो बोलत असतो. कलावतांचे वेगळे असते. तो अनोळखी वाटावे असे विश्व, ओळखीचे करून दाखवीत असतो.

प्रथम स्वागत. नंतर परिचय आणि मग विविध भाषांतील कवितापाठ. शेजारी असलेली ती कुजबुजते "छान आहे, नाही ... ?"

पार्श्वभूमीवर असलेले शहनाईचे स्वर शांत झाल्यानंतरची स्तब्धता. तिच्या निःशब्द सोबतीत ती असते.

कुणीतरी पंजाबीतील एक कविता गातो. आतंकवादाच्या पार्श्वभूमीवरची त्याला थेट वास्तव असते. कुणीतरी हुडाबळीची कहाणी सांगतो. त्याला सामाजिक संदर्भ असतात. कुठे एखादी हलकीशी प्रेमकविता असते तर कुठे पुरुषप्रधान संस्कृतीविरुद्ध उठाव. या साऱ्या कविता लोकप्रिय मुखवटे घालून आल्या असतात. त्यात कवितेचे मनस्वीपण असतेच, असे नाही. दाद द्यावी अशा जागा कुठे कुठे असतात. ती कवितेची सायंकाळ पुढे सरकत असते. सभागृहही हलत डुलत. त्यात मीही तरंगत असतो. आकंठ बुडत नाही.

ठेच लागून थांबावे, तसे त्या कवितेचे असते. त्या कवितेला दुःखार्त स्वर असतो. त्या स्वराला साजेसा कवीचा आवाज. कवितेचं शीर्षक असतं 'शायद'. मूळची ही गुजराती कविता. डॉ. जयंत पाठक यांची. तिचे हिंदी रूपांतर कानावर येत असते.

"अच्छा, तो बिदा,
शायद तुम्हे यहाँ फिरसे
न भी आना पडे ..."

आणि मी अलगद सभागृहातून उचलल्या जातो. समोरचे व्यासपीठ मिटते त्या फुलमाळांचे ममतामयी डोळे होतात. त्या डोळ्यात, शाळेच्या दिवसात अनुभवलेली आईची अथांग करुणा असते आईच्या ममत्वाला करुणेची अशी झालर असायची. गलबलून टाकणारी. ती तशी 'का होती, ते आज मला कळते. तेव्हा नव्हते कळत. गाव सोडून शहराकडे निघतांना ती म्हणत असते, 'जा शहरात जा... तुला नोकरी लागली की आपले हेही दिवस संपतील..' हळू हळू डोळे मिटतात. व्यासपीठावर तन्मय स्वर उमटतच असतो. कवी शब्दांच्या पलीकडचे विश्व जागवीतच राहतो. ती शेजारी असते. मी सभागृहात. पण एकटे होऊन घरंगळणे सुरूच असते – त्या दिवसांशी आता संवाद उरला नाही. ज्यांच्याशी संवाद घडायचा तीच आता शब्दमाध्यमाच्या पलीकडे आहेत. ते अटळच होते. अतीताशी कधी तरी नाते तुटायचेच असते. वर्तमानाशी ते आज जुळले आहे. आणि भविष्याशी ? त्याचे आताच काय सांगायचे ?

"मैं आखरी बार
घर को ताला लगा दूं
और चलू..."

संवेदनेची आणि आत्मीयतेची सारी कवाडे बंद करून त्याला कुठल्या प्रवासाला जायचे होते ? कोणते अनोळखीपण जगायचे असेल ? तो एखाद्या सहवेदना जगणाऱ्या काळजात उतरून, हे सारे सांगायला उत्सुक आहे. आपलेपण असे कुठे मोडून टाकायचे आहे आणि निःसंग होऊन मिळेल त्या दिशेला पाऊले वळवायची. वाट सापडेल त्या दिशेने चालत जायचे. इथवर सारे ठीक होते. कधी कधी भावबंधनेही कचकड्याच्या खेळण्यासारखीच असतात. बिनदिक्कतपणे ती तुडवीत, मागे वळून न बघता पुढे जाता येते, पण असे त्रयस्थ असणेही त्याला जमत नाही. तो आपल्या अनुपस्थितीतील विदारक चित्र रेखाटीत राहतो. म्हणतो,

"अब हमेशा की तरह
इस टुटे हुये चबुतरे पर
आया करेंगी दो चार बकरियाँ
बिताने अपनी दुपहरियाँ"

आणि मग दुपार सरून सांज येईल. शेजारातील येतील दोन मुली अन् अंधार पडेपर्यंत सागरगोटयांचा खेळ खेळतील. त्यांच्या आत्म्यासारखा शुभ्र चमकदार गोटयांचा खेळ. कुणी भटकेही या दाराशी येता जाता थांबतील. हे नसले तर कदाचित घराची ही भिंत आणि बाहेरचे हे दार यांच्यामध्ये मुंग्यांची एक रांग तरी जाता–येतांना दिसेल ना ? मी नसलो म्हणून माझ्या घराचा उंबरठा निर्मनुष्य कसा असेल ?

भविष्य दात विचकीत अचानक पुढे थांबते. वाटते, हा वेडा, व्याकुळ होऊन कुणासाठी गातो आहे ? भविष्याचा प्रचंड अंधार समोर पसरलेल्या मागसांसाठी की उद्याच्या पोटात चमकदार स्वप्ने शोधणाऱ्या खुळयांसाठी ? उद्यावर शिक्कामोर्तब करण्यासाठी उत्सुक असलेल्यांना तो निराश करीत नाही आणि थेट वास्तव सांगतानाही कचरत नाही. उद्याशी शृंखला तोडायला ज्यांच्याजवळ आज माध्यम नाही, त्यांची कनवाळू समजावणी तो काढीत असतो. तो प्रेमळ मित्राच्या खांद्यावर आत्मीयतेनं हात ठेवून म्हणतो.

"दोस्त,...कभी तेरा मन कहे
चलो, जरा चलकर देखे
वह आ ही गया हो, शायद
तुझे फिरसे
यहाँ लौटना भी पडे..."

...आणि आता शब्दाविण संवाद सुरू होतो. त्या हृदयीचे या हृदयी होते. इथवर चाललेली वाट मध्येच हसून तर मध्येच रुसून नवे–जुने गाणे गाते. त्या गाण्यातील शब्द आज काही आठवत नाही. पण एक वाटले, आजचे इथे थांबणे यथार्थ झाले आहे. कवितापाठ संपला आणि गजबजलेले सभागृह मोकळे झाले. मीही रिता.

खरे तर, आजच्या या सायंकाळी, माझ्या अस्तित्वालाच क्षणकाल अर्धविराम लाभला असतो.

अच्छा तो विदा
शायद, तुम्हे यहाँ फिरसे
न भी आना पडे
मैं आखरी बार
घर को ताला लगा लूं
और चलू...

अब हमेशा की तरह
इस टूटे हुए चबूतरे पर
आया करेंगी
दो चार बकरियाँ
बिताने अपनी दुपहरियाँ
सांज ढलते
खाया करेंगी
पडोस की वह दोनो लडकियाँ
और अंधेरा घिरनेतक
खेलेंगी गोटियाँ
उनकी आत्मा जैसी
शुभ्र चमकदार
गोटियाँ

बरं अपने दर में
उसी तरह आयें-जायेंगे
और
दीवार और चौखट के बीच की
दरार से होकर लगातार
गुजरती रहेंगी चिटियोंकी कतार

कभी तेरा मन कहे
चलो, जरा जाकर देखें
वह आ ही गया हो
शायद
मुझे फिरसे
यहाँ लौटना भी पडे

■

[मूळ गुजराती रचना– डॉ. जयंत पाठक
हिन्दी अनुवाद– डॉ. सागर खादीवाला]

लेखकांसाठी सूचना

१. मजकूर कागदाच्या एका बाजूने लिहिलेला व सुवाच्य असावा.
२. पुरेसे पोस्टेज नसलेले लेखन परत केले जाणार नाही. स्थळप्रत ठेवावी, नाहीतर पुरेसे पोस्टेज पाठवावे.
३. कवितेची पोच दिली जात नाही. निर्णयही दिला जाणार नाही. तीन अंकापर्यंत कविता न आल्यास ती अस्वीकृत आहे असे समजावे. कवितेसंबंधी कुठलाही पत्रव्यवहार करणे शक्य होणार नाही.
४. अनाहूत लेख, कथा, ललित वा वैचारिक निबंध ह्याबाबत निर्णय हवा असल्यास पत्ता लिहिलेले एक पोस्ट कार्ड पाठवावे. गद्याबाबत निर्णय कळवल्यानंतरही, ताबडतोब प्रसिद्ध होईलच असे नाही. यथावकाश प्रसिद्ध होईल.
५. अनाहूत समीक्षणे प्रसिद्ध होणार नाहीत. 'युगवाणी' कडून मागवली गेलेली समीक्षणेच प्रसिद्ध होतात.
६. 'युगवाणी' साहित्यप्रेमाला, साहित्याला मोकळी वाट देते. पण ते साहित्य अभिरुची संपन्न असावे.

॥ संशोधन ॥

अडम : विदर्भातील मोहेंजोदडो–हडप्पा

श्रीपाद केशव चितळे

विदर्भ हा भारतीय उपखंडाच्या नाभीस्थानी तर आहेच, पण हा भूखंड उत्तरापथ व दक्षिणापथ यांना सांधणारा महत्त्वपूर्ण दुवा होय. विदर्भाची प्राचीनता थेट प्रागैतिहासिक काळापर्यंत मागे नेता आली आहे. पण सांस्कृतिक दृष्ट्या विचार करता ती वैदिक कालखंडापर्यंत मागे पोहचते. हा प्रदेश अत्यंत प्राचीन असून अतीप्राचीन काळी यामध्ये घनदाट अरण्य होते. पुरावा काय ? तर पवनारचे उत्खननात सर्वात खालच्या भूस्तरावर घनदाट अरण्यनिदर्शक काळी भोर माती आढळली आहे.

विदर्भाचे वाङ्मयीन उल्लेख

भागवतपुराणात (५. ४, १०) विदर्भ हा ऋषभदेवाचा पुत्र होता असे म्हटले आहे. विदर्भाची प्राचीन राजधानी कुंडिनपुर (कौंडिण्यपुर) अमरावती जिल्ह्यात आजही विद्यमान आहे. त्याजवळील नदीला विदर्भा असे नाव होते असे नलचम्पूतील खालील श्लोकावरून (६.६६) दिसते.

> वीरपुरुषं तदेतद्वरदातटनामकं महारावम् ।
> दक्षिणसरस्वती सा वहति विदर्भा नदी यत्र ॥

यामध्ये "वरदातट" असे विदर्भाचे दुसरे नाव असून वऱ्हाड हे नाव पुढे देशनाम म्हणून प्रचलित झाल्याचे दिसते. विदर्भक्षेत्राचे नाव मात्र ऋग्वेदात येत नाही हे खरे ! तरीपण "वैदर्भि कौण्डिन्य" या ऋषीचा उल्लेख "बृहदारण्यक उपनिषदात" येतो. तसेच प्रश्नोपनिषदात विदर्भाच्या भार्गवाचे नाव आलेले आहे. याचाच अर्थ असा की उपनिषद्काळी विदर्भ भूप्रदेश प्रसिद्ध होता असे दिसते. विदर्भ राजापूर्वीही अगस्त्य ऋषीने येथे आपला आश्रम स्थापून आर्यधर्माचा (सभ्यत्वाचा-सुसंस्कृततेचा) प्रसार केला होता अशी आख्यायिका आहे. त्यांची अनेक सूक्ते ऋग्वेदात असून विदर्भकन्या लावण्यवती लोपामुद्रा हिच्याशी त्यांनी विवाह केला होता. रामायण–महाभारत–पुराणे इत्यादी उत्तरकालीन ग्रंथात विदर्भाचा उल्लेख अनेक ठिकाणी येतो. गेल्या १५०–२०० वर्षातील संशोधनावरून विदर्भाच्या प्राचीन इतिहासावर बराच प्रकाश पडला आहे व त्या निष्कर्षांना आज जागतिक मान्यताही आहे. वाङ्मयीन पुराव्यापेक्षा पुरातत्वीय पुरावा नेहमीच अस्सल समजल्या जातो. इ. स. पूर्वी ४ थ्या शतकापासून या क्षेत्रावर मौर्य-सातवाहन, वाकाटक, कलचुरी, चालुक्य, राष्ट्रकूट, कल्याणीचे चालुक्य, परमार, देवगिरीचे यादव, गोंड, भोसले (मराठा कालखंड) अशा अनेक महाप्रतापी राजवंशांनी शासन सत्ता गाजविली. विदर्भाने अनेक राजवंशाचा उदयास्त पाहिला व आपल्या गर्भात त्यांच्या काही स्मृती पुरावशेष रूपांनी दडवून ठेवल्या. आजच्या गतिमान औद्योगिक वैज्ञानिक काळात त्या बाहेर डोकावून आपल्याशी हितगुज करण्यास उत्सुक आहेत.

विदर्भातील पुरातत्वीय क्षेत्र

विदर्भात आजही असंख्य स्थाने अशी पडली आहेत, की जेथे विस्तृत उत्खनन शास्त्रीय पद्धतीने होणे अत्यावश्यक आहे. अगदी मौर्य काळापासून थेट ब्रिटीश काळापर्यंतच सांस्कृतिक आलेख

येथे दृग्गोचर होतो. देवटेक (चंद्रपूर जिल्हा), अडम (नागपूर जिल्हा), रामटेक, नंदिवर्धन, भांदक, नागरा, वत्सगुल्मा, आर्णी, पातूर, पवनी, मांढळ, कौंडिण्यपूर, पद्मपूर, वेणाकट (भौगोलिक परिसीमा), पवनार, टाकळघाट, मार्कण्डा, बार्शी–टाकळी, अशी असंख्य गावे आजही आपल्या भूतकाळाची गुपिते सांगण्यास आतूर आहेत.

प्रस्तुत लेखात अशाच एका स्थानाचा पुरातत्वीय संदर्भात व वैज्ञानिक तर्ककसोटीवर विचार करावयाचा आहे ते स्थान आहे, नुकतेच प्रसिद्धीला आलेले अडम ! पण केवळ स्थानाचा उल्लेख हा अपुरा आहे. त्या स्थानाशी जुळलेला इतिहास समजून घेतल्याशिवाय स्थानपरिचय पूर्ण होऊच शकणार नाही व पुढे उत्खननांती जे अवशेष आढळले, त्याचेही परिशीलन पूर्ण होऊ शकणार नाही. सम्राट अशोकाच्या मृत्यूनंतर (इ. स. पूर्व २७३ ते २३६) दक्षिणापथात अराजक माजले. त्याच काळात सातवाहन राजवंशाचा उदय दक्षिणेत झाला. विदर्भ ह्याच सातवाहनांच्या अधिसत्तेखाली होता. सातवाहनांच्या राजधान्याही भिन्न भिन्न ठिकाणी सांगितल्या जातात. त्यामध्ये जुन्नर, नाणेघाट, प्रतिष्ठान, असिकनगर, विजासन ही काही स्थाने अंर्तभूत होतात, अर्थातच ह्या राजधान्या राजकीय घडामोडीमुळे हलवाव्या लागल्या.


पण नेमका सातवाहनांचाच इतिहास या ठिकाणी अभ्यासणे आवश्यक का आहे तर त्याचे उत्तर असे की ज्या स्थानाचा म्हणजे "अडमचा" परिचय करून घ्यायचा आहे, ते स्थान ह्यांच इतिहासाशी संलग्नित होते असा पुरावा नुकताच उजेडात आला आहे. असे सांगतात की सातवाहन राजांनी साधारण ४६० वर्षे राज्य केले व तो कालखंड साधारण इ. स. पूर्व २३० ते इ. स. २३० असा येतो. पण नेमक्या कोणत्या सातवाहन राजाचे राज्य आपल्या विदर्भावर होते हे आपल्याला प्रस्तुत स्थानावरून (अडम्) समजून घ्यावयाचे आहे. त्यासाठी आपल्याला सुदूर उत्कल प्रांतात (आजचा ओरिसा प्रांत) थोडे डोकवावे लागेल. या ठिकाणी त्यावेळी म्हणजे (इ. स. पूर्व १७९) इ. स. पूर्व २ ऱ्या शतकात कलिंगसम्राट महामेघवान खारवेल राजा राज्य करीत होता, व त्याने आपल्या पराक्रमी कृत्यांचे वर्णन करणारा शिलालेख उत्कल प्रांतातील हाथीगुंफेत (See : Hasthigumpha Inscription of Kharavela, Page 34) कोरून ठेवला आहे, व त्यात चौथ्या ओळीत जे त्याने कोरून ठेवले आहे, त्याचा संबंध आपल्या विदर्भाच्या तत्कालीन इतिहासाशी येतो व त्यावरूनच आपल्या विदर्भाच्या तत्कालीन कालखंडावर प्रकाश पडला आहे. भारताचा प्राचीन इतिहास हा भौगोलिक परिसीमेत गुरफटला आहे व तो नीरक्षीर न्यायाने कणाकणाने संकलित करावा लागतो. हाथीगुंफेत नेमके काय लिहिले आहे ते आता आपण बघू या ! प्राकृतात ते असे आहे (मूळ उद्धरण)

महत्त्वपूर्ण शिलालेख


"दुतिये च अचितयिता सातकंनि पछिमदिसं ह्यगजनर रधबहुलं दंडं पठापयति [।*] कन्हेवेंणागताय च सेनाय वितासिति आसिक नगरं [।*] "

मराठी अर्थ - वरील ओळींचा अर्थ असा आहे, की आपल्या कारकिर्दीच्या दुसऱ्या वर्षी (दुतिये च वसे) सम्राट खारवेलाने सातकर्णी राजाची पर्वा न करता आपले अश्व–गजरथ व पदाती (पायदळसेना) सैन्य पश्चिमेला पाठविले व त्या सैन्यानी कन्हवेण्णा (कन्हान–वैनगंगा या आजच्या नद्या) नदीपर्यंत पोहचून ऋषीकनगरच्या (आजचा खानदेश) लोकात धडकी उत्पन्न केली. आता या लेखाचे वाचनपाठही विद्वानांनी वेगवेगळे केले आहेत.[१] डॉ. जायस्वाल व राखालदास बॅनर्जी या उद्धरणातील विशेषनामास मुसिकनगर असे वाचतात व ह्यात उल्लेखिलेली नदी महाराष्ट्र–कर्नाटक–आंध्र प्रदेशातून मछलीपट्टणपर्यंत वाहणारी कृष्णा नदी आहे असे सांगतात. तर डॉ. म. के. ढवळीकर या मुसिकनगरची ओळख मस्की गावाशी (जेथे सम्राट अशोकाचे

लघुप्रस्तरलेख' मिळाले ते स्थान) करतात. पण डॉ. बरुआ मात्र मुमिकनगरचा पाठ असिकनगर (ह्याच नावाची मृण्मुद्रा अडम गावी आढळलेली आहे) असा वाचतात. पण ह्या व्यतिरिक्त मुसिकनगरचा उल्लेख कुठल्याही प्राचीन लेखात आढळत नाही. पण ह्याचे विपरीत असिक (संस्कृत ऋषीक) या नावाचा उल्लेख महाभारत–रामायणादी ग्रंथात व अभिलेखात' (Epigraphs) स्पष्टपणे आढळतो आणि म्हणून तो शब्द मुसिकनगर असा नसून असिकनगरच असावा हेच योग्य वाटते. "असिक" देशनाम सातवाहन नृपती पुळुमावीच्या नासिक गुंफा शिलालेखात आढळते व ते दक्षिणापथातील देशांच्या' सूचीमध्ये आहे. म. म. डॉ. वा. वि. मिराशींनीही हे स्पष्टपणे दाखविले आहे की, असिक (ऋषीक) नाव' असक (अश्मक) या संदर्भात संस्कृत साहित्य व प्राचीन अभिलेखात आढळते. "रामायणात" सुग्रीव' वानरांना सीताशोधार्थ ज्या स्थानांची यादी देतो त्यात विदर्भ व माहिषक देशांबरोबर ऋषीक देशाचा उल्लेख येतो. महाभारतात ऋषीकाचा निर्देश विदर्भ व पश्चिम अनूप' देशांबरोबर आलेला आहे. म्हणजेच थोडक्यात असे सिद्ध होते की असिक-ऋषीक-अश्मक हे स्थान भारताच्या दक्षिणपथात होते. आता प्रत्यक्ष अडम गावाच्या उत्खननात "अ स क स ज न प द स्य" अशी अक्षरे (ब्राह्मी लिपीत) असलेली मुद्राच आढळलेली आहे. त्यामुळे हा गुंता सोडविण्यास निश्चितच मदत



अडमला आढळलेली हीच ती मुद्रा
(मृण्मयी)



रेखाचित्र – श्री. के. चितळे, नागपूर

होईल, व ते आपण पुढे पाहू. याच उद्धरणात कण्हवेण्णा या उभय नद्यांचा उल्लेख आलेला आहे त्या नद्या आपल्या विदर्भातील कन्हान व पैनगंगा असाव्या असे डॉ. मिराशी म्हणतात. कारण कण्हवेण्णा नदी म्हणजे कन्हान नदी संगमानंतर भंडारा जिल्ह्यातून वाहणाऱ्या वैनगंगा नदीत रुपांतरित होते, व प्राचीनकाळी हिचे नाव कृष्णवेणा असे असावे असे डॉ. मिराशी म्हणतात व ते बरोबरही वाटते. पण डॉ. अ. स. अळतेकर मात्र हिला कृष्णा समजतात. अर्थातच तिची भौगोलिक व्याप्ती दक्षिणेस आहे. पण शिलालेखात मात्र (हाथीगुंफा–उत्कल) पश्चिम दिसं (पश्चिम दिशा) अशा स्पष्ट उल्लेख येतो.

ह्या व्यतिरिक्त शिलालेखात असे म्हटले आहे की खारवेलाने सातकर्णिची पर्वा न करता आपली सेना पश्चिमेस पाठविली. त्यावेळी विदर्भ व खानदेश सातवाहनांच्या राज्यातच समाविष्ट होते. त्यामुळे वरील वर्णन यथार्थ व सत्याश्रयीच वाटते. फक्त असीकनगर हे ऋषीकनगर नसून असकनगरच असावे हे वास्तवतेला धरून वाटते. आता या अडम् गावाच्या उत्खननात अजून काय काय पुरावे आढळले ते पाहू या. पण तत्पूर्वी या "असकाचा" उल्लेख प्राचीन महाजनपदात कसा येतो ते आपण पाहू या !

महाजनपदात नामनिर्देश

इ. स. पूर्वं ६ व्या शतकात उत्तर भारतात निरनिराळ्या ग्रंथातून १६ महाजनपदांची यादी आढळते. ही सर्व लहान लहान राज्ये असून कोणीही सार्वभौम सम्राट त्यावेळी भारतात नव्हता. त्यावेळी विदर्भ कसा होता, त्या भूभागावर कुणाचे राज्य होते ? येथील भाषा, धर्म, रीतीरिवाज परंपरा कशा होत्या त्याबद्दल आपल्यापैकी प्रत्येकालाच उत्सुकता असेल. ख्रिस्तपूर्वं ३ ऱ्या शतकात विदर्भ पुण्यश्लोक सम्राट अशोकाच्या साम्राज्यात मोडत होता. त्याच्या महामात्राने (प्रदेशाधिपती) कोरविलेला शिलालेख चांदा (आजचे चंद्रपूर) जिल्ह्यात देवटेक येथे मिळाला आहे. अलकसुंदरच्या (अॅलेक्झांडर) स्वारीच्या काळात काही गणराज्ये भारतात अस्तित्वात होती. त्यांचेकडून त्याला कसून विरोधही झाला, महाजनपदांपैकी गांधार, अवंती, कोसल, मगध, अंग, वंग, तर गणराज्यामध्ये शुद्रक, मालव, अंबष्ठ, मद्र, शिबी, अश्वायन ही प्रमुख होती. याच तालिकेत अश्वक–अश्मक असेही एक महाजनपदांचे नाव आढळते व मुख्य म्हणजे ते आजच्या आपल्या भौगोलिक विदर्भात असावे, असे म्हणण्याइतपत पुरावा भारत सरकारच्या पुरातत्व विभागाला उत्खननांती मिळाला आहे, व तो नागपूर जिल्ह्यात कुही तालुक्यात "अडम" या गावी मिळाला असून त्याचे संपूर्ण श्रेय सुप्रसिद्ध पुरातत्वज्ञ डॉ. अमरेंद्रनाथ व त्याच्या चमूकडे जाते. काही तज्ञ मंडळी अस्सक, अश्वक ,अश्मक हा भूप्रदेश सिंधू खोऱ्यात होता असे मानतात तर काही ह्या प्रदेशाची ओळख दक्षिणेतील गोदावरी खोऱ्यात सांगतात. पण आपल्या विदर्भातील "अडम" ह्या गावी झालेल्या विस्तृत उत्खननाने (Horizontal Excavation) काही अंशी हा प्रश्न सोडविण्यात यश मिळविले आहे. आमची चमू (मी, श्री. विलास कुळकर्णी, श्री. अंभईकर व श्री. पितळे) जेव्हा अडमला गेली तेव्हा एका उंचवटयाच्या उभयांगी तटबंदीच्या टेकाडाच्या आत विस्तीर्ण असा माळरानाचा प्रदेश असे अडमचे स्वरूप होते. ह्याच अडमला १९६९ साली ११ सुवर्ण नाणी आढळली होती. त्यातील १ नाणे हे "ऑगस्टस कायस ऑक्टाव्हीयस कॅपीयास" या राजाचे तर इतर १० "टायबेरीयस क्लाउडीयस नेरो" या राजाची होती, व ही नाणी रोमन असून नुकतीच काही नाणी, पदके या स्वरूपात आढळलेली असून (छिद्रे असलेली) त्यांचा उपयोग दागिन्यासारखा होत असावा असे उपलब्ध पुराव्यावरून दिसते. खारवेल राजा, त्याचा विदर्भावरील ससैन्य हल्ला या घटनेचा हस्ती गुंफेत असलेला उल्लेख आदीबाबत येथे अगोदरच चर्चा केलेलीच आहे. डॉ. मिराशींनी सिद्ध केलेली, कण्णवेण्णा नदी म्हणजेच कन्हान व तद्नंतर (संगमोत्तर) वैनगंगा ही बाब आम्हालाही योग्य वाटते. नुकत्याच काही तज्ञांना ह्याच वैनगंगेच्या तीरावरील एका प्राचीन शैलाश्रयात काही शिलाक्षरे आढळलेली (ब्राम्ही) आहेत. हे त्यात कुही तालुक्यात हुडुपा–कटारा, देवळी, भिवसेन, दक्षिण वैनगंगा ह्या शैलाश्रय (Rock cut cave complex) समूहातील असून त्या अक्षरांचे वाचन तंज्ञानी ए त प व ते वे ना क (ट) असे केलेले आहे, म्हणजेच ह्या पर्वतावरील वेणा नदीकाठचा प्रदेश असा त्याचा सुलभ अर्थ लावता येईल. ह्या पुराव्यावरूनही डॉ. मिराशींच्या कण्हवेण्णा सिद्धांतास उपोद्वलक बळच मिळालेले आहे, खारवेलच्या ह्या अत्यंत महत्त्वपूर्ण शिलालेखामुळे केवळ विदर्भाच्याच नव्हे तर तत्कालीन इतरही राजकीय वर्चस्वाच्या क्षेत्रावर प्रकाश पडला आहे.(जसे खारवेल व बहसतिमित–बृहस्पतीमित्र यांचे समकालीनत्व खारवेल व सातकर्णि यांचे समकालीनत्व, खारवेल व यवनराज निमित–डेमेट्रीयस यांचे समकालीनत्व; नंदराजाच्या राज्यातील कालवा, खारवेलचा निश्चित काल, काही महाजनपदांच्या भौगोलिक परिसीमा आदी अनेक समस्या सोडविण्यास ह्या शिलालेखाचा उपयोग झाला.)

अत्यंत महत्त्वपूर्ण मुद्रा

या अडम गावाला विदर्भातील मोहेंजोदडो–हडप्पा म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही असे वाटते. एकंदरीत पुराव्यांच्या विपुलतेचा, वैविध्याचा व ठोस प्रमाण असलेल्या पुरावशेषाचा विचार

करता ते कुणालाही पटेल असेच आहे. अडमच्या उत्खननात (हे गाम मांढळ–कुही तालुक्यात असून जिल्हा नागपूर आहे) एक अत्यंत महत्त्वपूर्ण मुद्रा येथे (ठसा–सील) मिळालेली आहे. त्यावर अशोकन लिपीतील काही अक्षरे वर्तुळाकार उत्कीर्ण केलेली आहेत. त्या अक्षरांचे सलग वाचन केल्यास ते अ स क स ज न प द स असे होते. त्याचे भाषांतर संस्कृतमध्ये असकस्य जनपदस्य (असकांच्या जनपदाची षष्ठी प्रत्ययात्मक) असे होत असून असकांच्या जनपदाची (मुद्रा ? प्रत्यक्ष दिसत असल्याने) असा त्या वाचनाचा दर्शनीय अर्थ निघतो. त्यामुळे असिकनगर या जनपदाच्या समस्येचा घोळ भौगोलिक पार्श्वभूमीवर सुटेल अशी आशा वाटते. तथापी पूर्ण अभ्यास, निरीक्षण, संशोधक व तज्ञांच्या चर्चा, निष्कर्ष, तुलनात्मक अभ्यास, पूर्ण झाल्यावरच निष्कर्ष काढता येईल. तरीपण ह्या मुद्रेचा पुरावा अत्यंत अस्सल व महत्त्वपूर्ण समजल्या जातो. त्यावरूनच आजचे अडम म्हणजेच तत्कालीन असिकनगर असावे ह्या सिद्धांतांच्या समीप आपण पोहचतो. तरीही अद्याप सर्वंकष अभ्यासाची आवश्यकता आहे.

अडमला आढळलेले इतर पुरावशेष

याच अडमला सर्वप्रथम १९६९ साली काही सुवर्णनाणी आढळल्याचे आपण पाहिलेच आहे, शिवाय ह्या साईटवर उत्खननांती अश्मयुगीन, ताम्रपाषाणयुगीन (Paliolithic and Chalcolithic) व लोहयुगीन (Iron age) असे काहीसे अवशेष आढळल्याचे वाचनात व ऐकीवात आहे. तरीपण जोपर्यंत विस्तृत अहवाल प्रसिद्ध होत नाही तोपर्यंत कुठलाही निष्कर्ष काढणे सयुक्तीक ठरणार नाही. तथापी कलाकुसरीच्या वस्तू, मृद्भांडी, (Pottary) धातू अवशेष, हाडांच्या वस्तू, मणी (Beades) आदी तयार करण्याचे केंद्र अडम येथे असावे असे म्हणता येते. अर्थातच व्यापारही तेजीत असावा, परिणामी जनजीवन अत्यंत समृद्ध व भरभराटीला आले होते असे दिसते. इ. स. च्या सुरुवातीच्या शतकात (पहिले–दुसरे शतक) भारताचा रोम साम्राज्याशी मोठ्या प्रमाणात व्यापार सुरू होता असे उपलब्ध रोमन नाण्यांवरून म्हणता येते, अशी नाणी भारतीय उपखंडात मोठ्या प्रमाणात आढळलेली आहे. इतकेच नव्हे तर रोमनांच्या काही वसाहती देखील या उपखंडात होत्या असा निष्कर्ष काढता येतो. विदर्भ हा भूप्रदेशही ह्यास अपवाद नव्हता हे आपण अडमला आढळलेल्या रोमन नाण्यांच्या संदर्भात पाहिलेच आहे.

अटमचे बीड मार्केट

बीड मार्केट हा शब्द केवळ मनोरंजन या अर्थाने वापरला आहे. अर्थातच अडमला मणी तयार करण्याचे व विक्रीचे मोठे केंद्र असावे असे उपलब्ध पुराव्यावरून म्हणता येते. या खननात विशेषत: धातूंचे (Metallic) खूप मणी (Beads) आढळले आहेत. अगदी सुवर्णापासून ते थेट शिस्यापर्यंत (Lead–pb.) निरनिराळया धातूंचे सुबक, सुंदर व कलात्मक मणी येथे आढळलेले आहेत. मण्यांमध्ये तर काही मणी विक्रियोग्य होते तर काही अर्धवट तयार झालेले मणीही आढळलेत. याचाच अर्थ असा की अडमला विविध प्रकारचे मणी तयार केले जात असावे व या मण्यांचा व्यापार विदर्भ–बस्तर व आंध्र प्रांतातून किनारपट्टीमार्गे युरोपशी होत असावा. अर्थातच अडम हे गाव एखाद्या प्राचीन राजपथावर असावे असे दिसते. कारण गेल्या ५–६ वर्षांत मला व इतर संशोधकांना याच वैनगंगेच्या काठी व काही अंतर्गत क्षेत्रात प्रस्तरात कोरलेली अनेक शैलाश्रये आढळलेली आहेत. ही त्या मार्गावरची निवासस्थाने असावीत काय ? किंवा कसे या बद्दल भारत सरकारच्या पुरातत्त्व विभागाने या शैलाश्रयांचाही (भिवसेन, पवनी, कोरंबी, पूल्लर, मोहाळी, जगनकोप, देवळी, पिंपरडोल, गायडोंगरी, सातमोकी, माना भद्रावती, देउळवाडा, शिरपूर, भुयारी) सर्वेक्षणाभ्यास करावा अशी नम्र व कळकळीची विनंती मी करतो. डॉ. अमरेन्द्रनाथ या संदर्भात म्हणतात की, मध्यप्रदेशातील विदीशा येथून सुरू होणारा एक राजपथ (सध्याच्या भाषेत राष्ट्रीय महामार्ग)

आंध्रप्रदेशातील अमरावती येथे पोहचत असे. हा राजपथ विदर्भातून, वैनगंगेच्या तीराने जायचा व याच मार्गावर रामटेक, पवनी, अडम ही गावे होती. पुढे ते म्हणतात, "मी सिरोंच्यापर्यंत जाऊन आलो आहे व हा राजपथ तेव्हा अस्तित्वात होता असा मला विश्वास वाटतो." या संदर्भात सर्व कृत्रिम शैलाश्रयांचा अभ्यास व्हायला हवा.

नाण्यांची विपुलता व पुरावा

नाण्यांच्या बाबतीत अडमचा खजीना (ट्रेजर) अत्यंत श्रीमंत होता. एकट्या अडमच्या उत्खननात ३००० हून अधिक नाणी आढळलेली आहेत. युरोपीय नाण्यांच्या उपलब्धतेवरून हे एक आंतरराष्ट्रीय व्यापार-उदीम केंद्र असावे असे दिसते. नाण्यांच्या बाबतीत अडमचा आढळ हा एक विक्रम (कीर्तीमान) सुद्धा असू शकतो. काही नाणी चांदी-तांबे व शिश्याची असून शिश्याच्या नाण्यांवरील शासकाचे कोरविलेले चित्र मात्र ही नाणी अत्यंत वैशिष्ठ्यपूर्ण असल्याचे दर्शवितात. शिश्याच्या नाण्यांवर शासकाचे चित्र कोरलेले असावे हा प्रकार संपूर्ण जगात प्रथमच आढळला आहे. चित्रमय नाणे सामान्यपणे आतापर्यंत सुवर्ण किंवा रजत प्रकाराचे असायचे. पण शिश्याचे चित्रयुक्त नाणे नाणकशास्त्राच्या (Numismatics) चिकित्सक अभ्यासात एक आगळेच वैशिट्ष्य दर्शविते अशा नाण्यांच्या विपुलतेवरून येथे त्याकाळी एखादी टांकसाळ (Mint) असावी किंवा कसे याबद्दलही अधिक अभ्यास केला जाऊ शकतो. सर्वच दृष्टीने म्हणजे वसाहत (Habitational) नाणकशास्त्र (Numismatics) पुराभिलेखविद्या (Epigraphy) धातुकर्मी (Metalluargy) अवजारे, (Tools) वास्तू, (Architecture) तटबंदी (Fortfication Wall) नगर योजना (Town planning) जलस्रोत (Wells) सांडपाणी निचरा (Sanitation) उद्योगधंदे (Industry & Handicraft) आदी अनेक पैलूचा नवपुरातत्त्वाच्या (New Archaeology) विकसीत तंत्रावर सखोल अभ्यास अजून व्हायचा आहे. किंबहुना उत्खननही अजून पूर्णत्वाला पोचले नाही. तेव्हा भविष्यात तज्ञ मंडळींकडून अभ्यासांती, संशोधनांती चित्र स्पष्ट होईलच !

विदर्भातील मोहेंजोदडो व हडप्पा

आजकाल तुलनात्मक उपमेयात्मक वर्णने करण्याची प्रथा साहित्यात रूढ होत आहे. जसे विदर्भाचा कॅलीफोर्निया वरुड-अमरावती क्षेत्र, विदर्भाचे स्वित्झलंड-गडचिरोली जिल्हा अशा अनेक उपमांमुळे स्रोताचे महत्त्व पटविण्यास मदत होते. तसे आपल्या विदर्भात इतक्या विविध प्रकारचे अवशेष एकाच 'साईटवर' आढळल्याने ह्या अडम गावच्या अवशेषास विदर्भातील मोंहजोदडो-हडप्पा म्हटल्यास वावगे ठरणार नाही. हे अडम गाव त्याकाळी काही खेडे म्हणून गणल्या जात नसावे तर ते एक विस्तृत असे नगर होते. कौटिल्याच्या नगररचना शास्त्राप्रमाणे अडमला परकोट, किंवा तटबंदी (Fortification Wall) होती व त्यावरून ह्या किल्लेवजा नगरात मोठ्या प्रमाणात लोकसंख्या असली पाहिजे असे वाटते. प्रवेशद्वाराची खाच स्पष्टपणे ओळखू येते. तेथील भागही २० मिटरपर्यंत खोदून अभ्यास झालेला आहे. या परिक्षेत्रात साधारण २५० ते ३०० घरे असावीत, व एक सुंदर सुनियोजित नगर असावे असे दिसते. दोन खोल्यापासून ५ खोल्यापर्यंतची घरे, त्यांच्या दगडांच्या व विटांच्या भिंती, दोन घरांच्या रांगामध्ये सोडलेले रस्ते, विटांनी बांधून काढलेल्या विहिरी, धान्य साठविण्यासाठी बांधलेल्या विहिरीसारख्या कोठ्या (Grain Store) सांडपाणी दूर वाहून जाण्यासाठी विटांनी व्यवस्थित बांधलेल्या नाल्या, विटांच्या जोडातून पाणी झिरपू नये म्हणून पक्के केलेले जोड, आदी अनेक बाबी उत्खननात स्पष्टपणे आढळल्या आहेत. रस्त्यावरील हवा-पाणी व प्रकाश (सूर्य) याची व्यवस्था, रस्त्याचे काटकोनीकरण, रुंदी आदींचे निरीक्षण केल्यास मोहेंजोदडो-हडप्पाची स्मृती जागी होते. घरांना लाकडी दरवाजे असून त्यांना लोखंडाच्या बिजागीरीच्या मदतीने पक्के केल्याचे

आढळले, याचाही स्पष्ट पुरावा आढळला. या सर्व अवशेषावरून नगराचे नियोजन करून नगर वसविले असा अंदाज बांधता येतो. शिवाय मृदभांडी, मणी, खेळणी, धातूच्या वस्तू, शिल्पे, मृद-उपकरणी नाणी यांचा पुरावाही विपुल आहे. साधारणतः अडमच्या क्षेत्रात ७०० ते ८०० इतकी लोकवस्ती त्यावेळी म्हणजे २००० वर्षापूर्वी असावी अर्थातच गाव मोठेच होते. डॉ. अमरेंद्रनाथ आपल्या एका पत्रपरिषदेत म्हणतात की, मोहेंजोदडो व हडप्पा येथे सिंधू संस्कृतीची विकसित नगरे सापडल्यानंतर [पण आता कालीबंगन, लोथल, सूरकोटडा धोळवीरा, कोटडा, गढवाल गढी अशा अनेक साईटसवर (राजस्थान व गुजराथ) सिंधू संस्कृतीचे अवशेष आढळले आहेत.] एखादे पूर्ण नगर उत्खननात बाहेर येण्याची ही भारतातील पहिलीच वेळ होय. त्या ठिकाणच्या विटा ह्या अत्यंत वैशिष्टयपूर्ण असून तत्कालीन मंडळींना अशा विटा मोठया प्रमाणावर तयार करण्याची कलाही अवगत असली पाहिजे. असे भव्य नगर अडम् म्हणजे आपल्या विदर्भाचे मोहेंजोदडो-हडप्पा नाही असे कोण म्हणेल ?

अडमचा नाश कसा झाला ?

एवढे भरभराटीला आलेले हे शहर व्यापारी केंद्र व तत्कालीन राज्यवंशवस्थेतील एक महत्त्वाचे स्थान अचानक गडप कसे काय झाले असावे ? हा एक मोठा यक्षप्रश्नच आहे. तथापि जागतिक इतिहासात नैसर्गिक आपत्ती किंवा परक्यांचे आक्रमण या दोनच प्रकारांनी एखादे नगर, किंवा वसाहत उध्वस्त होऊ शकते. नैसर्गिक आपत्ती म्हणजे दुष्काळ, जलराशीची शुष्कता, भूकंप, महामारी रोगराई, पुराचे पाणी, आग, जमिनीची नापीकी यापैकी कशाचेही पुरावे खननात मुळीच आढळले नाहीत. उलट नाणी, घरे, सामानसुमान, मडकी, आदी सर्व अवशेष सुस्थितीत सापडले यावरून अडमचे नागरिक अचानक गाव सोडून जीवाच्या भितीने पळाले असे स्पष्टपणे दिसते. याचे सयुक्तिक स्पष्टीकरण फक्त कलींगसम्राट खारवेलाच्या अचानक उद्भवलेल्या आक्रमणातच दिसू शकते. आक्रमकांनी सोने-चांदी दागिने आदी मौल्यवान वस्तूंची लूटालूट केली व सामान्य जनतेला परागंदा होण्यास भाग पाडले. त्यामुळेच येथील उत्खननात सोन्याची नाणी व दागिने विपुल प्रमाणात आढळले नाही. अपवादात्मक पुरावा क्वचित असेलही. पण तो निष्कर्षाप्रत नव्हता. आक्रमणात मणी-उद्योग, हस्तकला, पर्यायाने व्यापार नष्ट झाला. साहजिकच पुढे या स्थानी वस्ती अशी झालीच नाही. अर्थातच जीवाच्या भीतीने निर्मनुष्य अडम् नगराचे रूपांतर एका शुष्क व निष्प्राण टेकडीत झाले असावे व पुढे शनैः शनैः हे नगर जमिनीत दबून जाऊन गडप झाले असावे. अडम या शब्दाचा अर्थही कचरा किंवा ढीग (कचऱ्याचा ढीग) असा होतो. ह्याकडेही आपण लक्ष दिले पाहिजे, आज २००० वर्षापासून पावसापाण्यात, उन्हातान्हात, ओसाडपणात निर्मनुष्य स्मशानसम झालेले अडम डॉ. अमरेंद्रनाथांसारख्या निष्णात व कसलेल्या पुरातत्वतज्ञांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली त्यांचे चमूकडून बोलके व सजीव झाले याबद्दल डॉ. साहेबांना व त्यांचे प्राण असलेल्या चमूला मनःपूर्वक धन्यवादच द्यायला हवेत. माझी त्या विभागाला एकच विनंती आहे, की त्यांनी ह्याचे स्लाईडस् बनवून शैक्षणिक संस्थांना त्या पाहण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.

विदर्भातील लोकप्रतिनिधींचे आद्यकर्तव्य

आता प्रश्न असा पडतो की या सर्व पुरावशेषांचे उत्कृष्ट अद्ययावत संग्रहालय प्रत्यक्ष अडम गावातच व्हायला हवे. या दृष्टीने अगदी युद्धपातळीवर प्रयत्न व्हायला हवे, व ते काम विदर्भातील लोकप्रतिनिधींच्या मार्फत (खासदार-आमदार) व्हायला हवे. म्हणजे केवळ भारतातीलच नव्हे तर अडम हे गाव जागतिक योग्यतेचे होऊन पर्यटक-अभ्यासक-संशोधक या ठिकाणी येऊन प्रत्यक्ष या अवशेषांचा अभ्यास करून नवपुरातत्वाच्या संदर्भात नवनवे (New Archaeology) सिद्धांत मांडतील. असेच सुंदर-सुबक व भव्य संग्रहालय गुजरायेत लोथल ह्या गावी (५००० वर्षापूर्वीची

सिंधूसंस्कृती कालीन गोदी, Dock–yard) शासनाने उभे केलेले आहे, व ते मी स्वतः जाऊन अभ्यासिले व पाहिले आहे.

अगदी अशाच धर्तीवर आपणही आपल्या विदर्भात असे अद्ययावत संग्रहालय अडम या गावी करण्यासाठी सरकारच्या गळी ह्या प्रकल्पाची माहिती व आवश्यकता उतरविली पाहिजे. या दृष्टीने विदर्भातील आमदार–खासदारांनी या भव्य स्वरूपाच्या महत्त्वाच्या कार्यात पुढाकार घेऊन या संपूर्ण खनन प्रकल्पाचे रूपांतर अडम या गावी जागतिक संग्रहालयाच्या स्वरूपात कसे करता येईल ह्या दृष्टीने अगदी युद्धपातळीवर प्रयत्न करायला हवा. व ते संग्रहालय जागतिक पर्यटन केंद्र कसे होईल ह्याकडे जातीने लक्ष पुरवून (म्हणजे प्रसिद्धी, आकाशवाणी, दूरदर्शन, डॉक्युमेंटरी फिल्म्स–प्रसिद्धी विभाग संचालनालय प्रदर्शने आदी) विदर्भातील ह्या मोहेंजोदडो–हडप्पा क्षेत्रास जागतिक अभ्यास केंद्राचे स्थान कसे देता येईल ह्याकडे लक्ष द्यायला हवे तरच पुढच्या पिढीला आपण विदर्भातील काही तरी गौरवशाली असे दाखविल्याचा स्वानंद–परमानंद आपणास होईल.

श्रीपाद केशव चितळे
बी. एस्सी (जीव.) एम. ए. (पुरातत्व)
संशोधन विद्यार्थी, नागपूर
कोठी रोड महाल, नागपूर

संदर्भ सूची

१. एपिग्राफीया इंडिका / खंड २० / पृष्ठ ८३
२. J. A. S. Bom (New Series) XXXIII P. P 37 f,
३. I. H. Q. XIV P. 463 n' 25
४. क्र. १८. पं. २१
5. A. B. O. P. 1 XXV PP. 167 f.
६. (निर्णयसागर प्रेस) रामायण, किष्किंधा कांड स. ४१ श्लोक १०
७. महाभारत (चित्रशाळा प्रेस) भीष्मपर्व ९, उद्योगपर्व ४–१८–१९
[सातवाहन और पश्चिमी क्षत्रपोंका इतिहास और अभिलेख म. म. डॉ. वा. वि. मिराशी]
८. डॉ. अमरेंद्रनाथ यांची पत्रपरिषद अंश. / त. भा. ८ एप्रिल, ९ एप्रिल १९९१
९. चंद्रपूरचा इतिहास / श्री. अ. ज. राजूरकर
१०. माझे दोन लेख / लोकमत दैनिक–व नागपूर पत्रिका दैनिक
११. वि. सं. मंडळ वार्षिक १९८३ / डॉ. शां. भा. देव, १९८७ / शैलाश्रये-श्री. के. चितळे
१२. संशोधन मुक्तावली सर ३ रा. / डॉ. वा. वि. मिराशी
१३. प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृती डॉ. देगलूरकर, डॉ. ढवळीकर, डॉ. गायकवाड
१४. Souvenir Coins from Vidarbba / Dr. A. M. Shastri
१५. प्रत्यक्ष वार्तालाप / श्री. विलास कुळकर्णी, कै. शं. गो. चट्टे. प्रा. म. शं. बाबगावकर, डॉ. म. त्र्यं. सहस्रबुद्धे.
१६. Indian Paleography / डॉ. अहमद हसन दाणी–पेशावर विद्यापीठ]
१७. ऋग्वेदसंहिता / श्री. सातवळेकर [भाषांतर श्री. चित्राव.]
१८. (सुरभी) दूरदर्शन मालिका

■

॥ प्रतिक्रिया ॥

अर्वाचीन मराठी बीजकवी

अवधूत हर्डीकर

[सप्टें-नोव्हें '९१ च्या अंकातील डॉ. सुरेश भृगुवार यांच्या 'अर्वाचीन मराठी बीजकवी' या लेखावरील प्रतिक्रिया सोबत प्रकाशित करीत आहोत. त्या लेखाचे लेखकही नागपुरात सध्या उपलब्ध असल्याने या प्रतिक्रियेवरील त्यांचे भाष्य प्राप्त करून ते देखील सोबत प्रकाशित करीत आहोत.]

मराठी कवितेचे जनक, अर्वाचीन मराठी कवितेचे जनक, अर्वाचीन मराठी बीजकवी केशवसुत वगैरे शीर्षके वाचली; की, ठोकळ अनुमानांच्या आधारावर, अभिनिवेशाच्या किंवा केवळ भावनिकतेच्या आहारी जाऊन; निर्धास्तपणे विधाने करता येण्यातली, आपली बाणवलेली सवय आपण कधीही सोडून देऊ शकणार नाही; असे वाटू लागते.

वामन पंडित, रघुनाथ पंडित, मोरोपंत पराडकर अशासारख्या कवींना पंडित कवी ठरवून; त्यावाटेला जाण्याचं आपणाला कारण नाही, अशी सोय आपण करून ठेवलीच आहे. 'पंडित कवी', असा छाप मारलेला असला, की पंडित म्हणून लब्धकीर्त असेही कविपुंगव साहित्यिक तसेच इतर लेखकवर्ग सारेच बिथरतात. त्यांच्या वाटेला जाण्याचं साहस; किंवा टेक्स्ट बुकांत त्यांच्या सुंदर-सुंदर काव्याची ओळख येण्याचेही थांबते. एकूण दुर्लक्षच होते अशा कवींकडे. त्यामुळे अशा कवींशी तुलना होऊन केशवसुत उणे पडतील अशा भीतीपोटीसुद्धा ही 'पंडित कवींची' निवड विचक्षणांनी केली असावी असे वाटू लागते.

म्हणून 'अर्वाचीन', 'आधुनिक', 'सामाजिक बांधिलकीचा विचार भावलेला पहिला कवी' वगैरे विशेषणांचा वापर करून आपल्याला इष्ट असलेल्या कवीला किंवा व्यक्तीला लोकांपुढे मांडता येते.

पण, एकदा का, ज्याला आपण अर्वाचीन कवितेचे किंवा विचारांचे जनक समजत होतो; त्यांनी मांडलेला विचार, हा दुसऱ्या भाषेतल्या विचारांचा अनुवाद होता; हे समजले, की त्या जनकतेचा रंग थोडा फिका पडू लागतो.

शिवाय, अर्वाचीन म्हणजे काय ?... हे, काळाच्या संदर्भातलं विधान आहे. हा काळ, अमुकच असं ठरविण्यामागची सर्वमान्य अशी तर्कसिद्ध प्रणाली आपल्याकडे प्रस्थापित झालेली आहे काय ?

'बीजकवी'... वगैरे कल्पना तर फारच ढोबळ आणि ती एकापेक्षा अधिक कवींना नेतृत्व देण्याच्या भाबड्या कल्पनेतून जन्मली असावी असे वाटते. भा. रा. तांबे, बालकवी, मर्ढेकर यांच्या प्रेमगीतांचं 'बीज' किंवा तो 'बीजमंत्र;' केशवसुती कवितेने जपला आहे हे सुचवणं, या पुढच्या सर्व कवींच्या प्रतिभेवर अन्याय करणार आहे. कल्पना किंवा विचारांतील एकादा धागा पकडावयाचा आणि कालिक दृष्टीने तो धागा मागे कोणापर्यंत पोचवता येतो; ते पहावयाचे व त्याच्या विचारात या नवीन कवींच्या प्रतिभांनी जन्म घेतला असं भासवणारं, अत्यंत सावध असं विधान करावयाचं, त्याकरता, "बीज" वगैरे शब्द वापरावयाचे, हे सर्व सर्व आपण, आता थांबवायला हवंय्. कारण; त्यातून, सिद्धप्रतिभेचं लीलया दर्शन घडविणाऱ्या या ख्यातनाम कवींवर, भाषण भाडखाऊने उपजीव्यतेचा शिक्का मारत असतो; आणि, तसे ते नक्की नव्हते.

उपजीव्य विचारांचा आणि अशाच कल्पनांवर गुजराण करणाऱ्या कवी आणि लेखकांचा विचार करणाऱ्या कवी आणि लेखकांचा विचार करावयाचं थांबवलं; आणि स्वच्छ दृष्टीनं पाहिलं; तर, प्रतिभांचा अनंत हस्तानं विस्तार करणारे अनेक प्रतिभावंत आपल्यामध्ये होऊन गेलेले आहेत आणि आजही आपल्यामधे आहेत हे मानावं लागते.

गुणवंत अशा कवी आणि विचारगर्भ, चिंतनगर्भ, विवेकशील असं लिखाण करणाऱ्या साहित्यिकाला त्याच्या मृत्यूनंतरच. त्याची ओवाळणी करणारे आणि काही वेळा त्याच्या आश्रयाने रहाणारेही लोक भेटतात. ते जिवंत असताना, जाणूनबुजून त्या गुणांची हेळसांड, त्या व्यक्तींचा विचारपूर्वक केलेला अपमान, यांत काही हितसंबंधी व त्यांनी केलेले गट, सहभागी असतात. ऊर्जस्वल आणि नवनवीन विचारांचा सातत्याने प्रसार करणाऱ्या गुणवंतांना मारक ठरणाऱ्या या गोष्टी थांबवून; आपण आपल्याला सोयीचं वाटेल तेव्हां गुणांचं कौतुक करण्याच्या गोष्टी विसरायला हव्या आहेत.

वगळू शकणाऱ्या विशेषणांनी, सहज भविष्यांत, दुर्लक्ष होऊ शकेल अशा त्या त्या कवींच्या वर्णनांनी तात्कालिक फायदे मिळताहेत असे वाटत असलं; तरी, यामुळेच कोणत्याही साहित्याच्या वस्तुनिष्ठ विकासाला मारक असलेल्या गोष्टी आपण करीत आहोत हे लक्षात घ्यायला हवं, जाणकार लोकांनी तरी हे टाळणं आवश्यक आहे. आणि हे मराठी-साहित्याच्या प्रांतात घडलं तरच सर्वच कवींचा आपण वस्तुनिष्ठ-व्यक्तिनिष्ठ नव्हे; विचार करू. सुरेश भटांचं कविता वाचन कोठेही झालं; तरी ते काळ आणि व्यक्ती यापलीकडे विचार करायला लावतं; म्हणून त्याचा परिणाम परिस्थितिनिरपेक्ष अशा आणि दूरगामी होत असतो...पण याच कारणामुळे त्यांना वगळायचं तंत्र सुद्धा वेग घेत असते.

तेच सुधीर मोघे यांच्या बाबतीत ! ...आणि पूर्वीच्या काळी, मर्ढेकरांच्या बाबतीत तेच झालं. हे कवी कोणत्याही बीजकवीच्या किंवा बीजमंत्राच्या प्रभावाखाली नव्हते आणि नाहीत.'

एवढं सगळं, असूयासिंधूत न्हालेल्या लोकांचं आवरण; भोवताली असूनही बालकवी, खांडेकर, मर्ढेकर, वरेरकर, जोशी, गडकरी, तांबे, पेंढारकर, द्वादशीवार, सुरेश भट...आदि आदि व्यक्ती; की या प्रत्येक व्यक्तीचं काही स्वतंत्र योगदान मराठी सारस्वताला आहे हे मान्य करावं लागतं; की ज्यांचं "बीज" कुठं अन्यत्र शोधत जाण्याची व कसे तरी करून चिकटवण्याची गरजच नाही.

कोणाच्या तरी आश्रयानं, कोणाच्या तरी संदर्भात एखाद्याचा विचार करण्याची सवय सोडून देऊन, स्वच्छ वस्तुनिष्ठ अशा विचारांच्या आधारानं आपण साहित्यकृतीकडे पाहिले; तर... मला वाटतं, मराठी साहित्याच्या अवलोकन प्रक्रियेतला तो महत्त्वाचा सुदिन ठरेल ! ■

१६ ए. श्रीगणेश कृपा सोसायटी श्रीरामकृष्ण परमहंस नगर, कोथरूड, पुणे-४११ ०३८.

सप्टें.-नोव्हें. ९१ च्या अंकातील 'अर्वाचीन मराठी बीजकवी' ह्या माझ्या लेखावरील श्री. अवधूत हर्डीकर, पुणे यांची आपण मला वाचावयास दिलेली प्रतिक्रिया वाचली. आनंद झाला. खरे तर ही माझ्या लेखावरील प्रतिक्रिया नसून, माझ्या लेखाच्या निमित्ताने त्यांनी स्वतंत्र विचारच मांडले आहेत. ह्या विचारांचे बीज माझ्या लेखात सापडते, एवढेच ! माझ्या लेखातील व त्यांच्या पत्रातील विचारांचे सूर परस्परांशी जुळणारेच आहेत. माझ्या लेखाची त्यांना दखल घ्यावीशी वाटली, ही देखील सुखद अनुभूतीच होय !

पंडित कवी, संत कवी वगैरे 'लेबले' (शीर्षके मुद्दाम म्हटले नाही !) चिकटविणे ह्या प्रवृत्तीबद्दल त्यांची तक्रार त्यांच्या परिने रास्त आहे. परंतु समीक्षक कवी / लेखकाबद्दल वा विशिष्ट संप्रदायाबद्दल स्वतःच्या प्रतिक्रिया नोंदविणारच ! साहित्याभ्यासात (वा साहित्येतिहासाच्या अभ्यासात) कालदर्शक, प्रवृत्तिदर्शक संज्ञा येणारच ! "ह्या काल अमुकच ठरविण्यामागची सर्वमान्य तर्कशुद्ध प्रणाली झालेली आहे काय ?" असा प्रश्न हर्डीकरांना 'अर्वाचीन' शब्दामुळे पडतो. ह्या संदर्भात ते स्वतः पर्यायी शब्द सूचवू शकतात. तो ययोचित ठरल्यास समीक्षकांना मान्य होईलही !

"सुरेश भटांचं कवितावाचन कोठेही झालं तरी ते काळ आणि व्यक्ती यापलिकडे विचार करायला लावतं"–म्हणजे काय ? काव्यवाचन विचार करायला लावतं म्हणजे काय ?

त्यांच्या पत्राच्या शेवटी 'स्वच्छ वस्तुनिष्ठ अशा विचारांच्या आधारानं साहित्यकृतीकडे पाहावं' असे ते म्हणतात, हे कुणालाही मान्य व्हायला हरकत नाही. व्यक्तिनिष्ठेकडून हळूहळू स्वतःला वेगळे ठेवीत वस्तुनिष्ठेकडे जाणे, असा समीक्षेचा प्रवास हवा. संशोधन–समीक्षेची एक पद्धती आहे, शिस्त आहे. त्यामुळे तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ भूमिकेतून साधार विधाने करावी लागतात. त्यामुळे "....प्रत्येक व्यक्तीचं स्वतंत्र योगदान मराठी सारस्वताला आहे..." हे श्री. हर्डीकरांचे मत तपासून बघायला हवे. ह्या विधानात अतिव्याप्तिदोष आहे. समीक्षेची शिस्त अंगी बाळणे आवश्यक असते. ती शिस्त अंगवळणी पडावी लागते. समीक्षा /शोध ही वृत्तपत्री–परीक्षणे वा तात्कालिक प्रतिक्रियांची नोंद नव्हे !

आणि समीक्षेत कोणताही शब्द शेवटचा नसतो ! असो. श्री. हर्डीकरांना धन्यवाद. कळावे.

आपला

सुरेश मुगदार

[ता. क. : एका उद्बोधन–शिबिरात विद्यार्थ्यांना दिलेल्या निबंधांच्या विषयांच्या यादीत एक विषय 'अर्वाचीन मराठी काव्यातील बीजकवी' असा होता. अनेकांची प्रतिक्रिया– "म्हणजे केशवसुतांवर लिहिलं की झाला निबंध तयार" अशी होती. यातून या संबंधात चिंतन सुरू झाले; व पुढे प्रस्तुत लेख तयार झाला. 'बीजकवी' हा शब्दही माझा नव्हे, हे नीटपणे लेख वाचल्यास कळेल. तो कुणाचा असावा याचा फक्त अंदाज करता येईल. पण याला निश्चित आधार नाही.]

'ज्ञानेश्वरीतील श्रृंगारविश्व' हा लेख वाचला. आध्यात्मिक व प्रसक्त वैचारिक प्रक्रिया ही साक्षात्कारी महात्म्याची सयुक्तिक अनुभूती असते. प्रत्यक्ष व्यवहारात अनुभव व आत्मानुभूती ही जनसामान्यांच्या नजरेत वेगळी भासत असली, तरी ज्ञानेश्वरांसारख्या साक्षात्कारी संताला ती परस्पराहून भिन्न वाटत नाही.

आध्यात्मिक सर्वोच्च पातळीवरून बघितल्यास काम, क्रोध, लोभ, मोह माया व मत्सर हे मानवाचे रिपू अथवा विकार, तोपर्यंत सिद्ध होत नाहीत, जोपर्यंत ते आपल्या नियंत्रणात आहेत. विशिष्ट अवस्थेत कल्पनांचे तरंग उठणे हा चित्ताचा गुणधर्म असल्यामुळे कुठल्याही संवेदनशील मनात रसोत्पती होणे, ही स्वाभाविक क्रिया वाटते. त्यानुसार ह्या ईश्वरी क्रियांना प्रमाण मानून अनुशासनबद्ध अनुपालन करणे, हा प्रत्येक व्यष्टी आत्म्याचा स्वधर्मच सिद्ध होतो.

कामवासना हीसुद्धा यापैकीच एक स्वाभाविक (दैवी) भावोत्पत्ती आहे. ह्या भावनांना रिपू अथवा विकार संबोधून पूर्णपणे त्यागी वृत्ती धारण करणे, ही बळजबरीची क्रिया मनोविकृती वाटते.

तद्वतच मनोवृत्तीवर ताबा न ठेवता स्वैराचार करणे, ही सुद्धा अनैतिकता सिद्ध होते. स्वैर मन:-प्रवृत्तीने ग्रासलेल्या स्त्री-पुरुषांचे शेवटी क्षणिक सुखापायी कसे हाल होतात; याचे सुद्धा वर्णन ज्ञानदेवांनी आपल्या श्रृंगारिक काव्यातून केलेले आहे. यामागे ज्ञानदेवांचा सद्हेतू हाच आहे, की दुराचारातून लोकांची मुक्तता व्हावी, व त्यांना सुमार्गाला लावावे.

ज्ञानदेवांनी योग्यास येणाऱ्या ब्रह्मसुख प्राप्तीचे वर्णन जे केले ते वास्तव (सत्य) दैवी वर्णन आहे. कुंडलीनी जागृत झाल्यानंतरची ती शाश्वत अनुभूती आहे. स्वानुभूतिशिवाय हे अशक्य वाटते; या कुळकर्णी यांच्या विधानास माझे अंतरमन पुष्टीच देते.

"वयाची सत्तरी ओलांडल्यानंतर त्यांनी ज्ञानेश्वरीच्या रचनेस सुरवात केली", हे मात्र विधान वस्तुस्थितीस अनुसरून वाटत नाही. ईश्वरी कृपाप्रसाद प्राप्त झालेल्या व बालवयात साक्षात्कार प्रारंभ झालेल्या ज्ञानदेवांना भाषा वर्धमान होण्यास वयाचे २२ वर्ष भलेही कमी पडू शकतात परंतु ज्ञानेश्वरी पूर्ण करण्यास ४० पेक्षा जास्त आयुमर्यादेची जरूरत भासत नाही. [याबाबतीत विस्तृत चर्चा प्रतिक्रियेमध्ये शक्य नाही.]

ज्ञानदेवांच्या लीला व आयुमर्यादेसंबंधीची प्रचलित प्रमेये विसंगत वाटणे सहाजिकच आहे. याला कारणीभूत त्यावेळची भोळी व अंधश्रद्धाळू जनता, व त्यांच्या साधेपणाचा फायदा घेणारे त्यावेळचे अल्पशिक्षित, धूर्त व पाखंडी असावेत. ज्ञानेश्वरांच्या लौकिक जीवनातील वास्तवाला सामोरे जाऊन काही निष्कर्ष व अनुमाने काढता येणे शक्य आहे; पण श्रद्धावानांच्या भावना दुखावतील म्हणून येथेच संपविलेले बरे.

वसंत रामचंद्र साळवणकर
पेंच इरीगेशन कॉलनी, टेकाडी (कन्हानजवळ)
ता. पारशिवनी, जि. नागपूर

अनुक्रमणिका

ग्रं थि की

' हुंदका ' : ' गावाकडची गाणी '

चि. ज. (आप्पा) देशपांडे

हुंदका

' स्वयंदीप प्रकाशन ', विक्रोळी, मुंबई द्वारा प्रकाशित झालेला ' हुंदका ' हा एक काव्यसंग्रह. मराठवाड्यात जन्मास येऊन कर्नाटकच्या धारवाड विद्यापीठात मराठीचे प्राध्यापक होऊन राहिलेल्या प्रा. बाबुराव गायकवाड यांची ही कलाकृती. कॉलेजचे शिक्षण घेत असतानाच त्यांना कविता करण्यात रस वाटू लागला आणि त्यांच्याच म्हणण्याप्रमाणे त्यांनी ' धुंद ' ही कविता एका काव्यवाचनात वाचून दाखविली.

गीत गायनाच्या धुंदीतच ' जीवन ' जगत जीवन पथावरून जात असताना चिमण्या बालजीवाचे सदाहसरे भाव पाहून स्वर्गसुखाची अनुभूती अन् एक रहस्य शोधण्याच्या खटाटोपात उजाड जीवनाची संपत आलेली ' शिदोरी ' जपत मध्येच आई सोडून गेल्याचे दुःख, दाटलेले हुंदके मोकळे करत ही कविता वळण घेताना दिसते. ' हुंदका ' या कवितेतून आक्रोश, विद्रोह व्यक्त होता अन् मग त्यानंतर एका मागून एक ' सलाम ', ' अवघड ' ,' शब्द ', ' तग ', अशा कविता साकार होताना दिसतात.

प्रा. बाबुराव गायकवाडांच्या कवितेत जसा हळवेपणा आहे तसाच तिच्यात विद्रोह आहे, आक्रोश आहे, आत्मपरिक्षण आणि संवेदनशीलताही आहे. ' हुंदक्या 'तील कविता म्हणूनच मनाला भिडतात.

× × ×

' गावाकडची गाणी '

हा दुसरा कविता संग्रह. ' गावाकडची गाणी '. जवाहरनगर (भंडारा) येथील आयुध निर्माणी कार्यालयात सेवारत असलेल्या हिरामण लांजे या कवीचा. त्यांचा पहिलाच कविता संग्रह. आपल्या ग्रामभूमीचा अन् परिसराचा एक प्रकारचा ओढा आणि जवळीक त्यातून सर्वच कवितातून दिसून येते. त्याची कविता कधी डोंगरमाळावरून, कधी नदीनाल्याच्या काठाकाठानं तर कधी खेड्यातल्या कौलारू अन् गवती छपराच्या झोपड्या-झोपड्यातून भटकताना दिसते. तिथं जीवन जगणारी उन्हातान्हात, थंडी-पावसात तुटपुंज्या फाटक्या वस्त्रानिशी अन् मिळेल त्या अन्नावर दिवस काढणारी माणसं यांचं करुण आणि दारुण चित्रण पहावयास मिळते. देवायत्त असलेल्या भाकरीवर विपत्तीतही सदा आनंदी कसं रहावं याचा खरा प्रत्यय घ्यायचा असेल तर या ग्रामवासी शेतकऱ्यापासून शिकावं. आपला संसार सुखा-समाधानानं कसा रेटावा हे शिकावं तिथल्या मायभगिनीपासून, त्यांची काळी आई-शेतजमीन, त्यांची शेतात राबणारी जनावरं त्यांचा जीव की प्राण. त्याच्यावरून ते जीव

ओवाळून टाकतील. त्यांच्यासाठी स्वत: अन् आपल्या कच्च्याबच्च्यासहित प्रसंगीउ पाशी राहतील पण जनावरांना जगवतील.

अशा या बळीराजाची शासनानं ससेहोलपट चालवली आहे. शासनाकडून देण्यात येत असलेल्या पोकळ आश्वासनावर आपल्या उपजत निर्मळ मनानं विश्वास ठेवून दिवस काढत आलेला हा शेतकरी आपण फसविले जात आहोत अशी जागृती घेऊन उभा ठाकत आहे. त्याची सहन-शक्ती संपत आलेली आहे याची जाणीव कवीला प्रकर्षानं झाल्यासारखी वाटते

खेड्यातले संसार दारिद्र्य, दुःख, उपासमार यांना सोबतीला घेऊन चालत असतात. पण अशाही रंजल्या गांजल्या अवस्थेत कधी कधी सुखाची हिरवळही विखुरलेली असते. त्याचे वर्णन ते करतात. खेड्यातला शेतकरी आपली पूर्वापारची शेती हाले हाले विकायला तयार होत नाही परंतु कालपरत्वे तसा प्रसंग आलाच तर त्याची कारभारीण त्याला त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करते असे अनेक बारकावे श्री. हिरामण लांजे यांनी आपल्या या कवितासंग्रहातून व्यक्त केले आहेत. पहिल्याच प्रयत्नात त्यांनी तशी काहीशी मजलच मारलेली आहे, पहिली झेप खूप अंतर गाठणारी असेल अशी कुणीतरी अपेक्षा कां करावी ?

हुंदका : प्रा. बाबुराव गायकवाड
स्वयंदीप प्रकाशन, कन्नमवारनगर
विक्रोळी (पूर्व) मुंबई ८३

■

गावाकडची गाणी : हिरामण लांजे
प्रकाशक : सौ. सुषमा लांजे
'विवेक प्रकाशन'
मु. बुधेवाडा, पोस्ट झरपडा, जि. भंडारा

'गोष्ट प्रेमाची'

एक विशिष्ट कल्पना डोळ्यापुढे ठेवून 'गोष्ट प्रेमाची' या आपल्या एकांकिकेतून योगेश्वर गंधे यांनी ती कल्पना साकार करीत नेली आहे. 'प्रेम आंधळे असते' अशाच काहीशा कल्पनेवर आधारित अशी ही एकांकिका आहे. आपल्या मनात घर करून बसलेल्या जिवंत अथवा मृत प्रेयसीवर स्थिर झालेल्या प्रेमानं वेडा होऊन एक तरुण त्याच स्वप्नात तरंगत राहतो. अन् ती पूर्ती होण्या अगोदरच अचानक तिच्या अपघाती मृत्यूनं प्राप्त झालेल्या विरहानं सिद्ध होऊन स्वत:च स्वत:ला विसरून जातो. आपणाला केव्हातरी ती भेटेल, दिसेल अन् मग आपण तिला आपलं हृदगत सांगून टाकू अशा वेड्या आशेनं तो तिच्या थडग्यालाही कवटाळीत बडबडत असतो. त्याची अशी विभ्रमी अवस्था पाहून कुणी प्रिय व्यक्ती त्याला स्वप्नातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करू पाहते तरीही तो सावरला जात नाही. 'माझं प्रेम, माझं स्वप्न या थडग्यात या इथं झोपलेय् मला ते केव्हा तरी भेटेल' ह्या ध्यासानं तो स्वत:च संपून जातो, संपवून घेतो.

अन् आता तिथं दोन थडगी तयार होतात. तरुणाच्या त्या हाराकिरीनं व्यथित झालेली ती प्रिय व्यक्ती आता त्या दोन्ही थडग्यांना कवटाळीत म्हणत राहते माझं स्वप्न, माझं प्रेम दडलंय् या दोन थडग्यात. या विश्वातल्या तरुण-तरुणींच्या 'प्रेमाची' गोष्ट आहे ती.

'एक शून्य शून्याकडे !'

दुसरी एकांकिका एक शून्य शून्याकडे. यात लेखक आणि त्याचा एक मित्र यांना आलेल्या अनुभवाचं प्रतिबिंब यात प्रकटल्याचं लेखक म्हणतो.

मनुष्यप्राणी जन्मतात, जगतात, मरतात अन् परत जन्मतातही, जन्म मरणाच्या एकाच फेऱ्यात ते प्रवास करीत असतात. जन्माला घातला गेल्यावर अवतीभवतीची मंडळी त्याला साथ देत असतात. फक्त मरेपर्यंत. लोक रडतात सोबती गेला म्हणून...पडलेल्या मढयाला कवटाळत. कारण अवघे प्रेम करीत असतात त्याच्या शरीरावर पण गेलेला असतो एकटाच तो.

आयुष्याचा वैताग आलेला माणूस स्वतःला कायमचा उचलून घेऊन जायला प्रार्थना करीत असतो पण भलताच कुणीतरी दुसरा मरण पावतो अन् हा काही काळ मागेच राहून घोटाळत असतो.

या दोन्ही एकांकिकेतून लेखकाने मांडलेल्या कल्पना विचाराला चालना देणाऱ्या ठरतात. त्यात लेखक बराचसा यशस्वी झालेला आहे.

'गोष्ट प्रेमाची', / 'एक शून्य शून्याकडे' (एकांकिका)
लेखक-श्री. योगेश्वर गंधे
'शब्द पर्व' प्रकाशन, नेहरू नगर (कुर्ला) मुंबई-२४

'सुभेदार रामजीबाबा आंबेडकर'

आपले वडील रामजी यांच्याही पेक्षा शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात बहुमोल, बहुकोणीय प्रगती करून पुत्र डॉ. भीमराव आंबेडकर एकदम जगभर प्रसिद्धी पावले. पुत्राच्या या चौफेर प्रसिद्धीच्या झोतामुळे रामजीरावाची कर्तृत्वशाली कामगिरी अंधुक झाली. डॉ वि. गो. दुर्गे यांनी सुभेदार रामजीबाबा यांची अस्पष्ट स्मृती त्यांचे चरित्र लिहून पुन्हा उज्ज्वल केली आहे.

एके काळच्या कर्तृत्ववान, असामान्य व्यक्तीचे पडद्याआड गेलेले नाव या पुस्तकाच्या रूपाने डॉ. दुर्गे यांनी जनतेसमोर आणले. दलितांचा हा पितामह पुस्तकरूपानं पुन्हा उभा झाला.

'अंतयात्रा व श्रद्धांजलि' या परिच्छेदातून एक विधान डॉ. दुर्ग्यांनी जाता जाता केले ते असे की, स्व. रामजीचे श्राद्ध पत्नी रमाईच्या आग्रहावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी यथासमय विधिवत् केले. हे विधान जरा वादग्रस्त ठरण्याजोगे वाटते. हिंदुधर्मातील काही जुन्या बुरसटलेल्या भाव श्रद्धांवर कठोर प्रहार करणारे डॉ. आंबेडकर असे करणे कसे शक्य आहे ? असा प्रश्न डॉ. आंबेडकरांच्या निःसीम अनुयायाकडून उपस्थित होऊ शकतो. तथापि रामजींचे चरित्र अभ्यासातून मांडणाऱ्या डॉ. दुर्ग्यांनी या संबंधीची माहिती कुठून तरी प्राप्त केल्याशिवाय असे विधान मुद्दाम घुसडले असावे असे एकदम म्हणावेसे वाटत नाही. हे विधान सत्य, अर्धसत्य किंवा असत्य हे सांगण्यास रमाईही नाही अन् डॉ. आंबेडकरही नाहीत.

दलितांचे पितामह सुभेदार रामजीबाबा आंबेडकर
(चरित्र) – ले.–डॉ. वि. गो. दुर्गे
प्रकाशन–शशी एजन्सी, बोरगाव (मेघे) जि. वर्धा

विशेष कार्यवृत्त

नागपूर

विदर्भ साहित्य संघाचे दलित साहित्य संमेलन : डिसेंबर १९९१

| सं | मे | ल | न | | वि | शे | ष |

विदर्भ साहित्य संघाने प्रथमच एका एक दिवसीय दलित साहित्य संमेलनाचे आयोजन दिनांक २९ डिसेंबर १९९१ रोजी वि. सा. संघाच्या धनवटे रंग मंदिरात केले होते. प्रत्यक्षात १९८६ ते १९८९ या कार्यकाळातील कार्यकारिणी व अध्यक्षांनी अशा प्रकारच्या संमेलनाची योजना आखलेली होती व १९८९-९२ या कार्यकाळात ती पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आलेले होते. त्यानुसार हे संमेलन या कार्यकाळात पार पडले.

मराठी साहित्य प्रांतात या घटनेचे आपले एक आगळेवेगळे वैशिष्ट्यपूर्ण स्थान असून ते व्यक्त करणाऱ्या बऱ्याच क्रिया-प्रतिक्रिया या संमेलनाच्या निमित्ताने व्यक्त झाल्या. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या घटक संस्थेने स्वतंत्र दलित साहित्य संमेलन भरविण्याचा हा पहिलाच प्रसंग असून विदर्भ साहित्य संघ ही अ. भा. म. सा. महामंडळाची असे संमेलन भरविणारी पहिलीच व एकमेव घटक संस्था होय. त्याही दृष्टीने या संमेलनाच्या आयोजनास वेगळेच महत्त्व प्राप्त झाले होते. विशेष म्हणजे आधुनिक भारतीय सांस्कृतिक क्रांतीचे जनक, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जन्मशताब्दी हे संमेलन भरवून वि सा. संघाने आगळ्या वेगळ्या प्रकारे साजरी केली. दलित साहित्य प्रांतातील डॉ. गंगाधर पानतावणे, सर्वश्री वामन निंबाळकर, ताराचंद्र खांडेकर इ. मो. नारनवरे, योगेंद्र मेश्राम, प्रभाकर दुपारे ही अध्वर्यु व मान्यवर मंडळी देखील या संमेलनात एकत्र येऊन सहभागी झाल्याने देखील या संमेलनास या दृष्टीने देखील वेगळेच महत्त्व प्राप्त झाले होते. महत्त्वाच्या ग्रंथलेखनाच्या कार्यात व्यस्त असल्याने डॉ. यशवंत मनोहर मात्र संमेलनास उपस्थित राहू शकले नाहीत व तसे त्यांनी अगोदर कळविलेही होतेच.

एवढेच नव्हे तर ज्या मराठी साहित्यप्रांतात आपली अस्मिता जपली जात नाही व यथायोग्य दखल घेतली जात नाही म्हणून स्वतंत्र दलित साहित्य संमेलनांची सुरवात ज्या नागपुरातील प्रथम दलित साहित्य संमेलनापासून झाली होती त्याच नागपूर शहरात त्याच मराठी साहित्य प्रांताने अशा प्रकारच्या दलित साहित्य संमेलनाचे केलेले आयोजन हा औत्सुक्याचा व कुतुहलाचा विषय झालेला होता. त्याही दृष्टीने हे संमेलन वैशिष्ट्यपूर्ण समजल्या गेले.

अशा या वैशिष्ट्यपूर्ण संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविले होते 'निकाय' या सम्यक क्रांतीचे अक्षरपीठ म्हणून गाजलेल्या नियतकालिकाचे संपादक, दलित चळवळीतील एक अग्रगण्य नेतृत्व व विचारवंत, नागपूर विद्यापीठाच्या पाली-प्राकृत विभागातील प्रपाठक डॉ. भाऊ लोखंडे यांनी. संमेलनास आशीर्वाद देण्यास व मार्गदर्शन करण्यास प्रमुख अतिथी म्हणून लाभले होते दलित साहित्य चळवळीचे एक ज्येष्ठ अध्वर्यु डॉ. गंगाधर पानतावणे तर संमेलनाचे उद्घाटक होते न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी.

"दलित साहित्यिकांनी बौद्ध साहित्याचे अवगाहन केल्यास त्यांना मार्क्सवादाकडे दीक्षा वा प्रेरणेसाठी जावे लागणार नाही" असे प्रतिपादन करताना आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. भाऊ लोखंडे यांनी ज्या बौद्ध साहित्याने केवळ हितोपदेश अथवा पंचतंत्रच नव्हे तर अरेबियन नाईटस्‌सारख्या विश्वसाहित्यावर आपला प्रभाव पाडला आहे त्या बौद्ध साहित्याचा पाथेय म्हणून उपयोग केला पाहिजे असे आवाहन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित

साहित्याचे प्रेरणास्रोत असल्याचे सांगून आजच्या दलित साहित्यिकांनी वेगवेगळ्या शब्दात बाबासाहेबांचेच तत्त्वज्ञान वेगवेगळ्या प्रकारे मांडले आहे असे ते म्हणाले. बाबासाहेबांचे राष्ट्रैक्य व राष्ट्रभक्ती या प्रेरणा दलित साहित्य चळवळीचा मेरूदंड असल्या पाहिजेत असेही ते म्हणाले.

आपल्या ३८ पानी छापील भाषणात त्यांनी दलित साहित्याच्या उगमापासून आजपावेतोचा सविस्तर आढावा घेऊन दलित साहित्य चळवळीत शिरलेला भंपकपणा व भोंदूगिरीचा खरपूस समाचार घेतला आहे. दलितांना दलित राखण्यास व विद्रोही करविण्यास कारणीभूत झालेल्या वृत्ती–प्रवृत्तींचा इतिहासातील, संस्कृतीतील दाखले देत त्यांनी झाडा घेतला व धर्मग्रंथ त्यामुळे आदरणीय कसे वाटावेत असा सवाल केला. दलित साहित्य चळवळीस आजचे गौरवपूर्ण स्थान प्राप्त करून देणाऱ्या दलित व दलितेतर मंडळींचा साभिमान उल्लेख देखील त्यांनी आपल्या भाषणात केला.

विदर्भ साहित्य संघाने या संमेलनाचे आयोजन करून महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीस मान्यता दिली आहे असे ते म्हणाले.

विदर्भ साहित्य संघाच्या जडणघडणीत दलित मंडळींचा सिंहाचा वाटा असल्याचे स्मरण त्यांनी आपल्या भाषणातून करून दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या विदर्भ साहित्य संघास भेट दिली त्यावेळी वि. सा. संघाचे अध्यक्ष असलेल्या श्री. ना. रा. शेंडे यांच्यापासून तो डॉ. तु. वि. गेडाम, रणजित मेश्राम, म. बा. मेश्राम, यशवंत मनोहर, ज्योती लांजेवार इ. या साऱ्यांच्याच वि. सा. संघाच्या कार्यातील विविध भूमिकातील सहकार्याचा त्यांनी गौरवपूर्वक उल्लेख आपल्या भाषणात केला. तसेच ग. त्र्यं. उर्फ भाऊसाहेब माडखोलकर व दि. ब. पंडित या वि. सा. संघाच्या पूर्वाध्यक्षांनी दलित–बहुजनांप्रती केलेल्या कार्याचेही त्यांनी गौरवपूर्वक स्मरण करून दिले.

दलित साहित्यातील विद्रोह हा प्रस्थापित नैतिक मूल्यांविरुद्धचा विद्रोह असून हा समाजाभिमुख विद्रोह द्वेषावर आधारलेला नाही असे सांगून " उदात्त व सांस्कृतिक जीवनमूल्ये आपल्या साहित्यातून आविष्कृत करा " या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संदेशाचे स्मरण करून देऊन त्यांनी आपल्या भाषणाचा समारोप केला.

त्या अगोदर या संमेलनात पत्रकबाजी करून गालबोट लावू पहाणाऱ्यांचा यथायोग्य समाचार देखील डॉ. भाऊ लोखंडे यांनी आपल्या भाषणात घेतला.

संमेलनात व त्यानंतरही त्यांचे हे विचार-प्रवर्तक भाषण सतत चर्चेचा विषय राहिले आहे.

डॉ. भाऊ लोखंडे यांची या संमेलनाच्या अध्यक्षपदी झालेल्या निवडीचे वृत्तपत्रांनी अग्रलेख लिहून स्वागत केले होते तर नागपुरातील वृत्तपत्रांनी अध्यक्षीय भाषणातील अंश संमेलनप्रसंगी भाषण झाल्यानंतर प्रकाशित करण्याची आपली नेहमीची परंपरा यावेळी मोडून डॉ. भाऊ लोखंडे यांच्या या भाषणातील महत्त्वाच्या मुद्यांची चर्चा त्यावर अग्रलेख लिहून केलेली होती.

सकाळी सुमारे १० वाजता सुरू झालेले हे एक दिवसीय संमेलन अखंडपणे रात्री १२–३० पर्यंत सुरू होते. संमेलनाचे आमंत्रक श्रीपाद भालचंद्र जोशी व संयोजिका ज्योती लांजेवार यांनी या दिवसभराच्या संमेलनाचे संयोजन व सूत्रसंचालन केले.

सकाळी सुमारे १० वाजता सुरू झालेल्या या संमेलनाच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली ती भीम स्तवनाने.

उद्घाटक न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या फोटोस पुष्पहार अर्पण करून व मेणबत्ती पेटवून या संमेलनाचे उद्घाटन केले. संमेलनाचे अध्यक्षीय प्रास्ताविक वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी केले. संमेलनाचे उद्घाटन करताना न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी म्हणाले की प्रस्थापितांनी समाजात फूट पाडून दलितांना इतर समाजापासून विभाजित करून ठेवले. स्वातंत्र्योत्तर काळातही दलितांना स्वातंत्र्याचा व्हावा तसा उपयोग झालेला नाही. या देशात जातीधर्माचे परकोट आहेत म्हणून असेल त्या साधनांसह समाजपरिवर्तनासाठी आपण पुढे

सरसावले पाहिजे. दलित साहित्यात व्यक्त होणारी वेदना प्रातिनिधिक स्वरुपाची असल्याने ते साहित्य प्रस्थापित साहित्यापेक्षा मौल्यवान ठरते. प्रस्थापितांनी केलेल्या वावात तुम्ही सामील होऊ नका. दलितांचा नेता चारित्र्यवान नसेल तर प्रस्थापितांच्या कटात तो सामील होत असतो यापासून आपला बचाव केला पाहिजे असेही ते म्हणाले.

प्रमुख अतिथी म्हणून बोलताना डॉ. गंगाधर पानतावणे म्हणाले की दलित साहित्याने मराठी व महाराष्ट्राच्या, सीमा केव्हाच ओलांडल्या आहेत. मतभेद हे जिवंतपणाचेच लक्षण असले तरी व्यक्तिद्वेष मात्र खपवून घेतला जाऊ नये. दलित साहित्य न वाचताच समीक्षा करणाऱ्यांवर त्यांनी कोरडे ओढून दलितांमध्ये समीक्षक निर्माण होण्याची गरज आहे असे ते म्हणाले.

उद्घाटनाच्या सत्रानंतर लगेच सौ. प्रेमा घुले यांनी 'मी एक सावित्री' हा एकपात्री प्रयोग सादर केला. त्वरितच 'स्त्री : दलित साहित्यातील / वास्तवातील' या विषयावरील डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे यांच्या अध्यक्षतेखालील परिसंवाद सुरू झाला. सूत्रसंचालक श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी या विषयाचे प्रयोजन व विषयसूत्र विषद केल्यावर प्रा. सुशीला मूल जाधव, प्रा. नलिनी सोमकुवर, डॉ. योगेंद्र मेश्राम, प्रा. मधुमती वानखेडे यांनी या विषयाच्या अनुषंगाने आपआपले विचार व्यक्त केले.

परिसंवादानंतर लगेच श्री. संजय जीवने यांनी स्वतःच लिहून दिग्दर्शित केलेल्या 'जयभीम' या पथनाट्याचा प्रयोग रंगमंदिरातच दलित रंग भूमीतर्फे सादर करण्यात आला.

हा प्रयोग सादर करण्याचे रीतसर निमंत्रण स्वीकारून दलित रंगभूमीने हा प्रयोग सादर केला होता. मात्र हे निमंत्रण स्वीकारून कोणतीच पूर्वसूचना वा कारणांची सूचना नसतांना अचानक प्रयोग सादर करण्यापूर्वी हे संमेलन आयोजित करणाऱ्या संस्थेचा निषेध करून हा प्रयोग सादर करण्याचे कोणतेच कारण व प्रयोजन वा औचित्य कोणालाच कळू शकले नाही.

दुपारी श्री. ताराचंद्र खांडेकर यांच्या अध्यक्षतेखालील लेखक-वाचक भेट व प्रश्नोत्तरीच्या कार्यक्रमात व्यासपीठावर उपस्थित संमेलनाध्यक्ष डॉ. भाऊ लोखंडे, डॉ. योगेंद्र मेश्राम, श्री. वामन निंबाळकर; श्रीमती सुगंधा शेंडे, ज्योती लांजेवार, प्रभाकर दुपारे, हेमंत खोब्रागडे या लेखकांवर प्रश्नांचा भडिमार करून धनवटे रंग मंदिर भरून असलेल्या श्रोते-वाचक यांनी आगळाच रंग भरला.

धनवटे रंग मंदिरात मधोमध वाचकांनी-श्रोत्यांनी प्रश्न विचारण्याकरता ठेवलेल्या माईकवर प्रश्न विचारणाऱ्यांनी घोळका करून रांग लावत प्रश्न विचारून या कार्यक्रमातील आपल्या समरसून घेतलेल्या सहभागाची पावती दिली.

उत्स्फूर्तपणे वाचक-श्रोते प्रश्न विचारीत होते. व लेखक उत्तर देत होते. कार्यक्रम त्यामुळे लांबतही गेला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समवेत सरस्वतीचा फोटो धनवटे रंग मंदिरात असण्याच्या मुद्यावरच या कार्यक्रमात बरीचशी प्रश्नोत्तरे झाली व या वादाला संमेलनाध्यक्षांनी स्वतःच समर्पक उत्तरे देखील दिली.

बरीच प्रश्नोत्तरे ही दलित लेखकांच्या आपसातील संबंधावरील व वेगवेगळ्या दलित साहित्य संमेलनांच्या आयोजकांबाबत देखील होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. उल्हास मनोहर यांनी केले होते. श्री. ताराचंद्र खांडेकर यांनी अध्यक्षीय भाष्य करून बराच लांबलेला हा कार्यक्रम आटोपता घेतला.

प्रश्न विचारणाऱ्यांची संख्या मात्र एवढी मोठी होती की बरेच काही विचारायचेच राहून गेले असेच वाटत होते.

या कार्यक्रमानंतरचे नियोजित दुसरे पथनाट्य सादर करण्याचे निमंत्रण स्वीकारलेले असूनही 'जयभीम' सादर करून गेलेली दलित रंगभूमीची मंडळी दुसरे नियोजित पथनाट्य 'गर्जना' सादर करण्याकरता फिरकलीच नाहीत. त्यामुळे त्वरितच कार्यक्रमात फेरबदल करावा लागून दलित चळवळीतील योगदानाबद्दल महत्त्वपूर्ण योगदान असलेल्या श्री. बाबा दळवी व श्रीमती सुधाताई

रामटेके यांच्या सत्काराचा कार्यक्रम अगोदर करण्यात आल्या.

सौ. सुधाताई रामटेके यांचा सत्कार मानचिन्ह देऊन वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी केला. त्यांच्या कार्याचा गौरव करणारे भाष्य संमेलनाध्यक्ष डॉ. भाऊ लोखंडे यांनी केले. बाबा दळवींनी सत्काराचे निमंत्रण स्वीकारलेले होते परंतु त्यांच्या पूर्वनियोजित कार्यक्रमातील फेरबदलामुळे या कार्यक्रमास ते उपस्थित राहू शकले नव्हते.

'डॉ. आंबेडकरी चळवळ : कार्य आणि अनुभव' या विषयावरील चर्चासत्राची सुरुवात या कार्यक्रमाचे सूत्रसंचालक श्री. पूरण मेश्राम यांनी केली. अध्यक्ष होते. अ‍ॅड. मोतीरामजी पावडे. डॉ. आंबेडकरी चळवळीतील कार्यास वाहून घेतलेल्या अनेक नामवंतांचा या कार्यक्रमात सहभाग होता. श्री. नितीन राऊत, श्री. अशोक थूल, श्री. वा. को. गाणार, श्रीमती शुद्धमती बोंधाटे यांनी चळवळीतील आपले अनुभवकार्य विशद करतानाच पुढील आंबेडकरी चळवळीची दिशा या बाबतचे मतप्रदर्शन केले.

श्री. वा. को. गाणार यांच्या दीर्घकालीन कार्यप्रवासामुळे त्यांच्या जवळ सांगण्यासारखे भरपूर असल्याने कार्यक्रम बराच लांबला.

दिवसभर अविश्रांत सुरू असलेल्या या संमेलनाची सांगता श्री. इ. मो. नारनवरे यांनी श्री. वामन निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली सूत्र संचालन केलेल्या बहारदार कवीसंमेलनाने झाली. यात उल्हास मनोहर, सुहास भगत, दीपक रंगारी, पुरुषोत्तम शेळभाके, रोहन नागदिवे, प्रसेनजीत ताकसांडे, गोविंद वाघमारे, भगवान ठग, अशोक थोरात, विठ्ठल लांजेवार, लिला भेले, सुरेखा भगत, मंगेश बन्सोड, उषा भालेराव, प्रा. विमल गाडेकर, प्रा. सतेश्वर मोरे, हृदय चक्रधर, सुनील रामटेके, डॉ. ज्योती लांजेवार, उषाकिरण आत्राम, सुगंधा शेंडे, प्रा. विनायक तुमराम, ज्ञानेश्वर नागदेवते, डॉ. आशा थोरात या कवींनी भाग घेऊन कविता वाचन केले.

सकाळी सुमारे पावणे दहाला सुरू झालेले हे संमेलन रात्री साडेबारा वाजेपर्यंत अखंड सुरू होते. संमेलनाध्यक्ष डॉ. भाऊ लोखंडे होते. संमेलन संपेपर्यंत प्रत्येक कार्यक्रमास उपस्थित धनवटे रंग मंदिर श्रोत्यांनी दिवसभर गजबजले होते. परिसरात अनेक ग्रंथ विक्रेत्यांनी पुस्तकांची दुकाने थाटली होती. दिवसभर लहान-मोठ्या ग्रंथांची विक्री देखील सुरू होती. दलित साहित्याच्या अभ्यासाची साधने म्हणून स्वतंत्र विभागच चालविणाऱ्या विदर्भ साहित्य संघाच्या श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाचे श्री. चंद्रकांत कुळकर्णी व सौ. कुंदा केळापुरे यांनी परिश्रमपूर्वक दलित साहित्यावरील ग्रंथ व अध्ययन साधनांचे एक स्वतंत्र प्रदर्शनच या संमेलनानिमित्त लावलेले होते. या संमेलनात श्री. धर्मराज निमसरकार यांच्या पुस्तकाचा प्रकाशन सोहळादेखील पार पडला.

डॉ. भाऊ लोखंडे यांच्या छापील भाषणाच्या प्रतींना फार मोठ्या प्रमाणावर मागणी होती. भाषणांच्या छापील प्रती कमी व पडल्याने अनेकांना त्या पुरविता न आल्याने निराशा झालेल्यांची संख्या फार मोठी होती.

सर्वच निमंत्रितांनी दिलेला सहभाग, सौहार्द व सामंजस्याचे वेगळेच वातावरण, अध्यक्षांची दिवसभराची उपस्थिती अनेक कार्यक्रमातला वैयक्तिक सहभाग व आवश्यक तेथे त्यांच्याकडूनच दिली गेलेली समर्पक उत्तरे या साऱ्यामुळे वि. सा. संघाच्या इतिहासातील हा आगळाच प्रसंग अनुभवता आला.

प्रत्येक संमेलनाचे वेळी अध्यक्षीय भाषण स्थानिक वृत्तपत्रांमधून प्रकाशित करण्याची वृत्तपत्रांची परंपरा या संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणाच्या वेळी पाळल्या न गेल्यामुळे डॉ. भाऊ लोखंडे यांचे महत्त्वपूर्ण विचार असलेले भाषण (संपूर्ण अथवा आंशिक देखील) ज्या प्रमाणावर लोकांपर्यंत पोहचायला हवे तसे झाले नाही. (खुद्द संमेलनाध्यक्षांनी देखील या बाबतची आपली तीव्र नाराजीची प्रतिक्रिया सर्व वृत्तपत्रात व संबंधितांजवळ नोंदविली आहे.)


डॉ. भाऊ लोखंडे यांचे हे प्रदीर्घ भाषण युगवाणीतून त्यामुळे यथावकाश प्रसिद्ध करीत

राहण्याचे युगवाणीच्या संपादकांनी ठरविले असून पुढील अंकापासून ते युगवाणीतून क्रमशः प्रकाशित होणार आहे. सौ. ज्योती लांजेवार यांचे संयोजन लाभलेल्या या संमेलनाकरता नेमण्यात आलेल्या समितीत दलित साहित्य व चळवळीतील ज्या कार्यकर्त्यांचा समावेश होता. त्या साऱ्यांनीच तसेच वि. सा. संघाचे सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर, कार्याध्यक्ष श्री. वामन तेलंग कार्यकारिणीतील इतर सहकारी श्री. योगेश बऱ्हाणपुरे, चिटणीस श्री. प्रकाश एदलाबादकर, यांनी घेतलेल्या परिश्रमातून हे संमेलन यथोचित यश संपादून गेले. विदर्भ साहित्य संघाच्या कार्यालयातील सर्वच कर्मचारी सहकारी देखील या संमेलनाच्या यशस्वी आयोजनात सहभागी होते.

■

दुरुस्ती

'युगवाणी'च्या स–ऑ–नो १९९१ च्या अंकातील पान तीस, उजवा स्तंभ, वरून दुसरी ओळ 'देवाची शाल' असे पडले आहे. त्या ऐवजी 'दंवाची शाल' असे हवे.



विदर्भ साहित्य संघाच्या दलित साहित्य संमेलनाच्या निमित्ताने

विदर्भ साहित्य संघ आयोजित दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. भाऊ लोखंडे यांना या संमेलनाचे अध्यक्षपद लाभल्याच्या निमित्ताने तसेच त्यांच्या छापील भाषणावरील प्राप्त झालेला पत्रव्यवहार त्यांनी प्रकाशनार्थ युगवाणीला उपलब्ध करून दिला. डॉ. भाऊ लोखंडे व संबंधित पत्रलेखक यांच्या सौजन्याने त्यातील संबंधित भाग त्यांचे आभार व्यक्त करून प्रकाशित करीत आहोत.

आदरणीय डॉ. भाऊ लोखंडे,

विदर्भ साहित्य संघाने आपणास जो बहुमान दिला त्याचा निश्चितच मला व्यक्तिश: फार अभिमान वाटला व अध्यक्षीय भाषणाच्या वाचनानंतर तर तो अधिकच दुणावला. कारण ज्या व्यासपीठावरून तुम्ही उपरोक्त भाषण वाचून दाखविलंत त्या व्यासपीठावर एककल्ली साम्राज्य असणाऱ्यांना, तुमच्या प्रहारी आणि घणाघाती विचारप्रणव वर्षावाची मुळीच कल्पना नसणार व तशी त्यांची अपेक्षाही नसणार. पांढरपेशा तकलादू शब्दांची झालर, कुणालाही न दुखविता त्या व्यासपीठावरून उभारावी असाच त्यांचा यामागे हेतू असतो. पण सिंह हा सिंहच असतो हे तुम्ही सिद्ध करून दाखविलंत.

आपण तेथील व्यासपीठ उभारणाऱ्या जाणकार, विद्वान मंडळींच्या सरळ, चाकोरीबद्ध ठेवणीतील विचारांना आव्हान देत हात घातला आहे. त्यांच्या या बाबतीत प्रतिक्रिया अजूनही समजू शकल्या नाहीत.

तुम्ही या निमित्ताने, प्रसंगाचे औचित्य साधून आक्रमकपणे आपल्या व्यासंगी आणि चिंतनशील व्यक्तिमत्वाचे दर्शन घडवीत आवाज उठविला ही काळाची गरज होती व हे कार्य बदनामी सहन करण्याची हिम्मत ठेवून तुम्हीच करू शकता.

पण इथे थांबूनच भागण्यासारखे नाही. या व्यासपीठावरून आज जो आवाज बुलंद झाला, त्या आवाजाच्या रोखाने इतर समान विचारांच्या साहित्यिकांनी एकाच व्यासपीठावरून, त्याच्या परिपूर्णतेसाठी लढा देणे आवश्यक आहे. तीच तुमच्या प्रयत्नपूर्वक, विचारपूर्वक, जाणीवपूर्वक केलेल्या श्रमाची फलश्रुती ठरेल.

आजपर्यंतच्या इतर अध्यक्षीय भाषणाला स्थानिक "दैनिक पेपरवाल्यांनी" दिलेली प्रसिद्धी आणि तुमच्या अध्यक्षीय भाषणाला दिलेली प्रसिद्धी, यावरून लक्षात येते की, आजही सनातनी आणि पुराणमतवाद्यांच्या दांभिक अस्मितेला कुणीही हात घातलेला त्यांना आवडत नाही. कदाचित असेही असू शकेल की, आपले लांबलचक अध्यक्षीय भाषण स्थळाभावी त्यांना पूर्णत्वाने प्रकाशित करणे जमले नसेल तरीपण त्यांच्या हेतूबद्दल शंका घ्यायला पुष्कळ उदाहरणे देता येतील. पण हा विषय इथे चर्चिण्यासारखा नसल्याकारणाने एवढेच म्हणावेसे वाटते की, नियोजित अध्यक्षाने

आपल्या अध्यक्षीय भाषणातून दिलेला विचार, उपस्थित केलेले मुद्दे हे विद्वान तसेच जनसामान्यांपर्यंत पोहचविणे महत्त्वाचे व अगत्याचे असते. जेणेकरून त्याद्वारा विचार विनिमय होऊन भविष्यांत नवी दिशा निश्चित करण्यात मदत होऊ शकते. नव्हे, एका क्रांतिप्रवण वैचारिक आंदोलनाची दिशा ठरू शकते.

शेवटी, आपण आपल्या खोल चिंतनातून प्रकट केलेले विचार, त्यावर निरनिराळ्या व्यासपीठावरून (उदा. सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक) चर्चा व्हावी व आजच्या धर्मनिरपेक्ष भारतीय समाजात समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाचा प्रचार आणि प्रसार होऊन दलित-साहित्य अधिक समृद्ध व्हावं. हीच अंत:करणपूर्वक शुभकामना,

वासु चवरे
३७५, इंदोरा चौकी, मॉडेल टाऊन,
कामठी रोड, नागपूर-४४००१४

दि. १०-२-९२
नागपूर

भाऊस, जयभीम

विदर्भ साहित्य संघातर्फे आयोजित एक दिवसीय दलित साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी आपली निवड झाल्याबद्दल मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन.

दलित चळवळीत आणि साहित्य आणि सामाजिक चळवळीत महाराष्ट्रातील काही निवडक अग्रणींमध्ये आपला क्रमांक लागतो. मी तर सुरुवातीपासूनच आपला चाहता आहे. अटलबिहारीचं नाव घ्यावं की नाही परंतु विदर्भातील अटलबिहारी असंही वक्तृत्वाच्या संदर्भात आपणास संबोधता यावे. आपणास मिळालेलं अध्यक्षपद हा साहित्यिक आणि सामाजिक चळवळीचा सन्मान आहे.

भाऊ, समाज आणि साहित्य याचा मेळ जुळला पाहिजे. समाजकारण आणि राजकारण हे तर खूप दूर जात आहेत. परस्परांपासून किंबहुना जेव्हा जेव्हा राजकारणात समाजकारण डोकावू पहाते तेव्हा तेव्हा प्रचंड राजकीय उलाढाली होत असतात. ताण तणाव निर्माण होतात. संघर्ष निर्माण होतो आणि अराजकता व दहशतवाद जन्मास येते अगदी पूर्वीच राष्ट्रीय महासभेपासून हे अनुभवास येत आहे. इतके सामाजिक चळवळीचे इतर चळवळीशी वावडे आहे. आपल्या रूपाने समाज आणि साहित्य जवळ येण्याचे प्रयत्न व्हावे, ही अपेक्षा.

तसेच दलित-दलितेतरांमधले अंतर (साहित्यिक क्षेत्रांतले) कमी व्हावेत. नाहीतर दलित साहित्याचं वाचन दलितच करतात (तेही ज्यांना साहित्याची आवड आहे असे) आणि दलितेतर काही ठराविक मंडळी. बस्स एवढेच. दलितेतर साहित्याचंही असंच आहे. आता असं वाङ्मयीन अभिसरण होण्यास आणि पर्यायाने वैचारिक व सामाजिक अभिसरण होण्यास आपलं अध्यक्षपद कामी यावं. शिवाय दलित साहित्यिकांमध्येही दरी निर्माण होता कामा नये. जिव्हारी लागेल असं कुणीही कुणाला बोलू नये.

उद्या जर राजकीय दृष्टया दलित चळवळीत (आंबेडकरी चळवळीत) जी अभेद्य दुफळी निर्माण झाली, तसेच आपल्या साहित्य चळवळीतही निर्माण झाली (कारण तो होत आहे असे दृष्टोपत्तीस येऊ लागले) तर उद्याचा काळ आपल्या सर्वांसाठी भयानक आकार घेईल.

आपल्यासारखी जी मंडळी सार्वजनिक विचारपीठावरून बोलता त्याकडे दलित समाजातील युवकांचं लक्ष असतं. नसेल काही ठिकाणी तर तसं ते वेधणं आवश्यक आहे. मा. श्री. सुरेश द्वादशीवार अध्यक्ष झाले (वि. सा. संघाचे तेव्हा मी त्यांना अभिनंदनपर पत्र घातलं होतं. त्यात म्हटलं होत की, विदर्भ साहित्य संघाने निदान आता तरी दलित साहित्याची आणि साहित्यिकांची दखल घेतली पाहिजे. वि. सा. संघानेच नव्हे एकूण अ-दलित साहित्याने आणि त्यातील धुरंधरांनी

जर दलित साहित्याला अस्पृश्य स्थळी ठेवलं तर हे साहित्य आपलं सामर्थ्य जगाला दाखवील आणि समांतर समाजजीवनव्यवस्था निर्माण झाली तर उद्या सावरता सावरणे कठीण होईल. असो. (भाऊसाहेब गेल्या १५ वर्षापासून मी सामाजिक दलित–आदिवासी चळवळीत राबत आहे. त्यानुरूपच मी हे पत्र अंत:करकाणासून लिहिले आहे) आपण सूज्ञ आहात.

संयत, ऋजता आपल्यात आहे. सर्व विचारप्रवाह (पोटविचार प्रवाहसुद्धा) एकदिश होवो एवढीच सदिच्छा. पुनश्च आपले अभिनंदन.

हरिश्चंद्र भेले

दि. २–१२–९१ प्रोफेसर्स कॉलनी, पांढरकवडा, जि. यवतमाळ.

आमच्या विचारस्तंभांना विनम्र अभिवादन करून आद. डॉ. भाऊ लोखंडे / स. न.

विदर्भ साहित्य संघाने आयोजित केलेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदी आपली निवड झाली. हार्दिक अभिनंदन ! वि. सा. संघाच्या व्यासपीठावरून फुले, आंबेडकर विचार पेरण्याची एक चांगली संधी.

सर्जेराव चव्हाण

क्रांतीनगर, वॉर्ड नं. ६, कमलभवन, बुलढाणा

डॉ. भाऊसाहेब.

आकार / अभिव्यक्ती / विचार या तिन्ही दृष्टीने मला भाषण महत्त्वाचे वाटते / समृद्ध, व्यासंगी. व्यक्तिमत्त्वाचे त्यातून संयत दर्शन घडते. एक मात्र विसरू नका. Cruelty goes straight while the myth of compassion requires a few obligque curves.

हे इंग्रजी वाक्य अवतरणात लिहिले नाही कारण ते माझेच आहे. अश्वत्थामा या कवितेच्या डोक्यावरचे. भेटू या. तोपर्यंत आणि एरवीही शुभेच्छा.

ग्रेस

दि. ३० डिसेंबर '९१ १ / बी शासकीय नॉर्मल स्कूल क्वार्टर्स, सीताबर्डी, नागपूर–१२

आदरणीय डॉ. भाऊ लोखंडे सविनय / जयभीम. वि. वि.

आज सकाळी नागपूर आकाशवाणीवर काल झालेल्या विदर्भ साहित्य संघाने आयोजित केलेल्या एक दिवसीय दलित साहित्य संमेलन उद्‌घाटनाचा सोहळ्यात झालेल्या अध्यक्षीय भाषणाच्या प्रभावाने मी भारावून गेलो आहे. वि. सा. संघाच्या कार्यकारिणीचा सदस्य म्हणून मी प्रत्यक्ष हजर राहू शकत नसलो तरी मी चि. सुधाकर याला पाठविण्यास मनात योजिले होते. परंतु काही अपरिहार्य अडचणीमुळे त्याला पाठवता आले नाही. कारण आपल्यासारख्या मान्यवर मित्रांच्या सहवासाने एक "वेदना व्यथेची" हा कविता संग्रह आज वेगळ्या पोस्टाने तुम्हाला अभिप्रायार्थ पाठवत आहे. प्रत्यक्ष चि. सुधाकर हा कविता संग्रह देणार होता. ते शक्य झाले नाही म्हणून या पत्राचा प्रपंच केला आहे.

१०–१२–९१ म. बा. मेश्राम

संपादक 'सिंहगर्जना' / यवतमाळ

माननीय डॉ भाऊ लोखंडे / सादर जयभीम

काल आपल्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या वि. सा. संघ आयोजित प्रथम दलित साहित्य सम्मेलनाची माहिती लोकसत्ता– ३१ डिसे. '९२ द्वारे कळली.

"द. सा. एकसूरी झाले आहे या चालबाजीने दलित लेखकांनी खचून जाऊ नये" हा उपदेश मोलाचा वाटला. आभार.

वि. सा. संघाचे "पंढरपूर" या विधानातून आपणास कोणता आशय अभिप्रेत आहे. (१) वि. सा. संघाने किती उमेदीच्या लेखकांचे प्रथम पुस्तक प्रकाशित केले? (२) वि. सा. संघ कार्यकारिणीत बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व किती? (३) विश्वस्तात बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व किती? (४) अध्ययन कक्ष, वाचनालयाची सोय आजपर्यंत वि. सा. संघाकडून का उपलब्ध झाली नाही? (५) वि. सा. संघाच्या नवीन संकुलातील गाळे किती बहुजनांना उपलब्ध होतील. असे आदि अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित व्हायला हवे होते. हे संमेलन बुद्धिबळाचा डाव आपणास वाटतो की नाही. कळवावे

शेखर

दि. ३१-१२-९१ ५९१/७ आर/डी. विश्वासनगर, नकुलगली, दिल्ली–११००३२

प्रिय भाऊ

विदर्भ साहित्य संघाच्या वतीने भरलेल्या दलित साहित्य संमेलनाच्या अधिवेशनात केलेले तुमचे अध्यक्षीय भाषण वाचले. वाचताना तुमच्या खोल व्यासंगाची साक्ष पटत होती. पण असे असूनही आपला विद्याभ्यास जड झालेला नाही हेही जाणवत होते. तुमच्या भाषणात तुम्ही राखलेला समतोल मला खूप आवडला. त्यामुळे "भाषा ही जिवंत नारळातल्या पाण्यासारखी मधुर अशी असली पाहिजे...माणसाची झोप उडून जाऊन विचारशक्ती जागृत झाली पाहिजे. ग्रंथाची लेखनशैली ही प्रासादिक, सुगम, उत्तेजक व वाचकाची तंद्री लागेल अशा दर्जाची असली पाहिजे." ह्या पू. बाबासाहेबांच्या आदेशाचे एक सुंदर दर्शन तुमच्या भाषणाने झाले.

तुमचा–भाई

दि. ८–२-९२ (पु. ल. देशपांडे), पुणे—४

प्रति / श्री. मनोहरराव म्हैसाळकर
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर

प्रिय सन्माननीय महोदय, सप्रेम जयभीम !

आपण यंदाच्या वर्धापन दिनानिमित्त साहित्यिक, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती समजून संस्थेचे सदस्यत्व बहाल करण्याचा निर्णय घेतला याबद्दल मी आपला आभारी आहे. आपल्या संस्थेने आयोजिलेल्या द. साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद स्वीकारून मला वाटते कोंडी फोडण्याचा मी प्रयत्न केला. त्याची प्रतिक्रिया फार मोठ्या प्रमाणावर उमटली. सुसंस्कृत व असंस्कृत दोन्ही पद्धतीने लोकांनी आपली मळमळ व्यक्त केली. काहींनी खुद्द कार्यक्रमातच आपला रांगडेपणा व्यक्त केला तर काहींनी तेथे प्रकटपणे उदारपणाचे वर्तन केले. निषेधाचाही दिलदारपणे स्वीकार केला. आपण सर्वांनी हे प्रत्यक्षच अनुभवले. मी सुद्धा ह्याची साक्ष देऊ शकतो.

परंतु माझ्या मनात एक शल्य घर करून बसले आहे. आजवर साहित्य संमेलनाचे अध्यक्षीय भाषण वर्तमानपत्रातून न चुकता चवथ्या पानावर प्रसिद्ध करण्याचा दस्तूर कधी मोडला गेला नाही. यावेळी मात्र माझे अध्यक्षीय भाषण नेहमीच्या स्वरूपात छापले गेले नाही. भाषणाचे काही अंश कार्यक्रमाच्या वृत्तांतात टाकून दुधाची तहान ताकावर भागवण्यात आली. परंतु ह्या नियमाला फक्त मी एकटा अपवाद ठरलो. नंतर श्री. सुर्वे व श्री. शेळके ह्यांची भाषणे बदस्तूर चवथ्या पानावर उमटलीत. सामाजिक अभिसरणाच्या कार्यात ही घटना मला फार बोलकी वाटते. विचारस्वातंत्र्य व व्यक्तिस्वातंत्र्यांचा सदोदित पुरस्कार करणाऱ्या मंडळींकडून अशी अपेक्षा करता येत नाही. भाषणाची समीक्षा करून त्याची चीरफाड करणे मी समजू शकतो पण त्याचा रीतसर उल्लेखच टाळणे हे मला फार गंभीर प्रकरण वाटते. सामाजिक अभिसरणात ह्याचा दुष्परिणाम नक्कीच जाणवेल असे मला वाटते. आपण यासाठी जबाबदार आहात असे मी म्हणत नाही. पण आपण यजमान असल्यामुळे आपणास लिहून कळवीत आहे.

अत्यंत जबाबदार व स्वत:ला गांधीवादी व कॉंग्रेसवाला म्हणवून घेणाऱ्या वयोवृद्ध व तपोवृद्ध संपादकाने सुद्धा ' मला भाषणच मिळाले नाही ' असे धादांत खोटे विधान करावे ह्याचे मला आश्चर्य वाटले. आणि त्यांनी पुन्हा भाषणाची प्रत मागून घेऊनही प्रसिद्ध करण्याचे अभिवचन देऊन पुन्हा बगल देणे मला अगदीच लांच्छनास्पद वाटले. ही अशी मनोवृत्ती जर संपादक व तत्सम पत्रकारितेची असेल तर मग आपण उगीचच विचारस्वातंत्र्याचा डांगोरा पिटतो असे म्हणावे लागेल. की आपल्या पत्रकारितेची ही अट आहे की आम्हाला "ज्याला वापरता येत नाही त्याला अनुल्लेखाने टाळले पाहिजे." आपण या क्षेत्रातील शिलेदार आहात म्हणून आपल्या विचारार्थ हे लिहिले आहे.

या सर्व विस्ताराकरिता आपण कुठल्याही प्रकारे जबाबदार आहात हा माझा आरोप नाही. इतर सर्व वार्ता वर्तमानपत्रांनी चांगल्या प्रकारे प्रसिद्ध केल्यात याबद्दल माझ्या मनात कृतज्ञता आहे. त्यांनी भाषणाला जागा देऊन नंतर त्याच्या धज्ज्या उडविल्या असत्या तरी मी काहीही म्हणालो नसतो. पण अशाप्रकारे कट केल्यागत अनुल्लेखाची कृती क्लेशदायक वाटते. उदारपणा व खुले-पणाच्या नरडीला नख लावणारी वाटते.

ह्या दोन्ही बाजूचा सनातन कद्रूपणा कुठेतरी कमी व्हावा म्हणून मला वाटते आपला संवाद वृद्धिगत होणे अत्यावश्यक आहे. कालांतराने ह्याची फळे पहायला मिळतील ह्या एका आशावादाने प्रेरित होऊन मी आपल्या प्रस्तावास संमती देतो आणि आमच्या समाजात दृढमूल झालेला संकुचितपणा या निमित्ताने कां होईना नष्ट होईल अशी अपेक्षा करतो,

उपरोक्त प्रस्तावाबद्दल आपले आभार मानतो.

संदर्भ : आपले पत्र क्र. ९९
दि. १५-१-९२

आपला
भाऊ लोखंडे

विदर्भ साहित्य संघाचे सन्माननीय सदस्यत्व डॉ. भाऊ लोखंडे यांनी स्वीकारण्याची विनंती करणाऱ्या पत्रास त्यांचे हे उत्तर त्यांच्या सौजन्याने प्रकाशित करीत आहोत.

अनुक्रमणिका

वा च की य

प्रिय श्रीपाद जोशी /सप्रेम नमस्कार

तुमचे "युगवाणी" च्या नोव्हेंबर १९९१ च्या अंकातील संपादकीय टिपण वाचले. त्यात कवितेची भावोत्कटता व ललित निबंधाची चिंतनशीलता आहे. नव्या विश्वसंस्कृतीच्या संभवाचे डोहाळे समग्र मानवजातीला लागले आहेत, तिचे सर्व संचित तळापासून ढवळून निघत आहे व त्यामुळे एका विशिष्ट वादाच्या आहारी जाणारे साहित्य भयभीत झाले आहे, इत्यादी तुमचे सारेच चिंतन मननीय आहे.

या विषयावर एखादे चर्चासत्र आयोजित होणे अगत्याचे आहे म्हणजे मग तुमच्या टिपणातील "रजनीश", "संचारमाध्यमे", "संमेलने" इत्यादी संदर्भातील त्रोटक उल्लेख तर तपासून पाहता येतीलच शिवाय विचारवंतांमध्ये या सांस्कृतिक उन्नयनाविषयी यथोचित जागरूकताही उद्भूत करता येईल.

माझ्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाचा प्रश्न : या वैश्विक घडामोडीत "मराठी"सारख्या प्रादेशिक संस्कृतीचे व भाषेचे स्थान आणि प्रयोजन काय राहील ? प्रत्यक्ष भेटीत सविस्तर बोलू या.

व. भि. कळकर्णी

विद्यापीठ प्रोफेसर/स्नातकोत्तर मराठी विभाग

दि. ३० जानेवारी १९९२ – अमरावती महामार्ग, नागपूर विद्यापीठ परिसर / नागपूर–४४००१०

संपादक युगवाणी / स. न.

नुकताच सप्टें.–नोव्हें. ९१ चा अंक मिळाला. अंक खूपच चांगला आहे. "युगवाणी" नियमित निघणार आहे हे बघून आनंद झाला.

दि ४–२–९२ **पंकज कुरूलकर**

श्री. संपादक महाशय / स. न. वि. वि.

युगवाणीचा स-ऑ-नो ' ९१ चा अंक वाचला. फार आवडला. विशेषत: सौ. गीता घगमवार यांच्यावरचा लेख. पान ७ वर लेखिका लिहिते की, त्यांची स्त्रीमुक्ती ही पुरुषद्वेषावर आधारलेली नव्हती.

आज पुण्या-मुंबईच्या स्त्रीमुक्ती आधारित चळवळी व त्यामुळे प्रभावित तरुणींच्या दृष्टीने स्त्रीमुक्तीचा अर्थ फक्त खालील उरला आहे. (१) शक्य तेवढे पुरुषी दिसणे. जीन्स घालणे, सुंदर लांब केस कापून पुरुषांपेक्षाही बारीक करणे मग ते स्थूल शरीराला कितीही वाईट दिसो. (२) मंगळसूत्र न घालणे, कुंकू न लावणे, कानात, गळ्यात, हातावर दागिने न घालणे. (३) पतीस अरेतुरे म्हणणे, मुलांना मम्मी–डॅडी म्हणावयास लावणे. (४) सासरची संबोधने (मामंजी, सासुबाई, वन्स, भावजी) कटाक्षाने टाळणे. (५) आडनावाची भेंडोळी लावणे.

असे करून काहीही होत नाही. पुरुष पुरुषांसारखेच राहिले. ते वेण्या घालीत नाही किंवा पंजाबी ड्रेस नेसत नाही.

थोडक्यात पांढरपेशी स्त्री एका मृगजळामागे धावत आहे. त्यापेक्षा बहुजनसमाजातील स्त्रिया हजारपटीने बऱ्याच प्रामाणिक आहेत. माझे विचार अनेकांना पटणार नाहीत. कळावे.

सौ. स्मिता देसाई

दि. ३१-१-९२ स्वरूप अपार्टमेंटस् / रेगे मार्ग / एरंडवणे /पुणे-४

श्रीपादराव जोशी / स. न. वि. वि.

ताजा युगवाणीचा अंक आवडला. कवि नातू व गीता सानेंवरचे लेख फार वाचनीय होते.

गीताबाई विषयी ताराबाई लिहितात, "लग्नानंतर त्यांनी नाव बदलले नाही. मंगळसूत्र घातले नाही. अशा प्रकारे स्त्रीचे स्वतंत्र व्यक्तिमत्व जोपासले." हे वाचून हसावे का रडावे हेच कळेना ! हल्ली स्त्रियांना असल्या क्षुल्लक गोष्टींचे एवढे काय अप्रूप वाटते ? समजा गीता साने ऐवजी सौ. सुशीला धगमवार त्या झाल्या असत्या व मंगळसूत्र घातले असते तर त्यांच्या विलक्षण मोठ्या कामगिरीवर व मोठेपणावर कोणता विपरीत परिणाम झाला असता ? अनुताई लिमये, मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर, विद्या बाळ, शांता किर्लोस्कर अशी अनेक उदाहरणे देता येतील, व्यक्तीचे कर्तृत्व लक्षात घ्यायचे असते. बाह्य-क्षुल्लक गोष्टींकडे दुर्लक्षच करायचा पाहिजे.

आज सुशिक्षित पांढरपेशी स्त्री अशाच स्वत: तयार केलेल्या कोषात पूर्ण गुरफटली आहे. लग्न पाहिजे, मुलं पाहिजे, संसार-घर-सुरक्षितता-पति-पैसा-प्रसिद्धी सर्व पाहिजे, काय नको तर पतीचे नाव व आडनाव, मंगळसूत्र, साडी आणि वेणी. पुल म्हणालेच होते. "आज लोकांनी सोवळे सोडले आहे पण ओवळे सापडत नाही." अशी स्थिती आहे.

आज जर स्त्रीला लेखिका, कवयित्री, नटी, नर्तिका, गायिका, प्राध्यापिका वगैरे म्हणून जरा-देखील प्रसिद्धी मिळाली असेल तर लग्नानंतर ती काय करते ? एकतर माहेरचे नाव व आडनाव लावते नाहीतर दोनदोन आडनावे लावते. उदा. प्रिया तेंडुलकर, आशा काळे, जयश्री गडकर, किंवा आरती अंकलीकर, टिकेकर, भक्ति बर्वे-इनामदार, रेखा इनामदार-साने, कल्पना गोसावी-देसाई, लता सप्रे-चौधरी वगैरे. पाश्चात्य देशातही मला वाटते असा प्रकार नसावा. प्रेसिडेंट बुश, जॉन मेजर यांच्या पत्नी किंवा मिसेस थॅचर या माहेरचे आडनाव लावतात ?

माझे एकच म्हणणे आहे. आज भारतात इतरत्र कोठेही नाही एवढे स्वातंत्र्य पुण्या-मुंबई-नागपूरची मराठी पांढरपेशी स्त्री उपभोगत आहे. त्यांनी बहुजनसमाज व दलित स्त्रियांकडे पहावे व त्यांच्या उद्धारासाठी दिवसातील २ तास तरी द्यावे. टी. व्ही. वरील निवेदिका व मॉडेल्स यांचे अनुकरण थांबवावे. मुली जाळून घेत आहेत, त्यांच्या छळात नवऱ्यामुलाबरोबर सासू-नणंद-जावयांचाही मोठा वाटा आहे. याविरुद्ध आवाज उठविला पाहिजे. कळावे, पत्र लांबले, क्षमस्व.

सौ. सुवर्णा सुरेश जोशी
एम. कॉम.

दि. ३-२-९२ यशवंत नगर /तळेगाव

श्रीपाद भालचंद्र जोशी / स. न. वि. वि.

'युगवाणी' ए-मे-जू '९१ चा अंक मिळाला. आभारी आहे. डॉ. राजेंद्र डोळके यांचा 'दलित कविते'च्या संदर्भातला लेख वाचला. डॉ. भालचंद्र फडके यांच्या 'दलित साहित्य : वेदना आणि

विद्रोह' यामधील दलित कवितेच्या लेख त आणि राजेंद्र डोळके यांच्या लेखात फारसा फरक नाही. फडक्यांनी दिलेली उदाहरणेच त्यांनी उद्धृत केलीत. आज दलित कविता विशेष एका टप्प्यावर असताना दलित कविता न वाचता व आजची कविता कोणती हे न पाहता केवळ पुनर्लेखनाचा प्रपंच डोळके यांनी करायचा. डोळक्यांनी विशिष्ट त्या कालखंडाचा उल्लेख करायला हवा होता एवढेच. कळावे.

ज्योती लांजेवार
नागपूर

श्री. श्रीपाद जोशी / सप्रेम नमस्कार

'युगवाणी'साठी माझा लेख स्वीकृत केल्याबदल धन्यवाद. माझ्या लेखावर 'तो डॉ. फडक्यांच्या लेखासारखा आहे' हा आक्षेप असणारे पत्र आले आहे असे आपण लिहिले आहे. फडक्यांचे 'दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह' हे पुस्तक मी माझा लेख लिहीपर्यंत पाहिलेही नव्हते. मग वाचणे तर दूरच, गेल्या काही महिन्यांपासून ते पुस्तक मला इथल्या लायब्ररीत सापडले आहे. व ते मी आणलेही आहे. मात्र अजून वाचले नाही तथापि माझा लेख डॉ. फडक्यांच्या लेखांसारखा असणे अशक्य नाही. मात्र योगायोगाशिवाय दुसरे कारण राहू शकत नाही. पत्र पाठविणारा कोण आहे हे कळले नाही. फडक्यांच्या पुस्तकातील लेख आजच वाचतो. आणि माझा लेख त्यांच्या लेखासारखा आहे की नाही ते ठरवितो. माझ्या माहितीप्रमाणे डॉ. भालचंद्र फडके यांची भूमिका दलित साहित्याचा पुरस्कर्ता अशी आहे. माझ्या लेखातून माझी भूमिका तशी व्यक्त झालेली आहे असे वाटत नाही. असो.

रा. ग. डोळके

दि. १०-१२-९१ चंद्रपूर

श्रीपाद भालचंद्र जोशी / स. न. वि. वि.

'युगवाणी' चा ऑगस्ट ९१ चा अंक मिळाला. अंक 'युगवाणी'च्या परंपरेला साजेसा असाच आहे. यात शंकाच नाही. अभिनंदन

ना. ब. कावडकर
वणी

संपादक, युगवाणी /स. न. वि. वि.

'युगवाणी'चा सप्टें. ९१ चा अंक मिळाला. तारा धर्माधिकारी, यांचा 'गीता साने : चिंतनशील, व्रतस्थ, बंडखोर यती' हा लेख आशावाद वाढवीत नेणारा आहे. 'मनमोहनांची कविता : स्वकालीन काव्याविषयीचे खदखदणारे असमाधान' हे डॉ. अक्षयकुमार काळे यांचे टिपण आवडले. रवींद्र ठाकूर यांचे 'प्रभा गणोरकर यांची कविता' हे टिपण गणोरकरांच्या कवितेचा वेध घेणारे आहे. टिपण मनस्वी आवडले, एकूण अंक संग्राह्य असाच आहे. कळावे.

शकुंतला अंभोरे

दि. १३-२-९२ काकू निवास, वसमत, जि, परभणी

संपादक 'युगवाणी' / स. न. वि. वि.

एक वर्षानंतर अत्यंत बिकट परिस्थितीत अनेक अडथळे असताना जुलै ९१ पासून सुरू झालेला प्रवास आपले कुशल संपादनामुळे यशस्वी होत आहे. नोव्हेंबरचा अंक मिळाला. अंक वैशिष्टयपूर्ण आहे. यापुढेही असेच अंक निघणार ही खात्री आहे. शुभेच्छा. कळावे.

साहेबराव तायडे
तुलंगा / ता. पातूर / जि. अकोला

श्री. श्रीपाद जोशी / सप्रेम नमस्कार

युगवाणीच्या स.-ऑ.-नो. ९१ च्या अंकातील आपले संपादकीय लक्षणीय वाटले. कळावे,

सुधीर बेडेकर
दि. ४-२-९२ १३ गीताली / ७६८-९ / १६ P. M. G. कॉलनी,
एरंडवणे, पुणे 411004

श्री. श्रीपाद जोशी /स. न. वि. वि.

आपला मागचा खूप काळानंतरचा अंक मिळाला होता. खूपच चांगला वाटला. हाही अंक चांगला सजला आहे. आपली तशी जास्तवेळा भेट झाली नाही. हा अंक मला सातत्याने पाठविण्यामागच्या आपल्या माझ्याविषयीच्या भावना मी कायमच्या मनात बाळगीन. धन्यवाद. कळावे.

अवधूत हर्डीकर
दि. ८-२-९१ १६ ए. गणेश कृपा सोसायटी, श्री. रामकृष्ण
परमहंस नगर, कोथरूड, पुणे ३८

श्रीपाद जोशी / स. न. वि. वि.

'युगवाणी'चा स.-ऑ.-नो. ९१ चा अंक वाचला. त्यामधील सर्वच लेख सुंदर वाटलेत. 'ज्ञानेश्वरीतील श्रृंगारविश्व' व त्यावरील प्रतिक्रिया दोन दोन वेळा श्रद्धापूर्वक वाचल्या.

मला आपल्या वि. सा. संघाने आजीव सभासद यावर्षी करून घेतले. तद्वतच सर्व आजीव सभासदांसोबत माझे सुद्धा नाव 'युगवाणी'मध्ये छापून शुभेच्छा कळविल्या त्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद. 'युगवाणी'च्या संपादक मंडळास व केंद्रीय कार्यकारिणीतील मान्यवरांना माझ्या नूतन वर्षाच्या शुभेच्छा.

वसंत साळवणकर
दि. १०-१-९२ पेंच पाटबंधारे वसाहत / टेकाडी (कन्हान)
ता. पारशिवनी / जि. नागपूर

संपादक, युगवाणी / स. न. वि. वि.

'युगवाणी'चा स. ऑ. नो. ९१ चा अंक मिळाला. अंक खरेच चांगला आहे.

दुर्गा भागवत
दि. १२-२-९२ राजेंद्र विहार, गिल्डर लेन, मुंबई ४००००८

संपादक युगवाणी / स. न. वि. वि.

स–ऑ–नो– ९१ च्या अंकातील श्री. भगवान ठग यांचे स्वगत वाचले.

विदर्भाच्या विशिष्ट साहित्य क्षेत्रातही असे काही सुरू असते हे वाचून मौज वाटली. हे साहित्य क्षेत्र म्हणायचे ?

भगवान ठगांना ज्यांचा उल्लेख करायचा आहे त्या छुप्या व्यक्तींना साहित्यिक; लेखक म्हणायचे ? कशा करता ?

स्वतःच्या हितांना व व्यक्तिगत स्वार्थांना खतपाणी घातल्या जाते तोवर मूग गिळून बसायचे आणि तो पाणी पुरवठा बंद होताच जातीयवादी आरोप करायचे हा कृतघ्नपणा ही राजकीय संस्कृती साहित्य क्षेत्रातही कशी शिरली आहे हे यावरून दिसले.

जातीय वृत्तीने आंधळी झालेली व ही वृत्ती व्यक्त करण्याची संधी शोधणारी माणसे विदर्भात भगवान ठगासारख्यांना वापरून साहित्यकलेचे क्षेत्र कसे नासवीत, कुजवीत आहेत याचे जे दर्शन श्री. भगवान ठग यांनी ज्या पद्धतीने व्यक्त केले त्याबद्दल त्यांचे करावे तेवढे कौतुक थोडेच आहे. असा स्पष्टवक्तेपणा व निर्भीडपणा आज सर्वत्र दुर्मिळ होत चालला आहे. त्यामुळे भगवान ठगांच्या कवितांपेक्षा व त्या प्रसिद्ध होण्यापेक्षा त्यांची ही वृत्ती ही निश्चितच अधिकाधिक प्रसिद्धी देण्यायोग्य व गौरविण्यायोग्य गोष्ट आहे.

श्रीकृष्ण चौधरी
अहमदनगर

संपादक " युगवाणी " यास / सप्रेम नमस्कार

आपला सप्टेंबर / आक्टोबर / नोव्हेंबर १९९१ चा अंक वाचला. त्यामधील श्री. भगवान ठग यांनी दिलेला अभिप्राय वाचला. यासंबंधी मी जरी कवी किंवा लेखक नसलो तरी माझे विचार मांडीत आहे.

श्री भगवान ठग याचे म्हणणे असे आहे की त्यांनी भरपूर कविता लिहिल्यात परंतु त्यांची दखल युगवाणीने घेतली नाही आणि तरुण भारतनेही घेतली नाही. प्रस्तुत लेखकास असे सांगावेसे वाटते की, आपण दिलेले सर्व लिखाण छापलेच पाहिजे असे नाही. तो अधिकार केवळ संपादक व संपादकीय मंडळ यांचा अधिकार आहे. त्यामुळे ते प्रसिद्ध केले नाही असे श्री. ठग यांचे म्हणणे सयुक्तिक नाही.

दि. २–३–९२ धनंजय देशपांडे, नागपूर

केंद्रीय कार्यवृत्त / डिसेंबर १९९१

[६ नोव्हेंबर '९१ रोजी झालेल्या कार्यक्रमात खालील कार्यवृत्त अनवधानाने प्रकाशनार्थ घ्यावयाच्या मजकुरातून राहून गेले. त्यामुळे स-ऑ-नो '९१ च्या अंकात ते प्रकाशित होऊ शकले नाही याबद्दल दिलगीर आहोत.]

दि. ६ नोव्हेंबर : विदर्भ साहित्य संघातर्फे आयोजित करण्यात आलेल्या रंगभूमी दिनानिमित्त झालेल्या भरगच्च कार्यक्रमात सादर करण्यात आलेल्या 'बेंडबा' एकांकिकेने प्रेक्षकांची मने जिंकून घेतली. विदर्भात झालेल्या अनेक एकांकिकास्पर्धांमध्ये या एकांकिकेस प्रथम क्रमांकाचे मानाचे स्थान मिळालेले आहे. यात काम करणारे सर्वच कलावंत नवीन असूनही त्यांच्या रंगमंचावरील हालचाली वाखाणण्याजोग्या होत्या. या नाटकाचे दिग्दर्शक श्री. जॉनी मेश्राम यांनी प्रत्येक नटाच्या हालचाली अतिशय सुरेख बांधलेल्या होत्या. एकूण कंपोझिशन्स व हालचाली एका लयीत व नादात होत्या. स्वतः दिग्दर्शकच या नाटकाचे लेखकही आहेत. लेखनाचे पारितोषिकही त्यांनी प्राप्त केलेले आहे. यात ज्या कलावंतांनी भाग घेतला त्यांची नावे अशी : शाम केळापुरे, जयदीप भालेराव, चारुहास बल्लाळ, अरुंधती ठोंबरे, ठाकूर, जयंत गडेकर व फिरदोस व जॉनी मेश्राम. याच कार्यक्रमात सादर झालेले 'डिस्को हॉस्पीटल' हे एकांकिकावजा प्रहसन मूकनाट्याच्या स्वरूपात सादर करण्यात आले. पेंटोमाईम या नाट्यप्रकाराचा या मूकनाट्यात उपयोग करण्यात आला. उडत्या चालीच्या संगीताच्या पार्श्वभूमीवर सादर झालेले हे मूकनाट्य वेगळेच समाधान देऊन गेले.

याच कार्यक्रमात श्याम केळापुरे यांनी, श्री. लक्ष्मण देशपांडे यांच्या 'वऱ्हाड चाललंय लंडनला' या विख्यात एकपात्री प्रयोगातील काही अंश सादर केले. त्यांच्या अप्रतिम सादरीकरणावर सर्व प्रेक्षक खुश होते.

श्रद्धांजली

डिसेंबर १९९१ मध्ये दिवंगत झालेल्या, सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना विदर्भ साहित्य संघातर्फे श्रद्धांजली वाहण्यात आली.

स्मृतिदिन / जयंतीदिन

डिसेंबर १९९१ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर (६ डिसेंबर '९१), कविवर्य ग. दि. माडगूळकर (१४ डिसेंबर '९१), संत गाडगे महाराज (२० डिसेंबर '९१) यांच्या स्मृति व जयंती दिनी विदर्भ साहित्य संघातर्फे त्यांच्या छायचित्रास पुष्पहार अर्पण करून आदरांजली अर्पण करण्यात आली.

डिसेंबर ९१ मध्ये झालेले अन्य कार्यक्रम असे–

दिनांक ४ डिसेंबर ९१

विदर्भ साहित्य संघ आणि " षड्ज " या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनावर आधारित 'मृत्युंजयाचा जयजयकार' या शीर्षकाचा गीत–संगीत–निवेदनयुक्त कार्यक्रम वि. सा. संघाच्या टिळक सभागृहात सादर करण्यात आला. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक श्री. राम फाटक आणि संगीत नाट्य अकादमीने गौरविलेले गायक व संगीत दिग्दर्शक गीत रामायणकार पद्मश्री सुधीर फडके प्रामुख्याने उपस्थित होते. वि. सा. संघातर्फे या संगीत दिग्दर्शकद्वयांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री. सुधीर फडके यांनी सावरकरांच्या छायाचित्राला पुष्पहार अर्पण केला. 'षड्ज' संस्थेतर्फे श्री. सुधीर फडके यांचे स्वागत सौ. उषा धारप यांनी केले. तसेच सौ. प्रमिला पटवर्धन यांनी श्री. राम फाटक यांचे स्वागत केले. कु. भाग्यश्री धारप हिने ऋग्वेदातील मंगलाचरण गाऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. यानंतर स्वातंत्र्यवीरांच्या जीवनावरील सुरस गीते सादर करण्यात आली. या कार्यक्रमाचे निवेदन सौ. संगीता सोवनी यांनी केले. श्री. सुधीर फडके यांना लाभलेल्या अकादमी सन्मानाबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात येऊन 'षड्ज'तर्फे त्यांच्या वीर सावरकरांवरील चित्रपटाच्या उपक्रमाकरिता आणि सावरकरदर्शन प्रतिष्ठानाकरिता पाच हजार रुपयांचा निधी श्रीमती प्रमिला भागवत यांच्या हस्ते त्यांना देण्यात आला.

सौ. उषा धारप, सौ. प्रमिला पटवर्धन, सौ. अंजनी कुळकर्णी, संगिता सोवनी, श्रीमती प्रमिला भागवत व कु. भाग्यश्री धारप या कलावंतांचा गीतगायनाचा कार्यक्रमही या प्रसंगी सादर करण्यात आला यावेळी श्री. वसंत सहस्रबुद्धे यांनी हार्मोनियमवर तसेच प्रसाद धारप यांनी तबल्यावर साथ दिली. या कार्यक्रमास विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित असलेले श्री. विक्रम सावरकर यांच्या षष्ठ्यब्दीनिमित्त व सौ. स्वामिनी सावरकर यांचाही सत्कार करण्यात आला.

वीर सावरकरांवरील चित्रपटाच्या आर्थिक जुळवाजुळवीचा व उपक्रमाची संपूर्ण माहिती या प्रसंगी श्री. सुधीर फडके यांनी करून दिली.

'मृत्युंजयाचा जयजयकार'च्या मालिकेतील हा एकविसावा कार्यक्रम होता.

दि. १९ डिसेंबर १९९१

महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री श्री. सुबोध सावजी यांनी वि. सा. संघात आयोजित एका कार्यक्रमाचे वेळी विदर्भ साहित्य संघाला भेट दिली. अन्य भाषा साहित्य विभागाचे आमंत्रक व 'युगवाणी'चे संपादक श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी मंत्रीमहोदयांचे पुष्पहाराने स्वागत करून संस्थेबावत माहिती दिली. चिटणीस श्री. प्रकाश एदलाबादकर व धनवटे रंग मंदिराचे आमंत्रक श्री. योगेश बऱ्हाणपुरे या प्रसंगी उपस्थित होते.

दि. २२ डिसेंबर १९९१

"जीवनातील अर्थहीनतेतून अर्थ शोधून बेकेटने मानवी जीवनातील गुंतागुंत व सामाजिक जाणीवांचा प्रभावी आविष्कार आपल्या नाटचकृतींमधून केलेला आहे." या आशयाचे विचार "बॅकेट व थिअटर ऑफ द ॲबसर्ड" या विषयावर बोलतांना डॉ. विश्वास कानडे यांनी, वि. सा. संघाच्या नाटच शोध संस्थानतर्फे आयोजित कार्यक्रमात बोलताना मांडले. हा कार्यक्रम बॅकेट पुण्य-तिथी निमित्त आयोजित केला गेला होता. सुरुवातीला प्रस्तावना करताना श्री. जयंत पात्रीकर यांनी नाटचशोध संस्थान या उपक्रमाविषयी माहिती दिली. तसेच या प्रकल्पांतर्गत विविध व्याख्याने; घरआंगण, नाटचपदविका अभ्यासक्रम, नाटकांचे व्हिडीओ शो इ. गोष्टींचे आयोजन करण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

शेवटी प्रा. विनोद इंदुरकर यांनी, वैदर्भीय नाटचप्रेमींनी या प्रकल्पातील सर्व योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. कार्यक्रमाला बरेच नाटचप्रेमी उपस्थित होते.

दि. २९ डिसेंबर १९९१

विदर्भ साहित्य संघातर्फे पहिले एक दिवसीय दलित साहित्य संमेलन उत्साहात पार पडले. 'निकाय' संपादक, सुप्रसिद्ध दलित लेखक डॉ. भाऊ लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या संमेलनाचा सविस्तर वृत्तांत इतरत्र याच अंकात दिलेला आहे.

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे 'ग्रंथसहवास' या चळवळी अंतर्गत 'ग्रंथसहवास' चे चार कार्यक्रम घेण्यात आले, ते असे. :

दि. ५-१२-९१ सौ. सुनिता दलाल यांचे घरी, सोमलवाडा, वर्धा रोड, नागपूर
दि. ८-१२-९१ वर्धा जिल्ह्यात पिपरी येथील व्यक्तित्व विकास शिबिरात.
दि. १५-१२-९१ सौ. शुभदा सावदेकर यांच्या शिवाजीनगर, नागपूर या निवासस्थानी
दि. २२-१२-९१ कस्तुरबा भवन, जिजामाता वाचनालय, नागपूर
दि. २४-१२-९१ रामबाग (नागपूर) येथील सौ. श्यामला मुजुमदार यांचे निवासस्थानी.

परीक्षा समिती

अहिंदीभाषिक विद्यार्थ्यांसाठी चालविण्यात येणाऱ्या भाषा परिचय वर्गाचा समारोप दि. १५ डिसें. ९१ रोजी मा. श्री. किरण देशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी विद्यार्थ्यांना भाषा परिचय वर्गाची प्रमाणपत्रे देण्यात आली.

परीक्षा समितीच्या परीक्षा केन्द्राचे केन्द्राधिकारी श्री. दाढे गुरुजी यांना देवाज्ञा झाली. परीक्षा समितीतर्फे शोकसभा घेऊन त्यांना श्रद्धांजली वाहण्यात झाली.

अनुक्रमणिका


डिसेंबर १९९१ पर्यंत मान्य झालेल्या उपकर्ते व आजीव सदस्य यांची नावे या अगोदरच्या अंकात प्रसिद्ध झालेली आहेत. तसेच डिसेंबर १९९१ पर्यंतच्या नूतनीकरण झालेल्या शाखांची यादी या पूर्वीच्या अंकात प्रसिद्ध झालेली आहे.

डिसेंबर १९९१ मध्ये कोणत्याही शाखेकडून शाखावृत्त आलेले नाही.


सरचिटणीस



■ विदर्भ साहित्य संघ व षडज् या संस्थेतर्फे सादर करण्यात आलेला 'मृत्युंजयाचा जयजयकार' या कार्यक्रमाच्या वेळी सत्काराला उत्तर देताना सुप्रसिद्ध गायक व संगीत दिग्दर्शक पद्मश्री श्री. सुधीर फडके व षडज् चे कलावंत सौ. अंजली कुलकर्णी, सौ. संगिता सोहनी, सौ. प्रमिला पटवर्धन, सौ. प्रमिला भागवत, सौ. उषा धारप व कु. भाग्यश्री धारप



साहित्य संघाच्या दलित साहित्य संमेलनाच्या संयोजिका सौ. ज्योती लांजेवार
श्री· मनोहर म्हैसाळकर, प्रा. सुरेश द्वादशीवार, न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, डॉ. भाऊ लोखंडे, सौ. लोखंडे, [illegible] पानतावणे व श्री वामन तेलंग



■ दलित साहित्य संमेलनातील 'डॉ. आंबेडकरी चळवळ : कार्य आणि अनुभव' या चर्चासत्रात संयोजन करतांना श्री. पूरण मेश्राम. सर्वश्री नितीन राऊत, वा.को. गाणार, कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री मोतीरामजी पावडे, संमेलनाध्यक्ष डॉ. भाऊ लोखंडे व श्री. अशोक थूल व्यासपीठावर दिसत आहेत.



■ संमेलनातील 'स्त्री : दलित साहित्यातील / वास्तवातील' या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानावरून बोलतांना डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे व परिसंवादातील सहभागी डावीकडून प्रा. मधुमती वानखेडे, डॉ. योगेन्द्र मेश्राम, प्रा. सुशीला मूल जाधव व प्रा. नलिनी सोमकुवर

प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर-१२
मुद्रक : मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर-१२
मुखपृष्ठ मुद्रण : मधुकर वैद्य, मधुकर आर्ट्स, धनतोली, नागपूर-१२

अनुक्रमणिका